मराठी ग्रंथ

नाटक १७५

ले. आ. मो. पा.

संगीत रण

# ...ाजी नाटक.

नाटकाचे कर्ते,

...ोरेश्वर पाठारे

...तयार केलें.

...बईंत

...पखान्यांत, छापिलें.

आत्माराम म...

[ नाटकप्रयोग कर... ...ाक्टाप्रमाणें नोंदिलें आहे. ]

हक्क राखि...

...० स० १८९८.

...२ आणे.

५

# संगीत रणसिंह-बाजी नाटक.

'संगीत संभाजी' नाटकाचे कर्ते,

## आत्माराम मोरेश्वर पाठारे

यांनीं तयार केलें.

मुंबईत

इंदुप्रकाश छापखान्यांत, छापिलें.

[ १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिलें आहे. ]

शके १८२०. इ० स० १८९८.

किंमत १२ आणे.

# श्रीमंत संभाजीराव बाबूराव आंग्रे,

**वजारत मॉब सवाई सरखेल बहादूर,**

ग्वाल्हेर,

यांच्या चरणीं,

त्यांच्या ठायीं असलेल्या विद्याभिरुचि, औदार्य

इत्यादि अनेक गुणांवर लुब्ध होऊन,

हें

**संगीत रणसिंह-बाजी नाटक**

अत्यादरपूर्वक अर्पण केलें आहे.

त्यांचा नम्र सेवक,

**आ० मो० पाठारे.**

# प्रस्तावना.

माझें संगीत संभाजी नाटक प्रसिद्ध होऊन कमींत कमी आज आठ वर्षें झालीं. रंगभूमीवर संगीतांत प्रयोग झालेलें हें अगदीं प्रथमचें ऐतिहासिक नाटक. १८९० सालीं त्याचा पहिला प्रयोग मुंबई मुक्कामीं करून, जनमनाल्हादकत्वाचें पूर्ण श्रेय चित्तचक्षुचमत्कारिक कोल्हापूरकर मंडळीनें पदरीं बांधिल्याचें सर्वविश्रुत आहेच; त्यानंतर बऱ्याच नाटक मंडळ्यांनीं सदरहू नाटकाचे ठिकठिकाणीं प्रयोग करून, यश संपादन केलें; व करीत आहेत.

आतां प्रस्तुत नाटकासंबंधानें थोडेंसें सांगितलें, म्हणजे या आमच्या प्रास्ताविक दोन शब्दांची मर्यादा संपली. हें **रणसिंह-बाजी नाटक, चि. च. को. ना. मंडळी**करितां प्रथमतः तयार केलें असून; कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें त्यावेळीं, व तदनंतर, अनुकूल अशा नाटक मंडळीच्या अनास्तित्वामुळें, तसेंच कांहीं दिवस गुलदस्तांत पडून राहिलें होतें; परंतु हल्लीं हयांत असलेल्या **करुणेशप्रासादिक नाट्यकलाप्रवर्तक नाटक मंडळी**कडून या नाटकाचा प्रयोग होण्याचा योग लवकरच अनायासें जुळून आला; व धुळें, नाशिक, ठाणें वगैरे ठिकाणीं ९५।९६ सालीं मंडळीनें अशा तऱ्हेच्या या ऐतिहासिक नाटकाची, लोकसमूहास, ही दुसऱ्यांदा गोडी लाविल्याचें यश संपादन केलें; याबद्दल मंडळी स्तुतीस पात्र आहे.

नाटकांतलि कथानक आमच्या आबालवृद्धांच्या बहुतेक परिचयांतलेंच आहे. रणशूर पेशवा, **पहिला बाजीराव**, ज्या ब्राह्मणवीरानें शिवछत्रपति महाराजांचा भगवा झेंडा अटकेपावेतों फडकवून, त्यांचा सुकीर्तिदुंदुभि साऱ्या हिंदुस्थानभर दुमदुमून टाकिला; ज्यानें दिल्लीपतीसारख्या बलिष्ट मोंगल बाद-

शाहास सरतेशेवटी हतवीर्य करण्यांत आपल्या जीवित्वाची लेश-मात्र पर्वा न करितां, भयंकर अशा संग्रामभूमीवर अहोरात्र थैमान करून, शत्रूकडूनही आपणास गाजी ह्मणवून घेतलें; ज्या रणसिंहानें आपल्या सर्वांगावर पेटलेल्या वणव्याची यत्किंचित्‌ही मनांत भीति न बाळगितां, सद्गुरु ब्रह्मेंद्र स्वामींचीं "शिवराया नियमानें। आठवुनी शुद्धमनें। विमल कीर्तिरूपानें। इहपरलोकीं तरा॥" इत्यादि बोधवचनें प्रमाण मानून, तदुचित आपलें वर्तन ठेवून, छत्रपतींचे इष्ट हेतु तडीस नेले; त्या नरपुंगवाचें हृदयंगम चरित्र—कांहीं ठिकाणीं नाट्यरचनेस साजतील अशा थोड्याशा फेरफारांमुळें—इतिहासदृष्ट्या जरी तितकें महत्वाचें नसलें, तरी पुस्तक शेवटपर्यंत वाचणाऱ्या एखाद्या इतिहासज्ञाची अगदींच निराशा होणार नाहीं; अशी खात्री आहे.

या पुस्तकांतील ऊर्दू भाषा तयार करण्याचे कामीं माझे बालमित्र, **मीर उस्मान वल्लद मीर अबदुल्ला,** यांनीं जें बिनमोल साह्य मला केलें, त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. तसेंच, नाटक प्रसिद्ध होऊन, रसिक वाचकांच्या हातीं तें पडण्यास कारण झालेलें **श्रीमंत आंग्रेसाहेब** यांचें परमौदार्य, आणि तें होण्यास विशेषत: कारणीभूत झालेला ज्यांचा प्रयत्न, त्या **रा. रा. मोरेश्वर बाळकृष्ण मालपेकरांचे** आभार मानणें या ठिकाणीं अत्यावश्यक आहे.

जातां जातां शेवटीं इंदुप्रकाश छापखान्याचे मालक, **रा. रा. श्री. स. पंडित,** यांनीं मोठ्या कसोशीनें पुस्तक छापून दिल्या-बद्दल त्यांचे आभार मानून, सध्यां मजपाशीं लिहून तयार असलेलें "**संगीत वत्सराज्यारोहण नाटक**"—तशीच अनुकूल वेळा जुळून आल्यास—लवकरच लोकसेवेस सादर करीन; इतकेंच तूर्त सांगून, वाचकांची रजा घेतों.

ठाणें,—चेंदणी— } **आ. मो. पाठारे.**
१ नोव्हेंबर १८९८. }

# संगीत रणसिंह-बाजी नाटक.

## अंक १ ला.

### नान्दी.

**पद.**—भूपकल्याण—दादरा.

सुमनार्चन, तोषवु हें, हिमनगजाधीश ईश, शिवशंकर भोला ॥ ध्रु० ॥ तो त्रिभुवनमंगलाख्य, गणनायक, नेउ दूर, विघ्नतमाला ॥ १ ॥ सत्कार्यारंभि जया, वंदुनियां नर अनुपम, लेववितो, सुयशभूषणाला ॥ २ ॥ ऐशा त्या विघ्नहरा, अर्पितसें मी ही नवकवनकुसुममाला ॥ ३ ॥

**पद.**—आधीं सुरवर शिव वंदिला०—

तो शिव रक्षो तुह्मां सकलां ॥ ध्रु० ॥ सेवुनी वन अनुदिनीं मुनि, सुरासुरिं जो प्रार्थिला ॥ जाणुनी दृढ भक्ति विमला, तोषला, झणिं पावला ॥१॥ काननीं जइं भिल्लिणीमधुगायनध्वनि ऐकिला ॥ ध्यान सोडुनि, गर्व मनिंचा सांडुनी, सुख पावला ॥ २ ॥ जाणुनी हिमनगसुता ती, मानसीं बहु खोंचला ॥

झालि त्या सव्रीड पाहुनि, वंदिती तत्पावलां ॥ ३ ॥ अंबिकामुखचंद्रमा स्वकरें जयें कुरवाळिला ॥ वर्षता तों सुमनभर शिरिं लीन सुरगण जाहला ॥ ४ ॥

**सूत्रधार**—( प्रवेश करून ) पुरे. ( सभाजनांकडे पाहून, हात जोडून ) सभाजनहो,

**साकी.**

कालिदास, भवभूति, बाण, जनमान्य आद्य कविप्रभृती ॥ वंदुनि आत्मारामें रचिलें नवनाटक संगीतीं ॥ नाम यथार्थ असें ॥ ज्या रणसिंह-बाजि विलसे ॥ध्रु० ॥ करुण, शृंगारादि रसांनीं युक्त, परी या चरितीं ॥ दाखविली स्वाभाविक रीतीं वीरद्युति कविनें, ती ॥ आपण त्याचि कृती ॥ पहावी सावधान चित्तीं ॥ १ ॥

( इकडे तिकडे फिरून, आंत डोकावून, नटीकडे पाहून ) अमळ इकडे येऊन जा पाहूं ? ( कांहीं थांबून, पुन्हा पाहून ) छे, आमच्या घरांत आज हा कांहीं निराळाच प्रकार दिसत आहे.

**पद.**—केदार-त्रिवट.

वच माझें नच ऐकुनि कानीं ॥ सुंदरि पाही येथ न अजुनी ॥ ध्रु० ॥ साश्रुनयनयुग अर्धमिटोनी ॥ म्लान वदन हीं लपवी मानी ॥ दुःखवेग परि येति फुटोनी ॥ न कळे इजला छळिलें कोणीं ॥ १ ॥

( नटीस येतांना पाहून ) इकडेच ती येत आहे; तेव्हां असें हो-

ण्याचें कारण काय, तें आतां कळेलच. ( चिंतातुर मुद्रा झालेली नटी येते. )

**नटी**–( हात जोडून विनयानें )

**पद.**—सगरा बिगारा, जोबनुवा०—

लीन सदा चरणिं या । न कशी मी येऊं ॥
नाथा, दिसतां असे कां हे ॥ ऐशा या समयीं ॥ धृ० ॥ वृक्ष भयानक वसे काननीं ॥
परि त्या सोडुनी सुखद छाया ॥ दूर कधीं
तरि राहतसे का ॥ आज्ञा आपुली मान्य
आहे ॥ ऐशा या समयीं० ॥ १ ॥

**सूत्र०**—मग हा प्रकार काय ? मुख म्लान झालेलें दिसतें, नेत्रांतून अश्रुधारा चालल्या आहेत, ऊर धडधडतो आहे आणि तुझ्या सर्वांगाला कंप सुटला आहे–कां बरें तो ? मला सांग तुझ्या दुःखाचें कारण असें कोणतें तें.

**नटी**—( दुःखोच्छ्वास टाकून )

**पद.**—लगाये लिनो जान०—

प्रिया मी सांगु काय ॥ तुह्मांला ॥ कसें करूं
न सुचे उपाय ॥ धृ० ॥ स्वप्न भयानक पाहियलें मीं ॥ विधियला हा काय ॥ जयानें ॥
कसें करूं न सुचे उपाय ॥ तुह्मांला० ॥ १ ॥

**सूत्र०**–( हंसून ) एकूण खऱ्या गोष्टीचा केवळ ज्यांत भास, अशा स्वप्नामुळें तुला इतकें दुःख झालें तर ! वेडे, ही व्यर्थ भीति तूं सोडून, आतां इच्छित कार्याच्या तयारीस लाग. ( सभेकडे हात करून ) इकडे पाहिलेंस ?

**पद.**—नाहिं सुभद्रा या वार्तेतें०—

रंगमंडपीं जन हे बसुनी झाला वेळ अती ॥
नाट्यगुणग्रहणार्थ आज किति सावधान दि-
सती ॥ धृ० ॥ तोषित करुं यां दाखवुनी
नवनाटक इच्छियलें ॥ काय करावें परी,
आपुलीं पात्रें मूढमती ॥ १ ॥

**नटी**—( उत्साहानें ) पतिराज, कांहीं काळजी करूं नये.

**पद.**—झिंजोटी-त्रिवट.

जनमनरंजन नर्तन, गायन ॥ शिकुनि असे
बहु दक्ष पात्रगण ॥ धृ० ॥ वस्त्राभरणीं नटु-
नि थटुनियां ॥ सिद्ध जहाला ये स्थलिं
याया ॥ वाटे ऐसें मन्मानसिं या ॥ तोषवील
तो सकल सभाजन ॥ १ ॥

**सूत्र०**—तर प्रथम, सांप्रतकालाचें ज्यांत यथार्थ वर्णन असेल, असें एखादें गीत गाऊन या सभाजनांचीं मनें तोषित कर. नंतर कथाभागास आरंभ करूं.

**नटी**—बरें तर ; गातें. ( गाऊं लागते. )

**पद.**—देदेरे जोबनुवाकुदान, लंगरिया०—

यवनिं भरतभूमि ही, छळिलि कीं ॥ वदन
करुनि अति दीन विलोकी ॥ धृ० ॥ दुःखा-
तिशयें अश्रु सदोदित ॥ गाळितसे, परकरु-
णा भाकी ॥ “ द्या मज थारा, कोण तुह्मां-
विण । असति सदय आतां इहलोकीं ” ॥ १ ॥

**सूत्र०**—क. । सांप्रतकालाचें—ह्मणजे शरदृऋतूचें—ज्यांत रस-भरित वर्णन, तें साडून असें विपरीत गायन का करायचें !

**नटी**—पण यांत विपरीत तें काय ?

चोहिंकडे हा प्रकार सारा । स्वजन सांपडे
म्लेंच्छकाळमुखिं ॥ कोणि निकेतन, धन,
सुत, दारा । भीतिमुळें या सोडुनि टाकी ॥ २ ॥

**सूत्र०**—( भय पावून, रागानें ) अरेरे ! काय हें ! असें तुला बोलतांना एखाद्या शत्रूकडील मनुष्यानें ऐकलें, तर तें उभ-यतांनां जड जाणार आहे ! कारण,

**साकी.**

जिकडे तिंकडे दिल्लीपतिचे दूत संप्रती फिरती ॥
ज्यांच्या धाकें जन कोणीही गेहीं कांहिं न वदती—

( इतक्यांत पडद्यांत मोठ्यानें शब्द होतो. )

**श्लोक.**—मंदाक्रांता.

त्या दुष्टात्मा यवन रिपुचें बीज मी संहरीन ॥
भूदेवीला, सकलहि जनां पूर्ण संतोषवीन ॥
शाहूहस्तें करविन सुरू घोर संग्रामयज्ञा ॥
त्या यज्ञीं ते रिपुबळि समर्पीन, ही मत्प्रतिज्ञा ॥१॥

**नटी**—( दचकून ) अगबाई ! कुणाची इतकी भयंकर वाणी ही ?

**सूत्र०**—प्रिये, दुसऱ्या कोणाची ! नुक्तींच ज्याला साताऱ्यांत छत्रपति शाहूमहाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं, शत्रुजनांचा संहार व्हावा ह्मणून माळवाप्रांताकडे ज्याची स्वारी निघाली आहे, त्या रणशूर बाजीरावाची ही वाणी ! तर येथून आतां मुकाट्यानें जाऊं चल कशी. ( जातात. )

**ही प्रस्तावना झाली.**

( तदनंतर लढाईचा पोषाख केलेला **बाजीराव** येतो. )

**बाजीराव**—'त्या दुष्टात्मा यवन रिपुचें०' हा पूर्वोक्त श्लोक ह्मणून ) अहाहा ! काय विपत्कालाचा प्रभाव हा !

**पद.**—वायुनंदन रदन करकर०—

त्राहि, त्राहि, त्राहि, भगवन् ॥ जो वदाया
लावि हा जन ॥ गेह–धन–सुत–मोह त्या·
गुन ॥ विपिन कवणां लावि सेवाया ॥ध्रु०॥
बलात्कारें भ्रष्टवी किति ॥ दीन मज्जन,
त्यां न गणती ॥ संहरी खल यवनहस्तीं ॥
कष्टवी अति, काय कुदशा ही ॥ १ ॥

तस्मात्, हे काळपुरुषा ! तुझें सामर्थ्य विलक्षण आहे ! तुझी दृष्टि वक्र होतांच निमिषार्धांत सर्व उलट प्रकार होऊन जातो ! हें कशावरून ह्मणशील तर—

**पद.**–मी कुमार तींहि०—

त्वां पूर्वीं शिवबाहस्तें । दंडिलें दुष्ट यवनांतें॥
बहुपरी गांजुनी त्यांनां । आणिलें शरण
आह्मांतें ॥ या निराधार झालेल्या । सुख
दिलें भूमिमातेतें ॥ चाल ॥ परि तदीय
कुमराकरवीं ॥ मांडिला प्रलय या उर्वीं ॥
कुदशा ती काय वदावी ।। बोल न हा कि-
मपि कुणातें ॥ चाल ॥ सामर्थ्य तुझें वा
तैसें । मूढजनां कळतें कैसें ॥ १ ॥

अथवा, काळा ! असाच का हा तुझा नियम आहे, की—

पद.—चूतें सहज आज०—झंपा.

जैसा महा वीर । होतांहि गतधीर ॥ क्षुद्रें
नरें समर-। भूमीसि जावें ॥ ध्रु० ॥ किंवा,
शृगालांनि । कोठें न हरि बघुनि ॥ गर्जोनि-
यां विपिनिं । मग संचरावें ॥ १ ॥ येतां
निशा, सहज । लोपे तरणितेज ॥ आह्मां
तसे आज । यवनीं पहावें ॥ २ ॥

छे, पण प्रयत्नांतीं चांगले दिवस आमच्या वांट्याला खचीत येतील, याला मागील आमची अवस्थाच कशी साक्ष आहे पहा!

पद.—लाल शालजोडी जरतारी०—

स्वर्गवासि मम तात विपत्तीं कंठित असतां
दिन कांहीं ॥ ज्यातें नच आधार कुणाचा;
अथवा, दिधला कवणेंही ॥ ध्रु० ॥ दुःसह
दुःख सहन करी जो अन्न, वस्त्र तें मिळवाया॥
कष्टि सदोदित, त्यांत असे बहु गांजियला
यवनीं वायां ॥ परी सुदैवें बुद्धि जहाली,
शरण येत शाहूराया ॥ खल रिपु दंडुनि
अंतिं 'पेशवे' नाम पावला सकल महीं ॥ १ ॥

तेव्हां कांहीं कालांतरानें ह्मणा—यवनांचें निर्बीज होऊन, हें मराठ्यांचें राज्य पूर्ण उदयास येऊन, आमचे शाहूछत्रपति महाराज सर्व सत्ताधीश होऊन बसणार! (एकाएकीं अंधार पडलासें पाहून) अरे, पण अकालीं हें काय दुश्चिन्ह उद्भवलें! (वर आकाशाकडे पाहून)

दिंडी.

शांत पाहुनि त्या रोहिणीपतीला ॥
आक्रमाया पाहती मेघमाला ॥
बुद्धिमंतें सेवितां मौन जैसें ॥
मूढ करिती वल्गना, हेंहि तैसें ॥ १ ॥

तापहारका चंद्रा,

साकी.

मेघाच्छादित तूं, मज्जन बहु पीडित खल यवनांनीं॥
यास्तव उभयांचीं दुःखें बा या समर्थी सम मानीं ॥
क्षण तूं स्वस्थ रहा ॥ त्यांचे निष्फल यत्न
पहा ॥ धृ० ॥

( पाहून ) वाहवा ! हें पहा, मेघ हळूहळू नाहींसे होऊन आकाश स्वच्छ होत चाललें; चंद्रमा सतेज दिसूं लागला; अंधःकाराचा नाश होऊन पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें ! हा खेळ निमिषार्धांत झाला ! एकूण जगाची रहाटीच अशी कांहीं विलक्षण— कीं एकाला ती साधक, त्याच प्रसंगीं दुसऱ्याला सर्वस्वीं बाधक असते; आणि सध्यां ती तर आमच्या श्रीपतराव प्रतिनिधींच्या अगदीं मुळावर येऊन बसली आहे ! परंतु इमानेंइतबारें मराठ्यांचे गादीची सेवा करून, हिंदुजनांस दुःखविमुक्त करण्याची ज्यानें सर्वांसमक्ष प्रतिज्ञा केली, त्या बाजीरावाचे मार्गांत श्रीपतराव प्रतिनिधीसारखे शेंकडों महाभुजंग जरी आडवे येऊन पडले, तरी त्यांची यत्किंचित्‌ही पर्वा न करतां, त्यांच्या फणा छिन्नविच्छिन्न करून, त्यांस दूर फेंकून, तो आपला रस्ता मोकळा करील ! ( क्रोधानें लाल होतो. ) याखेरीज सांप्रत मला कशाचीच आवड उरली नाहीं ! !

पद.—शृंगा ताडांनी०—

स्वप्नि मला दिसती ॥ सभोंतीं ॥ रणमैदानें
तीं॥ आतां ॥ आप्त, जननि, मत्प्राण बंधु मम
सैनिक हे असती ॥ आतां ॥ धृ० ॥ हा
असि या हातीं ॥ असे मज ॥ हीच विला-
सवती ॥ आतां ॥ यवननिकंदन हें माझें
प्रिय उरलें या जगतीं ॥ आतां ॥ १ ॥

( कांहीं थांबून ) राजा, सर्व भार मजवर टाकून तूं सुखानें विश्रांति घे.

पद.—काय मला भूल पडालि०—

दाउनि मम शौर्यधाटि मी रणांगणीं ॥
प्रबल शत्रु टाकिन ते यवन चिरडुनी ॥धृ०॥
‘ गोब्राह्मणपरिपालक ’ सत्य हा तुझा ॥
कीर्तिध्वज फडकवीन सकल या जनीं ॥१॥

( चोहोंकडे पाहून ) अरुणोदय झाला. तर आपण आपल्या नियमानुसार गोटांतील लष्करी लोकांची व्यवस्था पाहून नेहमींच्या उद्योगास लागावें. ( कांहीं चालून ) अहाहा ! ही प्रभातवेळा एकंदर प्राणिमात्रांस सुखावह खरी !

पद.—मुनिच्या तपा विघ्न०—

शीतल मंद पवन वाहे ॥ करिती विहग मंजु-
रव हे ॥ नलिनी स्वप्रियास बाहे ॥ कुसुम-
मधूला लुब्ध जहाला । मधुकर तो पाहे ॥
॥ धृ० ॥ तेसें चोहिंकडे वन हें ॥ हरितव-
र्णपटसम नयनांतें । रम्य दिसत आहे ॥१॥

( जातो. नंतर **गोविंदा शागीर्द** येतो. )

**गोविंदा**—असा कनवाळु धनी पूर्ण भाग्योदयावांचून मिळणें नाहीं. काय त्याचें तें आश्रित जनाविषयींचें असाधारण प्रेम ! केवढी त्यांच्या कार्याविषयींची दक्षता ! आपल्या स्वत:विषयीं इतकी काळजी त्याला नसेल; तो आमच्या सुखासाठीं आज अश्रांत श्रम घेत आहे ! अहो, तीन तीन दिवस नुसत्या हुरब्यावर काढून ज्याला अन्नाची आठवणदेखील नाहीं ! कदाचित् एखाद्या ठिकाणीं तळ देऊन भोजनाचा प्रसंग आलाच, तर प्रथमत: आमची तरतूद , नंतर अन्नाचें दर्शन त्याला ! काय कडकडीत व्रत हें ! पूर्वजन्मींचेंच काय आमचें थोडेंसें पुण्य उभें राहिलें, ह्मणून हा दयावंत स्वामी आह्मांला मिळाला ! नारायणा ! हाच धनी जन्मोजन्मीं आह्मांला मिळूं दे; त्याला शतायुषि कर; हरएक कामांत त्याला यश दे; नेहमीं सुखांत ठेव; त्याचा यशध्वज दिगंतरीं फडकूं दे; हें तुझ्यापाशीं आह्मां दीनजनांचें हात जोडून मागणें आहे. ( कांहीं थांबून ) हूं ! कुठें तो राजकार्यधुरंधर श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे आणि कुठें हा शागीर्द गोविंदा खर—जमीन अस्मानचें अंतर ! होता कांहीं आटल्या जन्मींचा ऋणानुबंध, तो ह्या जन्मीं फळास आला, झालें ! खरेंच, सज्जनाचें दास्य केलेलं पत्करलं, परंतु मूर्खाचें धनीपण नको. ( जाऊं लागतो व समोर पाहून ) हा समोरून कोण येत आहे बरें ? याचा तर याच ठिकाणीं येण्याचा रोंख दिसतो. आलाच हा. (एक **मराठा सरदार** येतो व **गोविंदास** मुजरा करून दूर उभा राहतो. त्यास) सरदारसाहेब, कोठून आलांत आपण ? या ठिकाणी आपल्याला कोणाच्या भेटीची इच्छा आहे ?

**सरदार**—भटजीमहाराज,

**साकी.**

श्रवणीं पडतां नाम जयाचें रिपु भयकंपित होतो ॥
जसा रानीं क्षुद्र पशूगण सिंहनाद ऐकुनि तो ॥

तो स्वामी अपुला ॥ सांगा कोणिकडे गेला ॥धृ०॥
मी खानदेशाकडून आलों. मला त्यांच्यांशीं कांहीं जरूरीचें काम आहे. कसेंही करून यावेळीं भेट झालीच पाहिजे.

**गो०**—जरा थांबा. गोटांतील लढाऊ लोकांची हालहवाल पाहण्याकरतां स्वारी गेल्याला घटका अधिक होऊन गेली. आत्तां इतक्यांत येतील.

**सर०**—( समोर पाहून ) अहो, ती सरकार स्वारीच इकडे येत आहे वाटतें ? होय तीच. अहाहा !

**पद.**—मला शांत मुनि०—

किती तेजयुत भासतो वीर मजला ॥ काय
उदयाचलीं सूर्य आला ॥ धृ० ॥ स्वर्गभुवना
त्यजुनि, अमरपति इंद्र हा ॥ मर्त्यलोकिं स्वयें
पातला कीं ॥ दंडधर काय हा मनुजरूपें
तसा ॥ कीं खरा मन्मना भास झाला ॥१॥

( **बाजीराव** येतो. )

**सर०**—( **बाजीरावास** मुजरा करून ) सरकारचा सदा विजय असो.

**बाजी०**—काय-कोठून आलां ?

**सर०**—( अदबीनें ) खानदेशाकडून आलों सरकार.

**बाजी०**—कशी काय बरें तिकडची हालहवाल ?

**सर०**—मोंगलांनीं देशांत धुंडावे मांडले आहेत; छत्रपति महाराजांचे मोकासबाबीचे हक्कसंबंधी वसूल होऊं देत नाहीत; ह्मणून मोकासदारांची पायांपाशीं विनंती आहे, कीं याविषयी योग्य तो बंदोबस्त करण्यास श्रीमंत पेशवे सरकार समर्थ आहेत.

**बाजी०**—असें कां व्हावें बरें ?

**सर०**—यांत फारसें नवल नाहीं. कारण,

**पद**.—पूरव, पच्छम, दख्खन, उत्तर०—

नक्षत्रावलि नभोमंडळीं तेजानियुक्ता दिसति किती ॥ परि व्हाया तमनाश तयांची शक्य न आहे दीप्ति रती ॥ ध्रु० ॥ अखिल जनांतरसुखकर जैसा कारण हा रवि एक तया ॥ आपण तैसे संहाराया यवन नराधम या जगतीं ॥ १ ॥

**बाजी**०—मोकासदारांनां आमचा असा निरोप जाऊन कळवा, कीं इतक्यांत खानदेशाकडे आह्मी वळतों. आपण आगखी कांहीं दिवस तसाच प्रयत्न करावा. ( **सरदार** मुजरा करून निघून जातो. ) मोंगलांचा सरदार दाऊदखान, याच्या गोटांतील बातमी काढण्याकरतां आप्पाला गेल्याला बराच वेळ झाला. अजून कां येऊं नये बरें ? ( कांहीं वेळ विचार करून ) ठीक; असेंच करूं. तो आला, कीं त्याला हें वर्तमान सांगून कांहीं फौजेनिशीं माळव्याकडे त्याची रवानगी करावी व आपण खानदेशाकडे वळावें. ( बाजूस पाहून ) कोण आहे रे तिकडे ? (एक **हुजऱ्या** येतो.)

**हुजऱ्या**–( हात जोडून ) मी आहें सरकार.

**बाजी**०–अरे, सुभेदारांना जाऊन सांग मीं बोलावलें आहे ह्मणून.

**हुजऱ्या**–(लवून) हुकुम सरकार. (आंत जाऊन सुभेदारासह येतो. त्यास ) हे पहा सरकार आपलीच वाट पहात आहेत.

**सुभेदार**–( मुजरा करून ) महाराज, बंदा बंदगीमें हाजिर हैं. हुक्म् होना.

**बाजी**०–सुभेदार, येथून परस्परें आपल्याला आतां खानदेशाकडे वळायचें आहे. कारण,

पद.—नाहिं सुभद्रा या०—

चोहिंकडे त्या देशिं आपुले शत्रु सबल
झाले ॥ अपराधाविण दीन पौरजन बहुपरि
गांजियले ॥ ध्रु० ॥ वीरांचें त्यांपुढें आमुच्या
कांहिं न बल चाले ॥ ध्यानीं न मनीं, मज
आतां हें वृत्त इथें कळलें ॥ १ ॥

ह्मणून 'आज रात्रीं इथचा मुक्काम हालायचा,' अशी सर्व सैनिकांनां वर्दी द्या; नेहमीं त्यांस सावध राहण्यास सांगा; आणि तुह्मांलाही पण हें ठाऊक असूं द्या, कीं शत्रु कपटविद्येंत मोठा कुशल आहे. त्याच्याशीं सामना फार तजवीजीनें झाला पाहिजे.

**सुभे०**—सच्, मोंगल बडे दगलबाज ! लेकिन् खाविंदके जाहांमर्दायिकेसामने इन्के तरवारोंका या अक्कल्का तेज गिर-नेवाला नहीं. हमारे सरकार एक पल्खमें उस् दुष्मनोंका निकाल कर देयेंगे ! नहीं -तो हमारेसरीखे रजपूत और मरठे लोगोंका वख्त्केपर क्या फायदा ? वो सब्केआगे आपनी समशीर दुष्म-नोंपे चलाके, उन्कों अलील करके छोडेंगे. सब्के पालन्वाले हमारे सरकार हीमत् देनेवाले तय्यार है.

**बाजी०**—बरें तर, सांगिल्याप्रमाणें जाऊन वर्दी द्या.

**सुभे०**—जो हुक्म्. ( मुजरा करून निघून जातो. )

**बाजी०**—( इकडे तिकडे पाहून ) गोविंदा, पाहिलेंस ? त्या समोरील डोंगराच्या पायथ्याशीं घरासारखें कांहीं दिसत असून, बरेच लोक सैरावरा धांवत असल्याचा मला भास होतो आहे. चल आपण त्याच्या शोधार्थ जाऊं. ( जातात. **सुभेदार** येतो. )

**सुभे०**—फौजके तमाम् सिपाहीयोंको पेसवेसरकारका यह हुक्म् है, के तरफ् मालवाके आना महकूब करके, खानदेसपर कुच् करना चाहते हैं. संजाको यहांसे कुच् होनेका—वास्ते सब

सिपाही लोगोंनें आपआपनें तय्यारींमें रहेना मंजूर हैं.

( जातो. **बाजीराव** व **गोविंदा** दोघे येतात. )

**बाजी०**—( चोहोंकडे व **गोविंदा**कडे पाहून )

**पद.**—साध्य नसे मुनिकन्या०—

फार मनोहर कैसें वन हें ॥ रम्योद्यानासम दिसताहे ॥ ध्रु० ॥ तरुवेष्टित त्या पाहुनि वल्ली ॥ ऐसें वाटे मज या काळीं ॥ कीं तरुणां युवतींनीं ॥ गाढालिंगन दिधलें आहे ॥ १ ॥ सज्जनरूपीं सुमतरुवर ते ॥ साहुनि रविकरखरतापातें ॥ श्रांत जनां रमवाया ॥ सिद्ध सदा, परि ज्यां सुख नोहे ॥ २ ॥

**गो०**—सरकार, हा सोसाट्याचा वारा, जणों काय आपल्या दिव्य खड्गानें सर्व प्राणिमात्रांवर प्रहार करीत आहे, असें वाटतें.

**बाजी०**—आणि त्यामुळें सांप्रत केवढा अनर्थ उडाला आहे पहा !

**पद.**—दूर मी झालें०—

तरुवर सारे, डोलति बारे, नमिति महावाता ॥ करिति तदार्चन, भासे बघुनी, नवकुसुमें गळतां ॥ खगकरुणारव कानीं पडतां, स्तविति तयातें, वाटे चित्ता ॥ १ ॥

अरे ! हा काय चमत्कार ! एवढा सोसाट्याचा वारा हा-क्षणांत नाहींसा झाला !

गो०—पण अकालीं पर्जन्यवृष्टि होण्याचीं चिन्हें आतां स्पष्ट दिसूं लागलीं. हे मेघ पहा निशाचरांप्रमाणें अंतरिक्षांत कसे चोहोंकडे हिंडत आहेत ते!

बाजी०—चला तर आपण आपल्या इच्छित स्थलीं लवकर जाऊं. ( चालूं लागतात. )

गो०—सरकार, अजून तें ठिकाण पुरतेंसें दिसलें नाहीं, तरी त्याच्या आसपासच्या एकंदर देखाव्यावरून तें फारच भयंकर असावें, अशी कल्पना होते.

बाजी०—हे आपण त्याच्या अगदीं जवळ येऊन पोहोंचलों. ( निरखून पाहून ) गोविंदा, तुझी कल्पना खरी आहे.

पद.—छायानट–त्रिवट.

वनपशु–खग–मनुजास्थीपंजर ॥ चोहिंकडे
या दिसती भूवर ॥ ध्रु० ॥ गृध्रादिक हे
मांसाहारी ॥ नाचताति बघ हर्षें भारी ॥
स्थान, न बघवे, कोण भयंकर ॥ १ ॥

गो०—मला वाटतें, चोरटे, भिल्ल या ठिकाणीं रहात असावेत. पशुपक्ष्यादि प्राण्यांचे व मनुष्यांचे वळी अंबाबाईला अर्पण करून तिला संतुष्ट केलें, कीं चौर्यकर्में कांहीं काळ बिन्धोक चालतात, अशी एक चमत्कारिक त्यांची समजूत बनून राहिली आहे. तोच प्रकार या ठिकाणीं माझ्या नजरेस येतो. ( दोघे दूर दिसत असलेल्या घरापाशीं येऊन पोंचतात. )

बाजी०—व: ! मघाशीं आपल्याला जें दुरून घरासारखें कांहीं दिसत होतें, तें हें घर नसून, लहानसें एक देवीचें देऊळ आहे. ( दोघे आंत डोकावतात. ) अरेरे ! हा तर पहिल्याहीपेक्षां भयंकर देखावा !!

**पद.**—मधुनि मधुनि ही०—

नरशिरकमलें ळोंबति येथें ॥ टपटप ज्यांतुनि
शोणित गळतें ॥ ध्रु० ॥ उग्र दिसे किति
मूर्ति तरी ही ॥ अष्टभुजांहीं, सिंदुर देहीं ॥
गळां मनुजमुंडमाळ रुळते ॥ १ ॥

अशा त्या आकस्मिक् दर्शन दिलेल्या मातेला आपलें गाऱ्हाणें सांगून, घटकाभर मनोभावानें तिची प्रार्थना करूं.

**गो०**—आई, अंबाबाई! (देवीस साष्टांग नमस्कार घालतो.)

**बाजी०**—( साष्टांग नमस्कार करून हात जोडून )

**पद.**–पंचकल्याणि वारु०–

अंबे महिषासुरमर्दिनी ॥ अपतित जनां प्र-
णयरूपिणी ॥ तूं नटलिस नारायणी।
विविध रूपांनीं ॥ टाकिलेस गोसुरतापि
असुर संहरुनी ॥ ध्रु० ॥ आई त्रिपुरसुंदरी
देवी ॥ विनती माझि तुवां परिसावी ॥
तुजपुढें अज्ञ मी मला। नीतिपथ दावीं ॥
मज सहाय हो दीनास संकटीं भावीं ॥ १ ॥
बलवान् रिपुशीं वैर कराया ॥ झालों तयार
मी या समयां ॥ परि दिसे न मज एकही।
आज लोकीं या ॥ जो तयार होउनि दावि
संगरीं शौर्या ॥ २ ॥ तव वरदानें भूप
शिवाजी ॥ झाला गाजी या क्षितिमाजी ॥
राखि तूं लाज कीं माझि। अंबिके आजी ॥
बलविहीन जाणसि दास तुझा हा बाजी ॥३॥

( इतक्यांत पडद्यांत कांहीं गलबला ऐकूं येतो. )

**बाजी**०—( ऐकून ) कशाचा गलबला बरें हा ?

**गो**०—सरकार, आपण सावध रहावें. ते पहा, कांहीं चोरटे या ठिकाणीं येत आहेत. त्यांचा हा गलबला—

**बाजी**०—येऊं द्या. भिऊं नका तुह्मी. ( आपली तरवार सरसावून उभा रहातो. )

(इतक्यांत झाडींतून शीळ घालीत दोघे **चोर** येतात. )

**पहिला चोर**—

लावणी.

भवानीच्या पारी । एक, आतां दुसरि ।
शिकार हांतीं आली गडच्या हातीं आली॥
आजूचि येळाच् बरी । आमां खरोखुरी ।
ऐक येडच्या माज्या गोष्ट मनांतली ॥धृ०॥
दिंस् झाल लई । बळि देउन्, जोगाई ।
अंबा दिस आतां जनुं रागा आली ॥
गडि दोगबि छान् । दिसूत्याती जवान् ।
मूर्त बगूनशान् ह्येचि करूं ऱ्हळी ॥ १ ॥

कायर मर्दा—

**दुसरा चोर**—ऱ्हाऊ दे?. असा या आंगाला उवा ऱ्ह तूं. ( तो तसें करतो. ) बग, पळून बिळून जात्याल.ा हूं, ऱ्हा तिथंच. त्यांस्नी भेवडाया मी जातुया म्होर. ( **बाजी-रावा**दि मंडळीपाशीं जाऊन ) कोन आहांर तुमी ?

**बाजी**०—आह्मी ब्राह्मण वाटसरू आहोंत.

**दुसरा**—( **गोविंदा**कडे पाहून ) आन् ह्यो ?

**बाजी**०—तोही ब्राह्मणच आहे.

**पहिला**—आन् कशापायीं आल्याती हितं ?

**बाजी**०–कां बरें ? तुला आमच्याविषयीं इतकी विचारपूस करण्याची कांहीं जरूर ?

**पहिला**–जरूर व्हय ? ठावं न्हाई का तुला आमी कोन आहोंत ते ?

**लावणी**.–अकडबाज हरिणांचि०–

तुज्यावानि कुनि वाटसरू या जंगलामदिं
गव्सतो ॥ अमाला ॥ लुटुन् त्यासनी पैसा-
अडका फस्त करुन् टाकतों ॥ ध्रु० ॥ बरा
वाटला छानछबकडा घराकड नेतों ॥
॥ स्वारिला ॥ आइ नवसा पांवते म्हनुन्
बग तिला बळी देतों ॥ १ ॥

**बाजी**०–पण गरीब भिक्षुक आह्मी. आमच्यापाशीं पैसा-अडका कोठून असणार ? बरें, तुझ्या म्हणण्याप्रमाणें तसें छान-छबकडें रूपही नाहीं आमचें. मग आह्मांपासून तुमच्या मंडळीला तादृश उपयोग तो काय होणार आहे ?

**पहिला**–असं काय म्हनूतुस् येड्यावानी !

**लावणी**.–दिलचमन्मे वीचू०–

अर दिस्तुस् तूं तर मोठा थोर सर्दार ॥
मंदील, अंगरखा, इजार् जशी जर्तार ॥
॥ ध्रु० ॥ काय् नोक झोंक हा, शिपायूवानि
तर्वार ॥ चेरावि हजारामदीं लई गुल्जार ॥
तूं गम्ति गडी––तुजं बग्नं, मुरडनं न्यारं ॥
कर आमासवादिन् गुमान् गाठोरं प्यारं ॥१॥

**बाजी**०–( तरवार उपसून त्याच्या आंगावर चालून जातो. ) हरामखोरा, फार गमजा लावल्या आहेस–हें घे तुला बक्षीस

देतों. (**दुसरा** चोर **बाजीरावाचे** आंगावर तुटून पडतो. त्यास **बाजीराव** ठार करतो. **पहिला** चोर पळून जातो.)

( **चिमणाजी आप्पा** येतो. )

**आप्पा**–( पाहून दचकून ) अरे ! हा काय गोंधळ !

**बाजी०**–कांहीं नाहीं. त्याचा निकाल लावून टाकला मीं.

**आप्पा**–पण अपूर्ता ! अजून यांपैकीं पांच सहा इसम कोठें तरी छपून आहेत. कारण,

**साकी.**

गुप्त बातमी काढाया रिपुसैन्यांतिल येथोनी ॥
जातां, अवचित कसें गांठिलें चोहिंकडुनि चोरांनीं॥
भिउनी मज न कळे॥ खल ते कोणिकडे गेले॥ध्रु०॥

परंतु तितक्या संधींत एकमेकांस ते हांका मारीत असतां एक विलक्षण प्रकार माझ्या लक्षांत आला.

**बाजी०**–तो कोणता बरें ?

**आप्पा**–त्यांपैकीं तिघे इसम जातीनें भिल्ल नसून, शूर मराठे-बच्चे दिसले; व हा नीच धंदा केवळ पोट भरण्याकरतां ह्मणून त्यांनीं पत्करला असावा, अशी मनाची समजूत झाली. कांहीं वेळानें विचारांतीं असेंही पण मला आढळून आलें, कीं ते माझ्या पूर्ण माहितींतले आहेत.

**बाजी०**–कोण बरें ?

**आप्पा**–पहिला, आपल्या बावांच्या हाताखालीं बारगिरीच्या नौकरीवर असलेला राणोजी शिंदे; दुसरा, सेनापति दाभाड्याचा सरदार कंठाजी बांडे, याचा आश्रित; आणि तिसरा, विश्वासराव पवाराचा मुलगा उदाजी, हा असावा. शौर्याचे मानानें तिघेही एकापेक्षां एक वरचढ आहेत.

**बाजी०**–तर असले हे शूर शिपाई जाणून नजरेआड करूं नयेत. त्यांचा अवश्य शोध केला पाहिजे. असो, पण अवचित या ठिकाणीं तुमचें येणें झालें, हें कसें ?

**आप्पा**–सांगतों. खानाकडील वर्तमान आपणास कळवावें, ह्मणून मोठ्या तांतडीनें आर्धी छावणी आटपली. अंत शिरतांच गोविंदासह या ठिकाणीं आपण आल्याची वर्दी लागली. तसाच माघारा फिरलों व धांवपळ करीत हें ठिकाण गाठलें—

**बाजी०**–( मध्येंच ) कसें काय वरें खानाकडील वर्तमान ?

**आप्पा**–तें कांहीं विचारूं नका अण्णा !

**पद**.–उत्तम जन्मा येउनि रामा०–

जिकडे तिकडे वेसावध ती अविंधचमु सारी॥ निशेमाजि अति धुंद सदोदित खानाची स्वारी ॥ धृ० ॥ परस्परामधिं पूर्ण असे तो कलहोद्भव झाला ॥ दुर्वर्तन त्यांचिया धन्याचें कारण हें त्याला ॥ हेर शत्रुचे फिरती याचें स्वप्न न कोणाला ॥ योग्य किती तरि समय कराया स्वारी त्यांजवरी॥१॥

**बाजी०**–आणि केव्हांचेच आह्मी तयार होऊन बसलों आहोंत. तुमची कांहीं फौजेनिशीं माळव्याकडे रवानगी करून, दाऊदखानाचा समाचार घेत असेच आह्मी खानदेशाकडे वळतों. मोंगल फार बळावले आहेत, अशी तेथील मोकासदारांकडील एका सरदारानें आत्तांच येऊन बातमी दिली. शिवाय, एक दोन महिन्यांनंतर साताऱ्यांत मोठा दरबार आहे, त्यावेळीं छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणें मला हजर व्हावें लागणारच; ह्मणून आज रात्रीं येथून निघण्याची तुमची तयारी असूं द्या. चला, सर्वांनीं आतां लवकर स्नानें आटोपून आपापल्या तयारीस लागावें.

पद.—सारंग—धमार.

प्रखरतर अति अळिजनीपति हा पहा माध्यानिं आला ॥ भासताहे निजशिरीं मणिटोप ज्यानें धरियलेला ॥ धृ० ॥ भक्ष सोडुनि पक्षि अवघे वृक्षशाखाश्रय करीती ॥ लपति अळि करिकर्णपाळीं, श्रांत वनपशु शोधिति जला ॥ १ ॥

( सर्व निघून जातात. )

**पहिला अंक समाप्त.**



# अंक २ रा.

## प्रवेश १ ला. स्थळ–रस्ता.

( शाहूराजाचे दरबाराकडे जात असलेला श्रीपतराव प्रतिनिधि येतो. )

प्रतिनिधि–राहून राहून त्या गोष्टीची आठवण झाली, कीं सर्वांगाचा भडका होऊन जातो! कांटे बोंचल्याप्रमाणें त्या वेदना मला दुःसह होतात! काय गुलामाच्या वल्गना तरी! केवढा बोलण्या चालण्याचा दिमाख! आत्मस्तुति तरी किती! त्या बाजीचें जें एवढें प्रस्थ माजलें आहे, त्याला कारण आमचा हा शाहूराजा. याला आंतले डावपेंच अद्याप चांगलेसे माहीत नाहींत. उघडच आहे. दिल्लीच्या देव्हाऱ्यांतून हे गुळाचे गणपति उचलून आणले, ते साताऱ्च्या देव्हाऱ्यांत परांच्या मऊ, ऊबदार गाद्यांवर आणून बसविले. राजकारण याच्या स्वप्नीं असणार कोठून! अष्टौप्रहर मिष्टान्न सेवन करावें, विलासादि प्रकारांत सदा निमग्न असावें व एखाद्या बाताड्या जवळ बसवून त्याच्या गोष्टी आनंदाच्या भरांत मोठ्या मौजेनें ऐकाव्यात, हा साऱ्या दिवसाचा याचा उद्योग! कांहीं असो; पण बाजीरावाच्या दैवाचाच सतारा कांहीं विलक्षण–कीं कोणचाही मनुष्य तेव्हांच त्याला वळतो. आमचे राजेसाहेब तर काय–त्या गोडबोल्याच्या वाग्मोहनीजालांत सांपडून सारखे डोलूं लागतात. कोणी कांहीं मग सांगो; कितीही बोलो; काकळूतीस येवो; लक्ष देतो कोण तिकडे! असे प्रसंग एक दोनदां नाहींत, शेंकडों वेळां माझ्या वांट्याला येऊन चुकले आहेत! येवोत–त्यांची पर्वा करून मी स्वस्थ बसणार नाहीं. या दरबारांत तरी त्या लफंग्या-

ची मात्रा काडीमात्र मी चालूं न देतां, त्याचे बेत वेळोवेळीं हाणून पाडीन. इतकेंच नव्हे–शाहूराजाचे कान अशा रीतीनें भरवून देईन, कीं तो कोंकण्यादेखील खूप समजून राहील–शेरास सव्वाशेर कोणी तरी आहेच आहे! तो बेत अनायासें आज सत्रा आणे जमून आला आहे! ( पाहून ) ही पहा, सरदार मंडळी मोठ्या लगबगीनें दरबाराकडे जाऊं लागली. आपणदेखील त्याच तयारीनें निघालों आहोंत. चला तर. ( चालत, मिशीला पीळ देत) बच्चाजी, तशी वेळ येऊं दे मात्र, कीं या राजकारणांत व राजघराण्यांत असा कांहीं गोंधळ उडवून देतों, कीं पहिले छूट तुझी किंमत या सातारचे दरबारांत कवडीमोल–तर माझें नाव श्रीपतराव प्रतिनिधि! ( जातो. )

---

## प्रवेश २ रा. स्थळ–दरबार.

(सिंहासनाच्या दोहोंबाजूनें **सरदार** मंडळी बसली आहे, तों **बाजीराव** व **प्रतिनिधि** दोघे येतात. त्यांस **सरदार** लोकांचे मुजरे होतात. थोड्या अवकाशानें पुढें **भालदार, चोपदार** ललकारत आहेत, अशा थाटानें **शाहूराजाची** स्वारी येते. सर्वांचे मुजरे होतात. राजा सिंहासनारूढ होतो. पडद्यांत **स्तुतिपाठकांचा** शब्द होतो. )

**पहिला स्तुतिपाठक**–जयजयकार महाराज!

**चूर्णिका.**

जैसें मदोन्मत्त होवोनि। स्वर्ग–मृत्यु–पाता-
लभुवनिं। देव, मानव दानवीं। कष्टवीले॥
॥ धृ० ॥ तैसें जई यवनराक्षसाधमी। अ-
खिल महाराष्ट्रभूमिं। दीन पौरवजनां।
त्राहि केलें॥ १ ॥ शत्रुचें संहरण व्हाया,

अमित । जन्मले वीर त्यांमाजि । धर्मरक्षक छत्रपति शिवराज पहिले ॥ २ ॥ तया क्षत्रियकुलावतंस नरवराचा । स्मरतां देहांतसमय । शोकातिवेगें नयनिं ये अश्रुजल । हृदय फाटे ॥ ३ ॥

**दुसरा स्तुतिपाठक**-छत्रपतींचा विजय असो !

**चूर्णिका.**

नयनिं ये अश्रुजल। हृदय फाटे, परी। त्याच अवसरिं आनंदभरिं। हृदय दाटताहे ॥चू०॥ ज्याचिया प्रखर बाहुबलदीप्तिं । दुष्टमतिराति ती । नष्ट या समयिं । झालि पाहे ॥१॥ ऐसा महा धीर, नरवीर गाजि । रणसिंह बाजी । आजि जयी । साह्य आहे ॥ २ ॥ ते हे गुणैश्वर्यमंडित । प्रजाजनकार्यरक्षणिं । छत्रपति शाहूमहाराज । शतायु व्हावे ॥३ ॥

**शाहू**—( ऐकून ) अहाहा! सांप्रत जें प्रत्येक गोष्टीत आमच्या वांट्याला यश येत चाललें आहे, त्याचे खरे उत्पादक—या साताऱ्चे गादीची ज्यांनीं एकनिष्ठपणें सेवा करण्याची प्रतिज्ञा केलेली असे—प्रतिनिधि व पेशवे यांसारखे गादीचे कट्टे अभिमानी सरदार व त्यांचे अनुयायी, हे होत. त्या यशाचें श्रेय आम्ही पेशव्यांस देतों. त्यांचा प्रताप अलौकिक आहे. आजपर्यंत आमची बाजू ते सारखी सांभाळीत गेले व पुढें सांभाळतील, यामुळें आज मोठी धन्यता वाटते ! कां पेशवे ? ( **बाजीरावाकडे हास्यमुद्रेनं** पहातो. )

**बाजीराव**--( उभा राहून भद्बीनें ) सरकार! माझी स्तुति करण्यापुरता तिला मी पात्र नाहीं. हा सर्व या चरणांचाच प्रताप. कारण, असें आहे–

**साकी.**

प्रातःकालीं स्वच्छ जलीं बहु कमल मनोरम दिसतें॥
कारण यातें अन्य असे, त्या विकसवि रविदर्शन तें॥
प्रताप सकलांचा ॥ अपुल्या पुण्यबळें साचा ॥ध्रु०॥

**शाहू**–छे, छे; पेशवे,

**पद.**–मांढ–दादरा.

भूपाल किती मजसम तरि राज्य हांकिती ॥
विजयाशा दृढ मानसिं नित्य ज्यांसिं ती ॥ध्रु०॥
दुर्मिळ कां सुयशलाभ त्यांसिं होत तो ॥
कां अविंधभार तयां फार गांजितो ॥ कीर्ति-
ध्वज आमुचाच लोकिं फडकतो ॥ या कारण
नरवीर तुह्मी, नाहिं मत्कृती ॥ १ ॥

कसेंही असो. तूर्त ही मोठ्या संतोषाची गोष्ट समजली पाहिजे, कीं आपणांसारखे कांहीं रणशूर सरदार सुदैवानें आज आमच्या पदरीं असून, ते या गादीची सेवा करण्यास एका पायावर तयार आहेत. कसें श्रीपतराव ?

**श्री० प्रति०**— ( उभा राहून मर्यादेनें ) महाराजांची पारख यथायोग्य आहे. परंतु पेशव्यांचा उत्तरेकडे जो सध्यां मोंगलांवर स्वारी करण्याचा आग्रह आहे, तो कितपत आह्मांला फायदेशीर होईल, याविषयीं मात्र दोन शब्द मला बोलायचे आहेत.

**शाहू**—बोला. आज दरबार भरविण्याचें कारण तेंच आहे. खुशाल बोला.

**प्रति०**—आपल्या शौर्यतेजानें, बुद्धिबलानें व अलौकिक गुणानें ज्यांनी या मराठीराज्याचा झेंडा चोहोंकडे फडकवून छत्रपति महाराजांचा यशोदुंदुभि अहोरात्र सुरू ठेवला, त्या आमचे बाळाजीपंत पेशवे पंतप्रधान यांचा—केवळ आमच्याच दुर्दैवानें—अंत झाल्यावर त्यांच्यामागें त्यांचे चिरंजीव बाजीराव हे कारभार पाहूं लागले. आजपर्यंत बाजीरावांनीं बऱ्याच मोहिमा करून मोंगल शत्रूला जेरीस आणलें. त्यांचें शौर्य लोकोत्तर आहे. नंगी समशेर इच्याखेरीज अन्य सुखवस्तु त्यांना भासत नाहीं. बरोबर आहे—'यथाबीजं तथांकुरः'! सिंहाचाच छावा तो, तो काय मत्त झालेल्या हत्तीचें गंडस्थल विदीर्ण केल्यावांचून राहणार आहे! परंतु याचवेळीं उत्तरेकडे स्वारी करण्याचा त्यांचा बेत सर्वांशीं यथार्थ आहे, असें माझ्या समजूतीला तरी निदान वाटत नाहीं. मी हा दुराग्रह समजतों. आमचा पक्ष किती निर्बल! किती गोष्टींनीं तरी आमची बाजू कमजोर! राज्यांत पुरतीशी स्वस्थता नाहीं; मोंगल दाराशीं येऊन टेपला आहे; चव्हाण, घोरपडे, सावनूरकर आदिकरून कोल्हापूरकर संभाजीराजे यांचे हितचिंतक, कृष्णेच्या अलिकडे फळी धरून बसल्यानें, कर्नाटकांतील मोकासबाबीचे हक्क वसूल करण्यासाटीं फौजेनिशीं गेलेल्या फत्तेसिंग भोंसल्यांची नदीपार जाण्याची छाती होत नाहीं! ही आजमितीला आमची स्थिति आणि पेशव्यांचा अशा वेळीं हा निरर्थक हट्ट, ह्मणजे तूर्तच्या प्रसंगी केवढा वेडेपणा! तेव्हां मी ह्मणतों, आधीं आपल्या ताब्यांत असलेल्या मुलुखाची नीट व्यवस्था लावावी व काळवेळ पाहून, संधी राखून, नंतर नवा मुलूख काबीज करण्याचे भरीस पडावें. आपल्या आंगीं कुवत आहे, तर वाटेल तें वाटेल त्यावेळीं हाणून पाडतां येईल. हें ह्मणजे मी—माझ्या आंगीं सामर्थ्य नाहीं ह्मणून, अथवा, कोणाला भिऊन बोलतों, असें कोणीं समजूं नये. हें राजप्रकरण पडलें. त्याच्या साधकबाधकाचा विचार

वेळींच झाला पाहिजे; ह्मणून महाराजांस दोन शब्द ऐकण्याची तसदी दिली.

**शाहू**—पेशवे, प्रतिनिधींचें भाषण ऐकलेंत ना ?

**बाजी०**—( अदबीनें ) दयावंत ! स्वमुखानें आत्मस्तुति करण्याचा प्रसंग आज मजवर यावा, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट मी समजतों. सरकार, आजपर्यंत—

**पद.**—हलवल तो अश्व वेगें०—

नृपनियमें वागलों मी, नच इच्छेच्या बळें ॥
दुर्व्यसना किमपि नाहीं, सुजनातें सेविलें ॥
कधिं नाहीं मानसा या, वर शस्त्रा उचलिलें ॥
नच वपुला, सुकृतीतें प्रतिदिवशीं राखिलें ॥ १ ॥

हें ह्मणजे मी स्वतःच्या केवळ फायद्याकडे लक्ष देऊन केलें असें नाहीं; तर शिवाजीमहाराजांनीं संपादलेला लौकिक कायम राखून, त्यांचा भगवा झेंडा चोहोंभागीं फडकवून, छत्रपति महाराजांचा सुयशोदुंदुभि दिगंतरीं दुमदुमून टाकावा, हिंदुजनांस दुःखविमुक्त करावें, यवनांचें निर्मूलन करून स्वधर्माची स्थापना करावी आणि केलेल्या प्रतिज्ञेंतून पार पडावें, एतदर्थ होय. परंतु आमच्या प्रतिनिधींना काय यांत गौणपक्ष दिसला असेल तो असो. त्यांचें भाषण ऐकून चमत्कार वाटतो ! हातांत जपमाळ धरून आजचें काम ते उद्यांवर ढकलीत आहेत; परंतु मी मुख्य प्रधान या नात्यानें, जनापवादास भिऊन, प्रसंगाला उचित असे दोन शब्द बोलतों, त्याची प्रतिनिधींनीं क्षमा करावी. श्रीपतरावजींना स्वकीय व परकीय राज्यसंबंधीं हालहवाल आणि ‘ हिंदुपदपादशाह ’ हा बडेजावी किताब, या शब्दांचाच खरा अर्थ आधीं चांगलासा माहीत नाहीं. त्यांनीं एकंदर गोष्टींचा पोक्तपणें विचार केला, ह्मणजे त्यांचें त्यांनाच कळून

येईल, कीं उत्तरेकडे मोंगलांवर स्वारी करण्यास हाच वक्त उत्तम आहे.

**शाहू**--पेशवे, प्रतिनिधि हे आपणासारखेच या सातारचे दरबारांत एक हुशार मुत्सद्दी आहेत. त्यांचे पोक्त विचार आज अगदींच पालटले, असें एकाएकीं आमच्यानें ह्मणवत नाहीं.

**प्रति०**—आणि प्रतिनिधींचा अविचार चांगलाच पेशव्यांचे नजरेस येऊन चुकला, ही तरी मोठ्या समाधानाची गोष्ट मी समजतों. गादीचे कट्टे अभिमानी, हिंदुजनांचे पूर्ण कैवारी, अविंधद्वेष्टे, धर्मसंरक्षक आणि स्पष्टवक्ते आमचे पेशवे, सर्वांचे उपदेशक बनल्यानें स्वर्ग आज आह्मांला दोन बोटें उरला आहेसें वाटतें! महाराजांच्या बोलण्याचें पेशव्यांना कदाचित् थोडें वैषम्य वाटलें असेल; परंतु मी आग्रहानें असें सुचवितों, कीं पोकळ बाता झोंकून पैशाची, प्राणांची व तज्जन्य अब्रूची हानि करून घेण्यापेक्षां, आमच्या मुलुखांतील यवनांच्या वाटाच आधीं आज्ञी बंद करून टाकाव्यात; लहान सहान बंडें उद्भवलीं आहेत, त्यांचा बींमोड करावा; कर्नाटकांत स्वारी करून तिकडला आपला प्रांत आपल्या ताब्यांत घ्यावा; चौथाई, सरदेशमुखी हे हक्क वसूल करावेत; फत्तेसिंग भोंसले यांस कृष्णेच्या पलिकडे न्यावें; नंतर उत्तरेकडे विनतक्रार त्यांनीं धांव घ्यावी. अहो, सध्यां आमच्या आंगीं लहानसें बंड मोडण्याचीदेखील कुवत नाही, ते आह्मी निजामासारख्या बलिष्ट शत्रूशीं टक्कर देऊं पहात आहों; ह्मणजे साराच चमत्कार! 'तूप खातांच रूप पहावें,' या पेशव्यांचे नियमाचा चमत्कार न वाटतां, या प्रसंगीं हंसूं येतें!

**शाहू**—हूँ, प्रतिनिधि, कोणच्याही प्रकरणाचा वादविवाद अशा रीतीनें न झालेला फार बरा. अशा हमरीतुमरीनें हातीं घेतलेल्या कामाची हेळसांड होणार आहे.

**बाजी०**—कशाला ! प्रतिनिधींची बोलणीं आह्मांला सर्व कळतात. आमचे बेत सर्वस्वीं ह्मणून पाडावेत, याखेरीज त्यांचा अन्य हेतु नाहीं. त्यापेक्षां महाराजांनींच मला 'झाली तितकी गादीची सेवा पुरे आहे' ह्मणून सांगावें, कीं या मराठी राज्याला अखेरचा मुजरा ठोकून, एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं जाऊन, विरक्तपणांत राहिलेले आयुष्याचे दिवस कंठतों. प्रतिनिधींसही हें एक फायदेशीर कलम होणार आहे. मग मात्र हातीं धरलेली जपमाळ एकाबाजूस ठेऊन,

**पद**.—नाहिं सुभद्रा या०—

शस्त्र घेउनी हातिं तयांनीं समरांगणिं जावें ॥
स्वीकारुनि सैन्याधिपत्य, ते खलरिपु दंडावे॥ध्रु०॥
धन-लौकिकसांभाळ करोनी सज्जन रक्षावे ॥
चौथाई-सरदेशमुखीस्वामित्व पदरिं घ्यावें ॥
कृष्णेच्या जें ऐल तीरिं, तें सैन्य पार न्यावें ॥
छत्रपतींच्या तोषा कारण शेवटिं कीं व्हावें ॥ १ ॥

महाराजांचा हुकूम होण्याचाच अवकाश—ही मीं आपली तरवार खालीं ठेवली—

**शाहू**—छे, छे; पेशवे, निकरावर येऊं नका. तुह्मीं केलेली प्रतिज्ञा लक्षांत आणा; आपला हेतु तडीस न्या; आणि मग—

**प्रति०**—मी तरी तेंच ह्मणतों, कीं हेतुपूर्णता होण्यासाठीं हरएक गोष्ट आह्मांला दमानें घेतली पाहिजे. शत्रु बलाढ्य असून शिवाय कधींच बेसावध नसतो; ह्मणून आपल्या बलाबलाचा विचार आपणांस आधीं कर्तव्य आहे.

**बाजी०**—( मान डोलवून ) ठीक ! हें श्रीपतरावजींचें परराज्यासंबंधानें ज्ञान ! अहो, या वेळीं आमचा शत्रु तर—

पद.—महाश्वेता नये झडकरि०—

कुटिल वारांगनागानीं ॥ आणि वारुणिपानिं
निशिदिनिं ॥ राहिलेला गुंग होउनि ॥ ती
खरी स्थिति काय सांगावी ॥ ध्रु० ॥ सर्व
सेना सर्व हतबळ ॥ अन्न अथवा, प्यावया
जल ॥ नाहिं, तेणें फार व्याकुळ ॥ छत्रप-
तिनीं ध्यानिं आणावें ॥ १ ॥

आणि या विद्यमान कालीं आह्मी कमकुवत आहोंत, या प्रतिनिधींच्या ह्मणण्याचादेखील थोडा बहुत विचार करावा. सरकार, मी खातरीनें सांगतों, कीं आमच्यापाशीं असलेले मराठे लढाईच्या कामाला मोठे कडवे शिपाई आहेत. तिकडे गुजराथेंत त्रिंबकराव दाभाड्यांची सरशी होत चालली आहे. हे जिवाला जीव देणारे शिंदे, होळकर आदिकरून शूर सरदार, नंगी समशेर हातांत घेऊन केवळ आज्ञेची वाट पहात आहेत. अशावेळीं महाराजांनीं मला उत्तरेकडे जाण्याचा हुकूम द्यावा—आपल्या सैन्याचा गराडा देऊन निजामाला जेरीस आणतों! त्याच्या सैन्याची वाताहात करून, देशचे देश उध्वस्त करून, काबीज करून टाकतों! अरे! यापूर्वीं मुसलमान, फिरंगी, शिद्दी वगैरे नीच लोकांनीं केलेला आमचा छळवाद अजून कोणाच्या स्मरणांतून गेला नसेल!!

पद.—प्रतिकूल होइल०—

मूर्ति सोमनाथाची ती भंगिली तयांनीं ॥
धर्मभ्रष्ट केले हिंदू, वालि नच ह्मणोनी ॥ध्रु०॥
सत्कुलीन अबलाव्रत तें नेलें लयाला ॥
लीन दीन होउनि त्यांनीं प्राणनाश केला ॥

चोहिंजागिं ऐसा जेव्हां हाहाःकार झाला ॥
देश, धर्म शिवरायांनीं रक्षियेलिं दोनी ॥ १॥

त्या अकांडतांडवाचें स्मरण झालें, कीं कोपाग्नीनें हृदय होरपळून जातें ! असें वाटतें—या वेळेस काय करावें नि काय नाहीं !! ( आवेशानें ) सरकार, आज्ञा द्या—या प्रसंगीं ' होय ' ह्मणा—पाहिल्याच स्वारीला उत्तरेकडील मुलूख हस्तगत करून घेतों ! देशांत स्वप्नाला मोंगलांचें ठाणें राहूं देत नाहीं !!

**शाहू**—( आनंदानें ) शाबास ! पेशवे, वडिलांमागें त्यांचा नांवलौकिक तुह्मी राखाल, अशाबद्दल आमची खात्री झाली ! तुमचा बेत दरबारच्या पसंतीस आला ! तरी स्वेच्छेनुरूप—

**पद**.—झंपा.

प्रबल रणधीर ते वीर घेउनि सवें ॥
इच्छित स्थलिं तुह्मीं आज जावें ॥ ध्रु० ॥
समरिं जिंकूनि अरि, कीर्ति जोडा बरी ।
दुःखिजन यांवरी लक्ष द्यावें ॥
साह्य आह्मी असों, नित्य हें मनिं वसो ।
छत्रपतिकार्य कीं सफल व्हावें ॥
विजयि होवोनियां नगरिं यावें ॥
सज्जनीं तूमचें सुयश गावें ॥ १ ॥

(**शाहू** सिंहासनावरून उतरतो. दरबार बरखास्त. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ३ रा. स्थळ—रस्ता.

( विचार करीत असलेला **प्रतिनिधि** येतो. )

**प्रतिनिधि**—पाहिलें? शेवटीं माझ्या ह्मणण्यासारखेंच झालें !

पद.—महाश्वेता नये झडकरि०—

कुटिल वारांगनागानीं ॥ आणि वारुणिपानिं
निशिदिनिं ॥ राहिलेला गुंग होउनि ॥ ती
खरी स्थिति काय सांगावी ॥ ध्रु० ॥ सर्वे
सेना सर्व हतबल ॥ अन्न अथवा, प्यावया
जल ॥ नाहिं, तेणें फार व्याकुल ॥ छत्रप-
तिंनीं ध्यानिं आणावें ॥ १ ॥

आणि या विद्यमान कालीं आह्मी कमकुवत आहोंत, या प्रतिनिधींच्या ह्मणण्याबद्दलखील थोडा बहुत विचार करावा. सरकार, मी खातरीनें सांगतों, कीं आमच्यापाशीं असलेले मराठे लढाईच्या कामाला मोठे कडवे शिपाई आहेत. तिकडे गुजराथेंत त्रिंबकराव दाभाड्यांची सरशी होत चालली आहे. हे जिवाला जीव देणारे शिंदे, होळकर आदिकरून शूर सरदार, नंगी समशेर हातांत घेऊन केवळ आज्ञेची वाट पहात आहेत. अशावेळीं महाराजांनीं मला उत्तरेकडे जाण्याचा हुकूम द्यावा—आपल्या सैन्याचा गराडा देऊन निजामाला जेरीस आणतों ! त्याच्या सैन्याची वाताहात करून, देशचे देश उध्वस्त करून, काबीज करून टाकतों ! अरे ! यापूर्वीं मुसलमान, फिरंगी, शिद्दी वगैरे नीच लोकांनीं केलेला आमचा छळवाद अजून कोणाच्या स्मरणांतून गेला नसेल ! !

पद.—प्रतिकूल होइल०—

मूर्ति सोमनाथाची ती भंगिली तयांनीं ॥
धर्मभ्रष्ट केले हिंदू, वालि नच ह्मणोनी ॥ ध्रु० ॥
सत्कुलीन अबलाव्रत तें नेलें लयाला ॥
लीन दीन होउनि त्यांनीं प्राणनाश केला ॥

चोहिंजागिं ऐसा जेव्हां हाहाःकार झाला ॥
देश, धर्म शिवरायांनीं रक्षियेलिं दोनी ॥ १॥

त्या अकांडतांडवाचें स्मरण झालें, कीं कोपाग्नीनें हृदय होरपळून जातें! असें वाटतें–या वेळेस काय करावें नि काय नाहीं!! ( आवेशानें ) सरकार, आज्ञा द्या–या प्रसंगीं 'होय' म्हणा–पाहिल्याच स्वारीला उत्तरेकडील मुलूख हस्तगत करून घेतों! देशांत स्वप्नाला मोंगलांचें ठाणें राहूं देत नाहीं!!

**शाहू**–( आनंदानें ) शाबास! पेशवे, वडिलांमागें त्यांचा नांवलौकिक तुम्ही राखाल, अशाबद्दल आमची खात्री झाली! तुमचा बेत दरबारच्या पसंतीस आला! तरी स्वेच्छेनुरूप—

**पद**.–झंपा.

प्रबळ रणधीर ते वीर घेउनि सर्वे ॥
इच्छित स्थलिं तुह्मीं आज जावें ॥ ध्रु० ॥
समरिं जिंकूनि अरि, कीर्ति जोडा बरी ।
दुःखिजन यांवरी लक्ष द्यावें ॥
साह्य आह्मी असों, नित्य हें मनिं वसो ।
छत्रपतिकार्य कीं सफल व्हावें ॥
विजयि होवोनियां नगरिं यावें ॥
सज्जनीं तूमचें सुयश गावें ॥ १ ॥

(शाहू सिंहासनावरून उतरतो. दरबार बरखास्त. पडदा पडतो.)

## प्रवेश ३ रा. स्थळ–रस्ता.

( विचार करीत असलेला प्रतिनिधि येतो. )

**प्रतिनिधि**–पाहिलें? शेवटीं माझ्या म्हणण्यासारखेंच झालें!

शाहूला पण कसा बेतावर आणला त्यानें ! शाबास ! पेशव्याची याबद्दल करावी तितकी तारीफ थोडी आहे ! यापुढें आतां आह्मी कितीही आरडलों ओरडलों, तरी कांहींसुद्धां वळायचें नाहीं. उलट आमच्या बोलण्याची किंमत भरदरबारांत होऊन, फट्फजितीला मात्र तें कारण होणार. तर हें असें नको. एखादें नवीनच बस्तान बांधायची युक्ति आतां लढविली पाहिजे. कसें बरें ? ( विचार करतो व आठवल्यासारखें करून ) हं, असें हें घडून यायला पाहिजे, तर काम बेमालूम ! त्या जाधवरावाला हरएक तऱ्हेनें एकदांचा वश करून घ्यावा, कीं तो बहाद्दर कोल्हापूरकर संभाजी राजाचे मनांत माझी गोष्ट चांगल्याच रीतीनें भरवून देईल. ते पडले मराठे बच्चे आणि आमच्या राजाचे प्रतिस्पर्धि–त्यांनां ह्या बाजीराव कोंकण्याची पोकळ घमेंड कधींच सहन व्हायची नाहीं. अर्थात् ते याचा द्वेष करतील. आंतून त्या निजामाचेही कान फुंकून ठेवावेत; ह्मणजे आपलें बस्तान कुठें थोडें बसलें ! असो. आज उद्यांकडे मातुश्री राधाबाईच्या दर्शनासाठीं बाजीराव पुण्यास जाणार आहे. तेथें इष्टमित्रांची भेट घेतां घेतां सहज त्याचा आठवडा निघून जाईल; तेवढा वेळ आपल्या कामाला बरा आहे. चला तर, प्रथम जाधवरावाचीच भेट घेण्याच्या तजवीजीला लागूं; नंतर पुढचा विचार. ( जातो. )

---

## प्रवेश ४ था. स्थळ–काशीबाईचा महाल.

( **काशीबाई** गौरीहराची पूजा करीत बसली आहे. जवळ **परिचारक** हात जोडून उभे आहेत. )

**काशीबाई**—( पूजा आटोपून, हात जोडून )

**पद**.—तव मानस कसें०—

जगदंबे देवि भवानि आई बलदायिनी ॥ मी

अबला काय तुला प्रार्थू कर जोडुनी ॥चाल॥
लेश दया तव असतां उदया येइ नराचें
भाग्य ॥ तेविं सदा तूं रक्षिसि आम्हां प्रम-
दांचें सौभाग्य ॥ तुजविण नाहीं कुणी ॥१॥

आईग !

**पद**.—आर्या तीच असे पदाची०—

चैन जिवा नाहीं कसें तें रात्रंदिन भय वा-
टतें ॥ मनीं विलक्षण कल्पना ये, कोमल
हृदया जाळिते ॥ध्रु०॥ दूर वसति पति मजपा-
सुनि मग सौख्य खरें मज काय तें ॥ शत्रुजनीं
तूं रक्षि तयांतें, मी तरि अन्य न याचितें ॥१॥

**अंजनीगीत.**

विरहानलिं मी एकलि येथें। दुःखातिशयें दिन कंठीतें।
जाणुनि ज्याचें काळिज तुटतें। जगिं तो एक असा ॥१॥

भटजी, माझी जपाची माळ द्या. ( ती घेऊन जप करते. नंतर वर पाहून, हात जोडून )

**पद**.—आवो आवो रंगेला०—

रक्षीं माझ्या दयाळा, प्रियनाथांसीं ॥ ध्रु० ॥
रिपुमर्दनीं बल देउनी। समरीं सदोदित येउं
दे यश त्यांजसीं ॥ १ ॥ स्वातिसलिला
जसि चातकी। झालें उतावीळ दर्शना मीही
तसी ॥ २ ॥

( उठून प्रदक्षिणा करूं लागते. )

( **गोविंदास** ) आज साताऱ्याकडील कांहीं बातमी आहे का गोविंदभटजी ?

शाहूला पण कसा वेतावर आणला त्यानें ! शावास ! पेशव्याची याबद्दल करावी तितकी तारीफ थोडी आहे ! यापुढें आतां आह्मी कितीही आरडलों ओरडलों, तरी कांहींसुद्धां वळायचें नाही. उलट आमच्या बोलण्याची किंमत भरदरबारांत होऊन, फटफजितीला मात्र तें कारण होणार. तर हें असें नको. एखादें नवीनच बस्तान बांधायची युक्ति आतां लढविली पाहिजे. कसें बरें ? ( विचार करतो व आठवल्यासारखें करून ) हं, असें हें घडून यायला पाहिजे, तर काम बेमालूम ! त्या जाधवरावाला हरएक तऱ्हेनें एकदांचा वश करून घ्यावा, कीं तो बहाद्दर कोल्हापूरकर संभाजी राजाचे मनांत माझी गोष्ट चांगल्याच रीतीनें भरवून देईल. ते पडले मराठे बच्चे आणि आमच्या राजाचे प्रतिस्पर्धि-त्यांनां ह्या बाजीराव कोंकण्याची पोकळ घमेंड कधींच सहन व्हायची नाहीं. अर्थात् ते याचा द्वेष करतील. आंतून त्या निजामाचेही कान फुंकून ठेवावेत; ह्मणजे आपलें बस्तान कुठें थोडें बसलें ! असो. आज उद्यांकडे मातुश्री राधाबाईच्या दर्शनासाठीं बाजीराव पुण्यास जाणार आहे. तेथें इष्टमित्रांची भेट घेतां घेतां सहज त्याचा आठवडा निघून जाईल; तेवढा वेळ आपल्या कामाला बस्स आहे. चला तर, प्रथम जाधवरावाचीच भेट घेण्याच्या तजवीजीला लागूं; नंतर पुढचा विचार. ( जातो. )

---

## प्रवेश ४ था. स्थळ-काशीबाईचा महाल.

( **काशीबाई** गौरीहराची पूजा करीत बसली आहे. जवळ **परिचारक** हात जोडून उभे आहेत. )

**काशीबाई**—( पूजा आटोपून, हात जोडून )

**पद**.—तव मानस कसें०—

जगदंबे देवि भवानि आई बलदायिनी ॥ मी

अबला काय तुला प्रार्थूं कर जोडुनी ॥चाल॥
लेश दया तव असतां उदया येइ नराचें
भाग्य ॥ तेविं सदा तूं रक्षिसि आह्मां प्रम-
दांचें सौभाग्य ॥ तुजविण नाहीं कुणी ॥१॥

आईग !

पद.—आर्या तीच असे पदाची०—

चैन जिवा नाहीं कसें तें रात्रंदिन भय वा-
टतें ॥ मनीं विलक्षण कल्पना ये, कोमल
हृदया जाळिते ॥ध्रु०॥ दूर वसति पति मजपा-
सुनि मग सौख्य खरें मज काय तें ॥ शत्रुजनीं
तूं रक्षि तयांतें, मी तरि अन्य न याचितें ॥१॥

अंजनीगीत.

विरहानलिं मी एकलि येथें। दुःखातिशयें दिन कंठीतें।
जाणुनि ज्याचें काळिज तुटतें। जगिं तो एक असा ॥१॥

भटजी, माझी जपाची माळ द्या. ( ती घेऊन जप करते. नंतर वर पाहून, हात जोडून )

पद.—आवो आवो रंगेला०—

रक्षीं माझ्या दयाळा, प्रियनाथांसीं ॥ ध्रु० ॥
रिपुमर्दनीं बल देउनी। समरीं सदोदित येउं
दे यश त्यांजसीं ॥ १ ॥ स्वातिसलिला
जसि चातकी। झालें उतावीळ दर्शना मीही
तसी ॥ २ ॥

( उठून प्रदक्षिणा करूं लागते. )

( गोविंदास ) आज साताऱ्याकडील कांहीं बातमी आहे का गोविंदभटजी ?

**गो०**–होय. आईसाहेब मघां ह्मणत होत्या, कीं स्वारी साताऱ्याहून निघाली, आज बहुशा येईल, ह्मणून आत्तांच सांडणीस्वार सांगून गेला.

**काशी०**–आपली इकडे रवानगी करून परस्परें साताऱ्यास गेल्याला आज सुमार पंध्रवडा झाला असेल, नाहीं का?

**गो०**–हो. परवांच स्वारी येऊन दाखल व्हायची; परंतु कांहीं विशेष कामाच्या अडचणीमुळें एक दोन दिवस लागले असावेत ज्यास्त.

**काशी०**–( ऐकल्यासारखें करून ) पहा बरें, आंतल्या दालनांत आलें आहेसें वाटतें कुणी. ( **गोविंदा** आंत जातो. **गोपिकाबाई** येते. )

**गोपिकाबाई**–काय चाललें आहे?

**काशी०**–तुह्मी का गोपिकाबाई? ( गौरीहरास नमस्कार करून ) या; आटपलें माझें. इकडे कुणीकडे आज वाट चुकलांत? नाहीं तर कारणावांचून वाड्यांत यायला तुह्माला फुरसत असायची. आपल्या येण्याचें कारण आलें लक्षांत! (**गोविंदास**) भटजी, पूजेचं सामान आंत घ्या तेवढें. ( **गोपिकाबाईस** ) खरें ना मी ह्मणतें तें?

**गोपि०**–काय बाई बोलाल तें खरें. खरें ह्मणाल तर काडीचीदेखील फुरसत नाहीं मला. कांहींना कांहीं आपलें आहेच पाठीमागें.

**काशी०**–हो तर! असे कांहीं तुलाच आतां कामाचे गाडे ओढावे लागत असतील ते!

**गोपि०**–खरेंच! मला उष्टीं काढावीं लागत नाहींत, कीं धुणीं धुवावीं लागत नाहींत, कीं केरपोतेरें करावें लागत नाहीं; पण देखरेखेखालींच माझा दिवस जातो. हाताखालच्या माणसांवर आपला दाब नाहीं, तर काम बिनचूक होतें कसें? तुह्मां श्रीमं-

तांचें थोडेंच तसें आहे ! हुकूम करायची मेली खोटी, कीं शें-कडों दासदासी हात जोडून पायांपाशीं तयार आहेत.

**काशी०**–(हंसून) वरीच किंग गोपिके बोलायला शिकलीस !

**गोपि०**–पण सांगा मला, नाहीं ह्मणायला आज कोणच्या गोष्टीची कमतरता तुह्मांला आहे ? अहो, तुमच्यासारखें सुख राजाच्या एखाद्या पट्टराणीला नसेल !

**काशी०**–हो, मी खातें सवरतें, सर्व कांहीं करतें; चांगली धडधाकड आहें; पण मला जो हृद्रोग लागला आहे, त्याची कल्पनादेखील नाहींग तुला ! गोपिके,

**पद**.–धाडुनि दिधलें दासीसह मीं पत्र०–

मज्जनु झालें ख्यात कुलीं, मी प्रिय बहु आप्तजनां, ते ॥ समान पाहुनि अर्पण करिती मज जनमान्य वरातें ॥ धृ० ॥ पति-प्रेमाची साक्ष खरी हें वैभवसुख भोगाया ॥ परि वाटे तें निष्फल सारें, कांहिं नको समयीं या ॥ सर्वस्वीं आधार मला जी मूर्ति न ती या ठायां ॥ रविदर्शन जर नाहिं कशी मग कमलिनि विकसित होते ॥ १ ॥

**गोपि०**—खरेंच ! देव सध्यां आमच्यावर कोपला आहे ! त्याला तिळमात्र दया असती, तर असें हें कां घडून येतें !

**काशी०**—नाहींग. असें व्हायला कारण देव नाहीं—

**गोपि०**—कोण तर मग बाई ?

**काशी०**—असें पहा गोपिके,

**पद**.–शाखा सद्गुण जया पालवी०–

वसंतकाळीं करीर तरुला पर्ण मुळीं तें नसे॥ त्या समयीं अपराध खरोखर काय ऋतूचा

**गो०**–होय. आईसाहेब मघां ह्मणत होत्या, कीं स्वारी साताऱ्याहून निघाली, आज बहुशा येईल, ह्मणून आत्तांच सांडणीस्वार सांगून गेला.

**काशी०**–आपली इकडे रवानगी करून परस्परें साताऱ्यास गेल्याला आज सुमार पंध्रवडा झाला असेल, नाहीं का ?

**गो०**–हो. परवांच स्वारी येऊन दाखल व्हायची; परंतु कांहीं विशेष कामाच्या अडचणीमुळें एक दोन दिवस लागले असावेत ज्यास्त.

**काशी०**– ( ऐकल्यासारखें करून ) पहा बरें, आंतल्या दालनांत आलें आहेसें वाटतें कुणी. ( **गोविंदा** आंत जातो. **गोपिकाबाई** येते. )

**गोपिकाबाई**–काय चाललें आहे ?

**काशी०**–तुह्मी का गोपिकाबाई ? ( गौरीहरास नमस्कार करून ) या; आटपलें माझें. इकडे कुणीकडे आज वाट चुकलांत ? नाहीं तर कारणावांचून वाड्यांत यायला तुह्मांला फुरसत नसायची. आपल्या येण्याचें कारण आलें लक्षांत ! (**गोविंदास**) भटजी, पूजेचें सामान आंत घ्या तेवढें. ( **गोपिकाबाईस** ) खरें ना मी ह्मणतें तें ?

**गोपि०**–काय बाई बोलाल तें खरें. खरें ह्मणाल तर काशीचीदेखील फुरसत नाहीं मला. कांहींना कांहीं आपलें आहेच पाठीमागें.

**काशी०**–हो तर ! असे कांहीं तुलाच आतां कामाचे गाडे ओढावे लागत असतील ते !

**गोपि०**–खरेंच ! मला उष्टीं काढावीं लागत नाहींत, कीं धुणीं धुवावीं लागत नाहींत, कीं केरपोतेरें करावें लागत नाहीं; पण देखरेखेखालींच माझा दिवस जातो. हाताखालच्या माणसांवर आपला दाब नाहीं, तर काम बिनचूक होतें कसें ? तुह्मां श्रीमं-

तांचें थोडेंच तसें आहे ! हुकूम करायची मेली खोटी, कीं शें-कडों दासदासी हात जोडून पाशींपाशीं तयार आहेत.

**काशी०**–(हंसून) बरीच किंग गोपिके बोलायला शिकलीस !

**गोपि०**–पण सांगा मला, नाही म्हणायला आज कोणच्या गोष्टीची कमतरता तुम्हांला आहे ? अहो, तुमच्यासारखें सुख राजाच्या एखाद्या पट्टराणीला नसेल !

**काशी०**–हो, मी खातें सवरतें, सर्व कांहीं करतें; चांगली धडधाकड आहें; पण मला जो हृद्रोग लागला आहे, त्याची कल्पनादेखील नाहींग तुला ! गोपिके,

**पद**.–धाडुनि दिधलें दासीसह मीं पत्र०–

मज्जनु झालें ख्यात कुलीं, मी प्रिय बहु आप्तजनां, ते ॥ समान पाहुनि अर्पण करिती मज जनमान्य वरातें ॥ धृ० ॥ पति-प्रेमाची साक्ष खरी हें वैभवसुख भोगाया ॥ परि वाटे तें निष्फल सारें, कांहिं नको समयीं या ॥ सर्वस्वीं आधार मला जी मूर्ति न ती या ठायां ॥ रविदर्शन जर नाहिं कशी मग कमलिनि विकसित होते ॥ १ ॥

**गोपि०**—खरेंच ! देव सध्यां आमच्यावर कोपला आहे ! त्याला तिळमात्र दया असती, तर असें हें कां घडून येतें !

**काशी०**—नाहींग. असें व्हायला कारण देव नाहीं—

**गोपि०**—कोण तर मग बाई ?

**काशी०**—असें पहा गोपिके,

**पद**.–शाखा सद्गुण जया पालवी०–

वसंतकालीं करीर तरुला पर्ण मुळीं तें नसे॥ त्या समयीं अपराध खरोखर काय ऋतूचा

असे ॥ ध्रु० ॥ उलूक पक्षी प्रकाश लक्षी,
अंधकारिं परि बसे ॥ अविचारानें आपण
द्यावें सूर्या दूषण कसें ॥ चातकमुखिं कीं
पर्जन्याची धारा नच पडतसे ॥ दोष कोणता
सांग बरें तूं जलदांगीं त्या वसे ॥ दुःखा
कारण विधि नाहीं, तो जन्म मात्र देतसे ॥
प्रकार घडतो येथ तसा तो दैविं आपुल्या
जसें ॥ १ ॥

( **गोविंदा** येतो. )

**गो०**–( गडबडीनें ) वहिनीसाहेब, सरकार स्वारी आली ! आपल्याला हे सुचविण्याकरतां मुद्दाम आईसाहेबांनी मला इकडे पाठवून दिलें !

**काशी०**–( सहर्ष ) पुरंदरेही आले असतील ? ( **गोविंदा** 'होय' अशा अर्थाची मान हालवितो. ) आले वरें का गोपिकाबाई आपले यजमान ! ( बाजूस पाहून ) कोण आहेग तिकडे ?

**अहल्या**–( प्रवेश करून ) मी बाईसाहेब.

**काशी०**–अहल्ये, तवढा हळदीकुंकवाचा करंडा घेऊन ये आंतून. ( **अहल्या** करंडा आणावयास आंत जाते. )

**गोपि०**–ही कोण नवीनच मुलगी पाहतें मी !

**काशी०**–हो. परवां माळव्याकडे स्वारी जातांना जंगलांत या मुलीची गांठ पडली. चोरट्यांनीं इच्या नवऱ्याला ठार मारून, या निराश्रित पोरीचे फार हाल मांडले होते. पण देवाला काय करुणा आली–त्यानें हातून इची सुटका करविली. आमचे गोविंदभटजी सांगतात त्यावरून मला माहीत. त्यांच्याच बरो-

वर इला इकडे पाठवून दिली. गोपिका, पोर फार गुणी आहे बरें ! कुण्णाचा आधार नाहीं तिला. दोन घांस खाऊन राहिली आहे विचारी, झालें.

**गोपि०**—आपल्यासारख्यांनां असलीं शेंकडों निराश्रित माणसें पोसायला कांहीं जड नाहीं. ( **अहल्या** येते. **गोपिकाबाई** हळद कुंकू घेऊन ) येतें. वसा. ( उठते. )

**काशी०**—( उठून ) ये. अशीच एखादे वेळीं येऊन भेटत जा. ( **गोपिकाबाई** जाते. )

**पद.**—खमाज—पंजाबी ठेका.

परिसुनियां मम दुःखालापा आलि दया
दैवास ॥ चित्तांबरिचा हिमकर माझ्या आज
उगवला खास ॥ धृ० ॥ बलतेजानें क्षितिवर
जो या ॥ चमकुनि आतां व्याकुळ हृदया ॥
देत अती उल्हास । नुरला चिंतानल-
सहवास ॥ १ ॥

( **बाजीराव** येतो. **अहल्या** जाते. )

**बाजीराव**—( **काशीबाईस** आलिंगून ) लाडके, आतां चिंतेचें नांव कशाला पाहिजे !

**साकी.**

क्लेश आज तव विनष्ट झाले, चिंता लेशहि नुरली॥
आनंदाच्या शिखरीं आपण बसलों या शुभकालीं ॥
येतां दिनमणि गे ॥ राहे केंवि निशा सांगें ॥ धृ० ॥

( तिच्याकडे निरखून पाहून ) अहाहा ! सुंदरी, काय हें कडकडीत व्रत !

**पद.**—भिऊं नको जिवलग सुंदरि०—

आलि तुझ्या वदनीं पांडुरता ही, खोल

गेले, नयन कां हे ॥ ध्रु० ॥ किति मोहक या तव तनुची कांति परी ती, लोपुनीयां, गेलि आहे ॥ लवही बल नच देहीं कां एक-सारखा, ऊर तूझा, उडत राहे ॥ कवणा घाबरसी इतुकी न कळे मजला, सांग आतां, मजासिं पाहें ॥ सखये क्लेश कां हे ॥१॥

**काशी०**–

**पद.**–मज बहुतचि हीं०–

ये वेळिं अहां आपण माझ्याजवळी ॥ मज भीति कशाची आली ॥ सुखसदनीं या भेट आपुली झाली ॥ दुःखा नच जागा उरली ॥ चाल ॥ आनंदें ऊर धडाडे हा ॥ तो क्लेश न देई या देहा ॥ चाल ॥ मम आज खरी हेतु-सफलता झाली ॥ संतोष देइ या कालीं ॥१॥

**बाजी०**–मग हें काय ?

**दिंडी.**

भूषणांचा कां तुवां त्याग केला ॥
दूर केली कां तेविं कुसुममाला ॥
सांग तुज कां ही विरक्तता आली ॥
दशा ऐसी तव कशामुळें झाली ॥१॥

**काशी०**–प्रिया,

**पद.**–युवराज शिवाजीस०–

नवसुमनभरें फुललेली कुसुमवल्लि ती ॥

अवलोकनमात्रें मन रंजवी अती ॥ धृ० ॥
परि रविकरताप तिला सारखा मिळे ॥
तीवरि जलसिंचन कधिं नाहिं जाहलें ॥
करपुनि जाईल सहज ती तयामुळें ॥
विरहानलिं दिनरजनीं देह हा जळे ॥ मग
नवल काय जाहलि अशि माझि ही स्थिती ॥१॥

हे पाय आतां कधीं ह्मणून मी सोडायची नाहीं.

**बाजी**०—वः! हें तर मग मोठेंच खूळ माजलें ह्मणायचें! वेड्ये, आह्मांला कितीं कामें उरकायचीं राहिलीं आहेत अजून! अशीच का तूं शहाणी ती?

**काशी**०—जळलें माझें शहाणपण! मेला माणसानें सारा जन्मच का हा असा कावाडकष्ट करण्यांत घालवायचा तो!

**बाजी**०—आणि श्रम केल्यावांचून आनंदानें खायला मिळायचें तें कसें?

**काशी**०—मिळतें आहे तेवढें पुरें झालें.

**बाजी**०—हीच ती तुह्मां बायकांची कोती समजूत! लाडके, आपल्या सर्व सौख्याचा उगम श्रीसद्गुरु समर्थ यांच्या पुण्यचरणांपासून! त्या महापुरुषाच्याच आशीर्वचनानें—

**पद**.—नयन वसे रघुवीर०—

जिंकियला समरीं ॥ यवन अरि ॥ धृ० ॥
पीडित जन ते विमुक्त केले ॥ वैभव लोकीं
हें जोडीलें ॥ मद्भागा नच अपयश आलें ॥
विजयी आजवरी ॥ १ ॥

तेव्हां आतां तूंच सांग—समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांचा हुकूम मानायचा, अथवा, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें राज्यकारभार

गेले, नयन कां हे ॥ ध्रु० ॥ किति मोहक या तव तनुची कांति परी ती, लोपुनीयां, गेलि आहे ॥ लवही बल नच देहीं कां एक-सारखा, ऊर तूझा, उडत राहे ॥ कवणा घाबरसी इतुकी न कळे मजला, सांग आतां, मजासिं पाहें ॥ सखये क्लेश कां हे ॥१॥

**काशी**०–

**पद.**–मज वहुतचि हीं०–

ये वेळिं अहां आपण माझ्याजवळी ॥ मज भीति कशाची आली ॥ सुखसदनीं या भेट आपुली झाली ॥ दुःखा नच जागा उरली ॥ चाल ॥ आनंदें ऊर धडाडे हा ॥ तो क्लेश न देई या देहा ॥ चाल ॥ मम आज खरी हेतु-सफलता झाली ॥ संतोष देई या कालीं ॥१॥

**बाजी**०–मग हें काय ?

**दिंडी.**

भूषणांचा कां तुवां त्याग केला ॥
दूर केली कां तेविं कुसुममाला ॥
सांग तुज कां ही विरक्तता आली ॥
दशा ऐसी तव कशामुळें झाली ॥१॥

**काशी**०–प्रिया,

**पद.**–युवराज शिवाजीस०–

नवसुमनभरें फुललेली कुसुमवल्लि ती ॥

अवलोकनमात्रें मन रंजवी अती ॥ धृ० ॥
परि रविकरताप तिला सारखा मिळे ॥
तीवरि जलसिंचन कधिं नाहिं जाहलें ॥
करपुनि जाईल सहज ती तयामुळें ॥
विरहानालें दिनरजनीं देह हा जळे ॥ मग
नवल काय जाहलि अशि माझि ही स्थिती ॥१॥

हे पाय आतां कध्धीं ह्मणून मी सोडायची नाहीं.

**बाजी०**—वः! हें तर मग मोठेंच खूळ माजलें ह्मणायचें! वेड्ये, आह्मांला किती कामें उरकायचीं राहिलीं आहेत अजून! अशीच का तूं शहाणी ती?

**काशी०**—जळलें माझें शहाणपण! मेला माणसानें सारा जन्मच का हा असा कावाडकष्ट करण्यांत घालवायचा तो!

**बाजी०**—आणि श्रम केल्यावांचून आनंदानें खायला मिळायचें तें कसें?

**काशी०**—मिळतें आहे तेवढें पुरें झालें.

**बाजी०**—हीच ती तुह्मां बायकांची कोती समजूत! लाडके, आपल्या सर्व सौख्याचा उगम श्रीसद्गुरु समर्थ यांच्या पुण्यचरणांपासून! त्या महापुरुषाच्याच आशीर्वचनानें—

**पद.**—नयन बसे रघुवीर०—

जिंकियला समरीं ॥ यवन अरि ॥ धृ० ॥
पीडित जन ते विमुक्त केले ॥ वैभव लोकीं
हें जोडीलें ॥ मद्भागा नच अपयश आलें ॥
विजयी आजवरी ॥ १ ॥

तेव्हां आतां तूंच सांग—समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांचा हुकूम मानायचा, अथवा, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें राज्यकारभार

सोडून स्वस्थ घरीं पडून राहायचें ? तुझ्याच तोंडून या गोष्टीचा आतां निकाल लागूं दे.

**काशी०**–राजकीय गोष्टींत मला बायकोला काय कळतें तें ? आजच कांहीं मी कारभार सोडावा–ह्मणत नाहीं; पण जिवाकडे पाहिलें ह्मणजे मेलें बोलणें येतें.

**बाजी०**–अशा बोलण्याचा पण उपयोग काय ? कारण, हें शरीर सध्यां माझें राहिलें नाहीं. यावर ताबा दोघांचा– छत्रपति शाहू महाराजांचा, कीं एक तुझा ! ( हंसतो. )

**काशी०**–अहाहा ! खरेंच जसें कांहीं ! इतकी साखर पेरायला नको. कुणी एखादी बिचारी अजागळ बायको असती, तर कांहीं शोभतें तरी–मला हीं बोलणीं सारीं कळतात ह्मटलें.

**बाजी०**–हँ, असेंच का हें रुसणें फुगणें सारा दिवस चालायचें ? मी चकार शब्द काढीत नाहीं. तुझेंच रडगाणें आपलें चालूं दे कसें !

**काशी०**–( मर्जी गेलीसें पाहून नम्रतेनें ) नाहीं–ही गप्प राहिलें मी. सांगावें काय तें.

**बाजी०**–( पलंगावर बसतो. **काशीबाई** मर्यादेनें त्याच्या शेजारीं जाऊन बसते. ) हें बघ,

**पद.**–परम सुवासिक पुष्पें०–

उत्तरदेशीं हिंदुजनांचा यवनिं असे छळ मांडियला ॥ निजामअल्ली ऐशा वेळीं सिद्ध जहाला लढण्याला ॥ ध्रु० ॥ शौर्य, धैर्य पूर्ण असे तो जाणतसेही कपटकला ॥ त्यांत आमुचे योद्धे कांहीं गुप्तरीतिनें वश त्याला ॥ ‘ दुष्ट शत्रु तो दंडुनि येणें ’ राजाज्ञा ही

ऐसि मला ॥ मींही सर्वांसमक्ष तेव्हां दुर्धर
आहे पण केला ॥ १ ॥

तर महाराजांचा हुकूम आणि माझी प्रतिज्ञा, या दोन गोष्टींतून मला पार पडलेंच पाहिजे. इकडची एकंदर व्यवस्था लावून दोन तीन दिवसांनीं आह्मांला येथून निघायचें; ते प्रथम धावडशीस जाऊन, स्वामींचें दर्शन घेऊन, नंतर तसेच निजामाकडे वळूं. मग कसा काय विचार? आह्मालां जायला परवानगी पाहिजे.

**काशी**०–कशाला ती! मला एकटीला तरी राहून करायचें आहे काय इथें?

**पद**.–मंचकावरती०–

आपणासह मी ॥ प्रियकरा ॥ येईन जाल
त्या ग्रामिं ॥ काय सुख धामिं ॥ धृ० ॥
साहुनि विरह कशी मी राहूं ॥ दर्शन नित्य
कुणाचें घेऊं ॥ आस न वैभवलक्ष्मि ॥ १ ॥

**बाजी**०–सुंदरी, काय तुझा हा भलताच हट्ट!

**पद**.–निजमख रक्षाया०–

काननवास तुला ॥ होइल कैसा ॥ प्रियसा
सांग मला ॥ शीतोष्णादिक ताप तसे ते ।
वृष्टि कधीं मेघांचि अतूला ॥ धृ० ॥ प्याया
जल न मिळे ॥ कवण प्रसंगीं ॥ मग खाणें
कसलें ॥ अन्नावांचुनि काढावा दिन । ही
स्थिति माझी, तूं तर अबला ॥ १ ॥ अत्या-
नंदें तूं ॥ ये स्थलिं राहीं ॥ इष्ट न तव हेतू ॥

माझ्यासंगें घोर वनांतरिं [illegible] बहूपरि हो-
तिल तुजला ॥ २ ॥

**काशी०**—जवळ असून हालअपेक्षा किंवाही झालेली पत्करली मला. तिचेंच दुःख अधिक वाटतें, तर—

**पद.**—सखयांनों दाखवा गे०—

पतिसंगें जानकी ती वनवासा त्रासती ॥
नलजाया हिंडतांना दमयंती भागती ॥
पतिसवें काननाप्रती । द्रौपदी सती । कधीं
नच जाति। हरिश्चंद्रा ती । तद्भार्या सोडिती ॥१॥

' नेतों ' म्हटल्याखेरीज मी आतां भाषण करायची नाहीं.

**बाजी०**—( किंचित् रागावून ) एवढेंच ना ? नका बोलूं. इतक्याकरतांच अबोला धरलेला पत्करला आह्माला; परंतु आपल्याला बरोबर नेऊन चार लोकांत हंसें करून घ्यायचें—नकोच तें. ( तिच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमानें ) हें पहा, शहाणी ना तूं ? मग आपण शहाण्या माणसांनीं असें हें बळेंच वेड पांघरायचें ? तुला कांहीं कमी नाहीं—खुशाल आनंदानें रहा, झालें.

**काशी०**—( रागानें उठून दूर जाऊन उभी राहते. ) कशाला पण एवढें तें ! आपल्याला जायचें—खुशाल जावें आपण. सहन होईल तितके दिवस करीन; नाहीं तर शेवटचा उपाय आहेच मग जवळ ! या मेल्या जिवाचा आतां अगदीं विट आला आहे ! ( सुस्कारा सोडते. )

**बाजी०**—( तिच्यापासून दूर उभा राहून ) अहाहा !

**श्लोक.**—( कामदावृत्ताचे चालीवर. )

भृकुटियुग करी सज्ज चापसें ॥ सोडि मज-

वरी नयनशर कसे ॥ देहिं या इच्या कंप
कोण हा ॥ मन्मना परी शांतवी अहा ॥ १ ॥

( असें ह्मणून तिच्याजवळ जातो. काशीबाई त्याजकडे रागानें पाहते. )

पद.—अति निर्दय ती नरजाती०—

कां कोप करुनियां वायां ॥ शिणविसि ही
कोमळ काया ॥ सुंदरी ॥ आधींच शरीरीं
तव या ॥ सामर्थ्य नसे बोलाया ॥ सुंदरी ॥
भय वाटे सुखसमयीं या ॥ भेदील खचित
तो हृदया ॥ सुंदरी ॥ चाल ॥ आवरीं ।
मानसांतरीं । सहन त्या करीं । येइं या ठायां ॥
मज गाढालिंगन द्याया ॥ सुंदरी ॥ १ ॥

(काशीबाई हंसत जाऊन त्यास आलिंगन देते; तीस आलिंगून)

साकी.

आम्रतरूतें वेष्टित जैसी स्निग्ध सुकोमल वल्ली ॥
आलिंगन मज दिधलें तैसें प्रियसखिनें या कालीं ॥
मदना संचरसी ॥ योजुनि युक्ति तरी कैसी ॥ धृ० ॥

आतां आहे ना जायला परवानगी ?

**काशी०**—आपल्याला माझी मेली कसची आली आहे परवानगी ती ! पण—नाहीं—हृदय घट्ट करतें, विवेक करून पाहतें, तरी तेच विचार सारा वेळ मनांत येतात !

**बाजी०**—कोणचे ते तर कळूं दे.

**काशी०**—

पद.—जोगि वनके आया०—

नका जाऊं दिल्लीसी । तया दूर देशीं ।

विनंति माझी ॥ ध्रु० ॥
नामश्रवणें रिपुगण सारा ॥ थरथर कांपे
जयासीं ॥ तया० ॥ १ ॥ यवनाधिप तो राहे
तेथें ॥ वदति न माया तयासीं ॥ तया०॥२॥
झाडुनि अवघे दूत यमाचे ॥ मित्र न कोणी
अह्मांसीं ॥ तया० ॥ ३ ॥ आपत्कालीं, शुभ-
वेळीं मी ॥ हितगुज सांगूं कुणासीं ॥ तया०॥४॥

माझ्या प्राणांची शपथ-जायचें नाहीं. ( जाऊन त्याचे पाय घट्ट धरते. )

**बाजी०**—छे, भलतीच समजूत तुझी ही! अगे, अशा बलाढ्य शत्रूबरोबर सामना देण्यांत तर आह्मांला विशेष आनंद आहे. पण त्याचें आतांच कशाला? त्या गोष्टीला बराच अवधि आहे अजून. सध्यां फक्त नर्मदेच्या पलिकडे जाऊन निजामाची खबर घ्यायची. दिल्लीवरच्या मोहिमेच्या वेळीं स्वारीबरोबर तुला घेऊन जाऊं; तेव्हां मग सत्यभामेप्रमाणें हातांत धनुष्यबाण घेऊन वेळोवेळीं आह्मांला साह्य कर. ह्मणजे तुझ्या मनाप्रमाणें झालें कीं नाहीं? ( चोहोंकडे पाहून ) अरे! बोलण्याचे नादांत किती वेळ गेला तो समजला नाही. इकडे पहा.

**पद**.-कानडा-त्रिवट.

पावकसम खर रविकरदीप्ती ॥ नयनां मोद
न, दे चित्ता ती ॥ ध्रु० ॥ शैवलिनीच्या
शीतल सलिलीं ॥ स्नान कराया पुरुजन
जाती ॥ घेउनियां जगदंबादर्शन ॥ स्वालयिं
कोणी जातां दिसती ॥ १ ॥

( निघून जातात. )

---

**दुसरा अंक समाप्त.**

# अंक ३ रा.

प्रवेश १ ला. स्थळ–जंगल.

(हातांत पत्र घेऊन **चंद्रसेन जाधव** घाईघाईनें प्रवेश करतो.)

**चं० जाधव**– ( आनंदित मुद्रेनें )

**पद**.–कोणता वदरे तुझा०–

दैव सानुकूल ह्मणोनी योग कोंवि आला ॥
आजवरी हृदयांतरिं, तो हेतु सफल झाला ॥ध्रु०॥
पहा कशी श्रीपति याची गुप्त भेट झाली ॥
निजामासिं माझ्याजवळीं पत्रिकाहि दिधली ॥
वैरभाव बाजीविषयीं ऐशा सुवेळीं ॥
पूर्णपणें मानसिं त्याच्या दिसतसे उदेला ॥ १ ॥

त्या बाजीरावानें आणि त्याच्या अनुयायी मंडळानें, माझा धनी कोल्हापुरकर संभाजी याचें, आजपर्यंत कोणचेंही प्रिय केलें नाहीं; तर–

भूपतीस अपुल्या लटकी मात ती कथोनी ॥
मत्प्रभूचि सकलां लोकीं केलि मानहानी ॥
हाडवैर साधियलें कीं निशिदिनीं तयांनीं ॥
बंधुजनीं कलह कराया सिद्ध काय झालां ॥२॥

बरें ह्मणावें ! याहून जरी नाहीं नाहीं त्या गोष्टी सांगून संभाजी-विषयीं शाहूचें मन कलुषित केलेंत, तरी त्या जातभाईचें रक्त एक आहे, नाकांतला केंस उपटला, कीं डोळ्यांतून आस-

वांच्या धारा लागतात; परंतु बाजीरावा, ब्राह्मणभाई तूं, तांदुळां-तल्या खड्याप्रमाणें अलग एका बाजूला जाऊन पडशील. ( पत्राकडे पाहून ) हें निजामाचें पत्र, पेशव्याची अशी कांहीं धांदल उडवील ह्मणता, कीं प्रतिनिधीची क्षमा मागण्याखेरीज दुसरी तोड ह्मणून त्याला उरणार नाहीं. हा एक घरचाच भेद्या निजामाला सांपडल्यामुळें, बाजीरावाबरोबर त्याचा सामनाही मोठा कडाक्याचा होईल. अशा वेळीं आपण आपल्या धन्याचें एखादें फायद्याचें कलम पाहिलें पाहिजे. ( जाऊं लागतो, तों **श्रीपतराव प्रतिनिधि** घाईघाईनें येतो. )

**प्रतिनिधि**–( कांहीं दुरून ) जाधवराव? अहो जाधवराव?

**जा०**–( थांवतो व त्याकडे पाहिलेंसें करून ) कोण? सरकार! ( त्यास मुजरा करतो. )

**प्रति०**–अहो, शेवटीं निजामाला एक ताजी बातमी कळ-वायची, ती आज्जी राहून गेली!

**जा०**–कोणची बरें?

**प्रति०**–हा घ्या दुसरा लखोटा. ( देतो. ) निजामाला ह्मणावें, दोन चार दिवसांनीं बाजीराव पुण्याहून निघणार, तो प्रथम आपल्या मुलुखाकडे न येतां, ब्रह्मेंद्रस्वामीच्या दर्शनासाठीं धावडशीस जाऊन दाखल होणार आहे; तर आपण ही अमोल्य संधी राखून, एकांत साधून, एकदम त्याजवर जाऊन हल्ला करावा. इकडे शाहूला मी बेतावर आणून ठेवतोंच. तुह्मी निर्धास्त असा. आंतून आमची पूर्ण मदत आहे. हँ, निघाच. काम मात्र बिनचूक पार पडलें पाहिजे.

**जा०**–अं! आपण अगदींच त्याविषयीं बेफिकीर रहावें.

## साकी.

निजामअल्लीकोपानलिं ही वार्ताऽभ्यंजनधारा ॥

एकसारखी ओतुनि आतां भडकवितों तो सारा ॥
माझ्या वचनीं या ॥ शंका आणुं नका वायां ॥ धृ०॥

**प्रति**०–छे, छे; आपल्या कामाविषयीं शंका मला विलकुल नाहीं.

**जा**०–मग येतों आतां? रजा? रामराम. ( त्यास मुजरा करून निघून जातो. )

**प्रति**०–( तो गेल्यावर ) वडा धूर्त, मोठा हिंमती, पुरा कावेबाज आणि माझ्या खात्रीचा मनुष्य हा चंद्रसेन जाधव आहे. निजामाकडे जाऊन पोंचण्याचाच अवकाश––त्याच्या साह्यानें तो या बाजीची अशी फें, फें, उडवून देईल ह्मणता, कीं आमचा ठासून भरलेला बार जोरानें उडालाच! ( जातो. )

---

## प्रवेश २ रा. स्थळ–जंगल. ( बाजीरावाची छावणी. )

( **बाजीराव** व **राणोजी शिंदे**, दोघे बोलत येतात. )

**बाजीराव**–राणोजी शिंदे, काय ही बातमी अक्षरशः खरी आहे ह्मणतां?

**राणोजी शिंदे**–होय सरकार. अगदीं खात्रीच्या मनुष्यानें सांगितलेली. प्रतिनिधीनें निजामाकडेसच जाधवाला पत्र देऊन पाठविलें, अशाबद्दल आतां संशयाला विलकुल जागा नाहीं. आपल्यामागें त्या श्रीपतरावांची–ह्मणाला–कोण धांदल उडाली होती! तो एकदांची या जाधवरावजींची गांठ पडली; आणि कांहीं गुप्त निरोप देऊन त्याला निजामाकडे त्यानें पाठवून दिलें.

**बाजी**०–तर मग घरांतल्या घरांत ही शुद्ध बंडाई माजली ह्मणायची!

**रा० शिंदे**–आणि ती केवळ मत्सरबुद्धीनें ! आपला झालेला उत्कर्ष त्याला सहन होत नाहीं, हेंच त्या मत्सराचें खरें बीज. ह्या बंडाई आणि दुष्टभावरूपी लाटांमधून निभावून आमचें जहाज तडीस लागणें धोक्याचें आहे !

**बाजी०**–तरी त्याबद्दल इतकी भीति अथवा, विशेष पर्वाही आह्मांला नाहीं; परंतु खेदास्पद गोष्ट ही वेळोवेळीं मनांत येते, कीं—

**पद.**–मेरा गमका तराना०–

झाता लोक मानीती । सन्मान देती । श्री-
पतीप्रती ॥ राहे त्याचिया चित्तीं । कां दिन-
रातीं । आह्मांविषयिं ती । द्वेषमति अती ॥
॥ ध्रु० ॥ शत्रुजनांतें साह्य तो गुप्तपणें, त्यातें ॥
भूपतिचें हित आपुल्या का न कळावें तें ॥
अन्य खेद माझीया । हृदयीं न सम या ।
हें दुःख वायां । श्रीपतीप्रती ॥ १ ॥

**रा०**–पण अशा या गुप्त मसलती ह्मणजे भीतीचें मुख्य ठिकाण ! आणि तशा ठिकाणीं आपलें नेहमींचें रहाणें ! तेव्हां या घातुक ठिकाणाचा कोणच्या तरी रीतीनें बंदोबस्त झाला पाहिजे.

**बाजी०**–राणोजी, अहो आमच्या हितशत्रूंनीं आजपर्यंत आमच्याविरुद्ध थोडया का मसलती केल्या ? पण झालें•काय !

**पद.**– श्रमले वह ते मेघ०–

'सत्यमेवजयते' या न्यायें सत्याचा कीं
जय झाला ॥ अंतिं खरा तो प्रकार सारा
नृपतीच्या दृष्टिस आला ॥ ध्रु० ॥

आणि सर्व साधारण असाच नियम आहे, कीं–

शरदृतूंतिल मेघ गर्जना, न करी जीवन-
वृष्टीला ॥ शब्द न करितां वारिवाह तो
वर्षे वर्षाऋतूंतला ॥ १ ॥

त्यांनीं कोणत्याही विकट प्रसंगांत आह्मांला आणलें, तरी मुळचे आह्मी पुरे सावध आहोंत.

**रा०**–महाराज, आपल्यावर एखादें संकट आणण्याची, अथवा जिवाला अपाय करण्याची त्या माकडांची छाती नाहीं. आमचा अधिकार ते जाणून आहेत.

**बाजी०**–कांहीं असो. आमच्या कार्यांत तूर्त हें एक नवीन विघ्न उपस्थित झालें खरें! ( कांहीं वेळ विचार करून ) शिंदे, पुढें आतां आपल्याला स्वामींच्या दर्शनास जायचें. सद्गुरूंचा मठ येथून सारा दहाएक मैलांवर असेल नसेल. तेथील एकांतवासी जनांस त्रास होऊं नये, ह्मणून पुढचा मुक्काम जवळच करायचा, अशी सैनिकांनां वर्दी द्या.

**रा०**–( हात जोडून ) आज्ञा सरकार. ( जातो. )

**बाजी०**–( चिंतन करून, खिन्न मुद्रेनें )

**पद**.–मजवरि तरु कुसुमरेणु०—

सुखकर अणुमात्रचि हें थोरपण, जसें ॥
तें मृगजल बघुनि तृषितचित्त होतसे ॥ ध्रु० ॥
मानिति जन कांचन किति श्रेष्ठ या क्षितीं ॥
चुकति न घनघाय परी नित्य त्याप्रती ॥
नश्वर या वपुचि खरी तीच कीं स्थिती ॥
जा कोठें, कांहिं करा, शांत मन नसे ॥ १ ॥

( जातो. )

## प्रवेश ३ रा. स्थळ—ब्रह्मेंद्र स्वामींच्या मठा-सभोंवताळची जागा.

( एक शिष्य येतो. )

**शिष्य**—( इकडे तिकडे पाहून व आंत डोकावून ) यज्ञेश्वर भटजी? अहो यज्ञेश्वर भटजी? काय हें? फटफटीत उजाडायला झालें—आपली अजून उठायची वेळ झाली नाहीं—वः! तिकडे गुरुजी हांका मारीत असतील—उठा. (कान देऊन, ऐकल्यासारखें करून ) पण जरा डोळे उघडून इकडे पहाल?

पद.—रामचंद्र नाहिं घरीं०—.

अरुणाची कांति नष्ट जाहली पहा ॥
उदयाचलिं येत असे चंडकिरण हा ॥ ध्रु० ॥
गिरिगव्हरिं अंधकार जाउं लागला ॥
पूर्व दिशाप्रांत किती स्वच्छ जाहला ॥
सुप्रभातगंधवाह मंद सूटला ॥
कर्णमधुर पक्षीरव ऐकुं ये अहा ॥ १ ॥

(पडद्यांतः—' मुलांनों, चला, इकडे या.'—तें ऐकून) ही ऐ-कलीत गुरुजींची हांक? आपल्याला वाटेल तर सारा दिवस का झोंप घ्या ना! मी आपला जातों कसा. ( पडद्यांतूनः—" जा बरें बाळ." )

(जातो. तदनंतर कटीस कौपीन, काषाय वस्त्रें परिधान केलेलीं, असे **ब्रह्मेंद्रस्वामी** शिष्य मंडळीसह मठांतून बाहेर येतात. )

स्वामी—

पद.–राधाधरमधुमिलिंद०–

सीताचित्सुखधाम। सदोदित। राम भजावा राम॥धृ०॥
मुनिमानसविश्राम। धनुर्धर। दशरथनयनविराम॥१॥
पतितोद्धारक नाम। जयाचें। तो नवमेघःश्याम॥२॥
सकलजनांतर्याम। तयाच्या। चिंतनिं आत्माराम॥३॥

पद.–दुःखित तरुवर झाले०–

भगवच्चरणांवांचोनी॥ आधार न जनहो कोणी॥धृ०॥ कामादिक शत्रू मागें॥ असती हें उमजा स्वमनीं॥ १॥ तो त्रिभुवनपति जिंकाया॥ रत व्हा तन्नामस्मरणीं॥ २॥ त्या ईशपदीं मन ठेवा॥ भवसागर जा उतरोनी॥ ३॥

मुलांनों, इकडे या; या दर्भासनांवर वसा; आणि निरपेक्ष, सर्वसिद्धिफलदाता जो ब्रह्मांडनायक, त्याचें मनोभावानें नामस्मरण करा. (एक **शिष्य** व्याघ्रांबर आणून घालतो, त्यावर **स्वामी** बसून) करा आरंभ.

पद.–हूं जानत प्रीत रीत०–

रघुकुलनाथ रामगुणगायनिं—षड्रिपुच्या दृढपाशीं नच सांपडतां—तूं होइं मना रत॥ धृ०॥ दीनजनां कारुण्यमहोदधि, भक्तमनोरथ कल्पद्रुम, तो पूर्ण सुखावत, होतां नत पदकमलिं सदोदित॥ राघव रघुकुलनाथ॥१॥

( इतक्यांत झोपेंतून उठलेला **यज्ञेश्वर** डोळे चोळीत येतो व शिष्य मंडळींत जाऊन बसतो. त्यास )

यज्ञेश्वरा, किती बेटया उशीर हा ? हँ, चालूं दे. ह्मण पाहूं–

**पद.**–भजनी चाल.

ईशपदीं मन जोडीं ॥ मनुजा ॥ ध्रु० ॥
गा सप्रेमें तो करुणाकर ॥ हें भवबंधन
तोडीं ॥ १ ॥ त्या जनरंजन–अलखनिरंजन–
॥ नामिं सुधारसगोडी ॥ २ ॥ न कळे जातो
काळ कसा तो ॥ निद्रा घे बहु थोडी ॥ ३ ॥

( पडद्यांत रणशिंगांचे आवाज ऐकूं येतात. )

**स्वामी**—( चकित मुद्रेनें ) अरे! रणशिंगांचे आवाज कोणीकडून ऐकूं येताहेत हे ? ( कांहीं **शिष्य** मठीच्या बाहेर येऊन पाहूं लागतात. )

**एक शिष्य**—( घाबरा होऊन, स्वामींस ) सद्गुरो ! स्वस्थ बसण्याची ही वेळ नव्हे !

**साकी.**

अगणित सेना घेउनि संगें यवनासुर तो आला ॥
भयसूचक रणभेरि वाजवी, नाद तयांचा झाला ॥
कैसी गत आतां ॥ खल तो या स्थानीं येतां ॥ ध्रु० ॥

( शिष्यमंडळींत 'मोंगल आले; धांवा, पळा, प्राण वांचवा'– असा एकच गोंधळ उडून जातो.)

**स्वामी**—( खडबडून उठतात व रागानें ) अरेरे ! त्या दुष्टजनांचा या एकांत स्थळींदेखील आह्मांला त्रास असावा, अँ ! अरे, नीच अविंधांनों ! गाई, ब्राह्मणांचा छळ करतां, हें तुह्मी

चांगलें करीत नाहीं. माझें सामर्थ्य तुमच्या अनुभवास आलें नाहीं–या मठीचे आंत पाय ठेवा, कीं सर्वत्रांचें जाळून भस्म करून टाकतों.

**शिष्य**—( घाबरत ) गुरुराज, तो पहा अश्वारूढ झालेला एक मनुष्य अगदीं जवळ येऊन ठेपला !

**स्वामी**—येऊं दे–( अत्यंत कोपाविष्ट होतात व दर्भ हातांत घेऊन ) अरे, दुष्ट यवननिशाचरा !

श्लोक.

त्या लोकेशा आपुलासा कराया ॥
म्यां सेविला योग जो काननीं या ॥
तत्सामर्थ्यें सिद्ध हा बाण माझा ॥
येथें येतां प्राण घेईल तूझा ॥ १ ॥

**बाजीराव**–( एकदम पुढें होऊन )

**पद**.–बागेसरी बहार–त्रिवट.

कोपानल ही जाळिल काया ॥ शांति धरावी सद्गुरुराया ॥ धृ० ॥ दुष्टजनांवरि शर हा अपुला ॥ आवरुनीयां पूर्ण तयाला ॥ हा तव किंकर ये स्थलिं आला ॥ सकरुण-नयनीं अवलोका या ॥ १ ॥

दयानिधे, मी आपणास प्रणिपात करतों. ( त्यांस साष्टांग नमस्कार करतो. )

**स्वामी**—( शांत होऊन **बाजीरावा**कडे पाहतात. ) बाजीराव, या; बसा. ( दोघे बसतात. ) अहाहा ! माझ्या हातून केवढा प्रमाद घडता आज !

पद.—वृषपर्व्यासीं युद्ध चाललें०—

प्रचंड सेना पाहुनि ऐसें मन्मानसिं वाटलें ॥
कीं ते यवनशत्रु पातले ॥ ध्रु० ॥ रणशिंगांचे
नाद भयंकर ऐकुं येउं लागले ॥ मन हें
स्थीर न मग राहिलें ॥ चाल ॥ त्या समयिं
कोप तो पूर्ण मदीयांतरीं ॥ दंडाया अरि
मी सिद्ध जाहलों, परी ॥ पातलां तुह्मी, ही
गोष्ट जाहली वरी ॥ चाल ॥ नाहिं तरी
मग काय अनर्थचि होता मज नच कळे ॥
अंतीं इष्ट असें जाहलें ॥ १ ॥

बाजीराव, तुमचें कुशल आहेना ? राज्यसंबंधीं हालहवाल कशी काय, ठीक आहे ?

**बाजी०**—आपल्या कृपेनें सर्व कार्यें यथास्थित चाललीं आहेत; परंतु एका गोष्टीमुळें मन सध्यां थाऱ्यावर नाहीं ! काय सांगूं स्वामी !

पद.—असतें तें जरि अन्य रत्न०—

छत्रपतींनीं दयार्द्रचित्तें, सन्मानें मजला ॥
दिधला जो अधिकार मान्य तो प्रजाजनां
झाला ॥ धृ० ॥ अर्थ-वीरनरबुद्धि-बाहुबल
घेउनि साह्याला ॥ आजवरी आपुल्या
प्रसादें अरि मीं जिंकियला ॥

**स्वामी**—मग चिंता ती कोणती ?

बाजी०—

ममोत्कर्ष हा सहन न झाला अमुच्या
श्रीपतिला ॥ सांप्रत चित्तीं फार, असे तो
खवळुनियां गेला ॥ १ ॥

इतकेंच नव्हे—निजामाच्या आणि त्याच्या गुप्त मसलती सुरू आहेत! या कामाकडे प्रतिनिधीनें चंद्रसेन जाधवाची योजना केली आहे. महाराज, या वेळीं मी निजामाशीं युद्धप्रसंग करण्याकरतां निघालों आहें आणि घरांतले घरांत ही अशा तऱ्हेची यादवी माजलेली—तेव्हां माझा बेत विनधोक कसा तडीस जाईल तो जावो!

**स्वामी**—छे, छे; बाजीराव, अशा गोष्टी तुह्मी लक्षांत वागवून मनाला किंचित्सुद्धां वाईट वाटूं देऊं नये. आपली नीति उलट नेहमीं जाग्रत असूं द्यावी. असें आहे,

**पद.**—असावरी—त्रिवट.

सद्धर्में वर्ते ॥ जो नर ॥ मत्सर करितां व्यर्थ
तयाचा ॥ काय कुणां मिळतें ॥ ध्रु० ॥
कठिण विपत्तीं सांपडतां तो ॥ करि अन्यांवरि
उपकारातें ॥ जेविं हुताशनिं पडतां चंदन ॥
स्वामोदें मन तोषवी ॥ सुत्दज्जनाची रीति
असे हे ॥ मूढां नच कळते ॥ १ ॥

अहो,

**पद.**—मालकंस—त्रिवट.

थोर पुण्य तुमचें, समजा कीं ॥ शाहूसम हा
नृप या लोकीं ॥ ध्रु० ॥ याचकदानीं, श्रुति-

पारायणिं ॥ तत्पर तैसा जनपरिपालनिं ॥
प्रजा गांजिली यवनिं ह्मणोनी ॥ खेद मनीं
ज्याचे ॥ १ ॥

तर अशा समयीं तुह्मांला सांगणें इतकेंच, कीं-

पूज्य तुह्मां तो, बहु सन्मानीं ॥ आज्ञा त्याची
प्रमाण मानुनि ॥ प्रीति खरी संपादा, कीं
मनिं ॥ तोष होय त्याचे ॥ २ ॥

**बाजी०**-( नम्रतेनें )

**पद.**-अगर हम् बाग बाहोते०-

मला शिरसामान्य आज्ञा, आपुली ही गुरूराया ॥
क्षीर सलिलीं, ठसलि तेवीं, बोधवचनें त्त्हदयपटिं या ॥
नृपतिकार्यावांचुनी हें, जिणें जगतीं असुनि वायां ॥
लेश नाहीं उरलि आशा, रणांगणिं ही पडो काया ॥ १ ॥

**स्वामी**-बाजीराव, तुमचे तीर्थरूप बाळाजीपंत, यांस आह्मीं राजनीतीचा मंत्रोपदेश केलेला तुमच्या ध्यानांत असेलच; तथापि, या विद्यमान कालीं आणखी कांहीं सांगावें, अशी माझी इच्छा आहे.

**बाजी०**-( हात जोडून ) सांगावें गुरुराज.

**स्वामी**--

**पद.**-प्रिये पहा रात्रीचा०-

वसो सदा अंतरिं देशाभिमान, अन्य न पथ
आचरा ॥ धृ० ॥ सकल जनीं ऐक्य जरी ॥
घ्या अपुलें शस्त्र करीं ॥ जा मग रणदेशीं
अरि ॥ बाहुबळें संहरा ॥ १ ॥ परपालनिं

कष्ट महा ॥ परि ते निरपेक्ष सहा ॥ सत्पु-
रुषालागिं पहा ॥ योग्य मार्ग हा खरा ॥२॥
शिवराया नियमानें ॥ आठवुनी शुद्धमनें ॥
विमल कीर्तिरूपानें ॥ इहपरलोकीं तरा ॥३॥

**वाजी०**—ठीक आहे महाराज.

( पडदा पडतो. )

**तिसरा अंक समाप्त.**

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

### स्थळ—निजामाचा दरबार. ( छावणी. )

**निजाम**—कम्नसीब्! कम्कुवत्! दगल्बाज! देखीये, क्या कुल्बातें पलट् गई हैं! अय् यार, महॉमदशाह बादशाहनें मेरी वेईज्जती की; पुर मजलीस्में मेरी ईज्जत् ली; वो मुझसे बरदाष् न होकर, मैंनें खुद्की सल्तनत् हैदराबादमें कायम् की; दिल्लीके बादशाहात्केलिये रोजोष्बब् दिल्में दाग रहा; अब्तक् मरट्टोंकी सहपर गया नहीं; श्रीपत्राव दिवान्को फतः कर लिया; सरलष्कर जाधवरावको शकीस्त हालमें डुबोकर, कोल्हापूरकर संभाजी राजाकी रग्बत् हासिल् किया; उस् बाजीके फौजमें काबू पाकर फितूरभि किया; लेकिन् आखरष्–अय् खुदा! हमारे हिस्सेमें शकीस्तीहि रही! हमारी

सब् तऱ्हेंसें बाजी जाती रही, और हमारे आदमी एकसां मारे गये! क्या, इमामबक्ष? हमारे फित्ना अंग्रेजीपर कुछहि कारगर न होने क्या? श्रीपत्राव प्रतिनिधीनें जाधवरावके हम्रा हमे भेजा हुआ खत्, गो हम् आखेरतक् उम्मीदमेंहि रहे-मगर जिस्सें दगा पाई जावे-ऐसे इरादेसें नहीं? अय् यार, बाजीरावको न मालूम् होते हुवे, शाहू राजाको कुछ् नग्द जर, और इंदापूरके नज्दीक्का कुछ् मुल्क् हम्नें देना किया; मगर उस् काफर दिवान्को वऱ्हाडमेंकी एक जमीदारी दिया; इन् सब्का इनआम-मरठ्ठोंनें नमक्हरामी करके, पेसवाके मारिफत् अच्छाहि हात हम्को बत्लाये! अफ्सोस्! या अल्ला:! या परवरदिगार!! अय् मेरे सरदारों! ऐसी एक मुख्फी सोंच कीजियेगा, के एक लेहेजेमें वो बाजीराव खाकमें समाजावे! क्युं, काजीसाहेब? ये राह कैसी है?

**काजी**—अस्तगफिरुल्लाह! वाहव्वा! ये यूंहि होना चाहीय्ये. सब् इलाज गुम्शुद्; अब् एक तज्वीजबगैर आप्ना कार बन् नहीं आता. आपन् एक हिस्से दगाबाज, तो वो बाजी जीआदातर-ऐसी सभोंकीहि अब् तस्कीन् हो चुकी हैं. मगर, हमारी तमाम् मज्लीस्की उस्नें मेहमान्‌बरदारी किया था, इस्लिये उस्का ऐवज् करनेको आज आपन् उस्से उस्की मेहमान् बरदारीकेलिये बुलाये हैं. किसी सूरत्सें उस् नमक्हलाल सिंदा और होलकरको उस्के नज्दीक्से दूर करके, काबू पाकर, चारों तरफ्सें घेरकर, उस्को मुरदार कर देना; और जहां पायीये वहां उस्को नाबूद कर देना. क्युं के, दगल्बाजोंकेसंग दगल्बाजी करना मजहब्सें बयीद नहीं, और खुदाकाभि डर नहीं.

**इमामबक्ष**—काजीसाहेबका केहेना बिलाउजर सही है. ये ऐसाहि होना चाहीय्ये.

**नि०**—मगर कहो, आजतक् हम्नें किये हुवे तद्बीरें दुश्मन्की बहादुरीके मुकाबिलेमें क्या रव्नक् आयी? अय्,

हम् बऱ्हानपूरके रहापर गोषेमें जो जा बैठेहि थे, के उस्नें हमारा काबू रद्द करके, दूसरे बाजूसें औरहि तरफ् निकल् गया; पूना जिल्हा जलाकर खोंककर डालना, इस्लिये दख्खन्केतरफ् सवारी करनेके इरादेसें अहमदनगरतक् पहोंचा न पहोंचा, इत्नेमें नागाहानी हुम्बाला करके, हमारी फौजपर अत्रापूसे उस्नें आप्ना मोरचा फिराया; वो रास्ता छोडकर जो वापीस् में लोटताहि हूं, के उस्नें गोदावरीके उस्पारसे हम्से मुकाबिला किया; और रग्वत् देते देते आखरष् ऐसी सख्त् जायपर ले गया, जहां हमारी जान् जाती या रहीती, इस्कीहि दहशत् थी! आहाहा! कैसी दहशत्का वख्त् वो था! उस्नें और उस् नमक्हराम्—नहीं, नहीं—नमक्हलाल सिंदानें उसी दिन् हमारी फौजकी कत्ल् किया हुवा हंगामा याद आतेहि हमारे बदन्का ऐसा जलन् हो जाता, के इस् वख्त् जाकर के उस् बम्मन्के टूकडे टूकडे कर डालीये! मगर बडा चालाख् है वो! अकेलेमें कभी मुझे मिलता नहीं. क्या करें? ( विचार करूं लागतो. ) खैर, वे तमाम् बातें दरकिनार—लेकिन् उस् दिवा-न्के खियालबरमुजब् धावडसीको मुख्फीसे जाकर, गालीब् होनेकी मस्लीहत्काभि अंजाम् क्या हुवा? वहोत्हि छूपी हुई लष्कर उस्के हमूरा है, जिस्की खबर लगतेहि नाक दबाकर वहांसे हमे वापीस् आना हुवा! नहीं, नहीं—इस्से दिवान्का हम्को फजीहत् करवानेका कुल् मक्सद् था, और उस्का रफीक् ये काफर सरलष्कर जाधव मरगट्टा.

**चंद्रसेन जाधव**—नाहीं खाविंद. त्याजबरोबर सैन्य गुप्त-रीतीनें असल्याबद्दलची बातमीदेखील नव्हती आह्मांला. मग काय अशी भुरळ पडली, देव जाणें! मला वाटतें, आणखी एक वेळ त्याच्याशीं सामना देण्याचा बेत खाविंदांनीं अवश्य करावा आणि त्यावेळीं मग आह्मां मराठे गड्यांची कर्तबगारी पहावी.

**नि०**—खॉमुष् रहो. जीआदा बोल्नेमें कुछ् हांसल् नहीं. तुह्मारी बहादुरीका, तुह्मारे जवान्दराजीका और तुह्मारे नमक्-

हरामीका हमे आज पूरा पूरा इत्मिनाम् हो चुका. जो लोग आप्ने ऑकासे नमक्हराम् होकर, दूसरोंकी अंजूओंसें पानी पिनेको तय्यार हुवे; आप्ने ईज्जत्को तरक् करके, दूसरे हकम्की गुलाम्गिरी रोजोष्वव् अख्तियार करनेको दिलोजहांसे मुस्तहीद हुवे; और जिन्हें आप्ने मजहब्का जराबराबर पास नहीं आया, वे बद्माष्-हराम्खोर-हमे अब् क्युंकर मुफीद हो सकते हैं ? हमारा फायदा किस् वजेसें बद आवेगा, ये हमे जाहिर न मालूम् होता ! वाहव्वा ! अय् मेरे प्यारे जवान् बम्मन् ! एक बाजी और कुल् पाजी !!

**चंद्र० जा०**—हुजूर, घुस्सा करूं नये. आपण ह्मणतां, आह्मी नामर्द-परंतु त्यानें आह्मांला कोणत्या तऱ्हेनें चोहों-बाजूंनीं पेंचांत आणलें होतें, याला आपले नेत्र साक्ष आहेत. आपण उभें होतों, त्या ठिकाणीं पाण्याचा थेंब नाहीं, मुंगीचाही शिरकाव होऊं नये, असा त्याच्या सैन्याचा सभोंवार गराडा; लष्करांत रसद येऊं द्यायची बंदी झालेली; शत्रूच्या सैन्यांतून गोळ्या सूं सूं करीत येऊन पटापट प्राण घेत होत्या; मधून कत्तलीचेंही काम सुरू होतें—

**अलीखान**—वोहि वख्त् तुह्मारी सिपाहीगिरी बतलानेका था—क्युंकर पीछे हट् गया ?

**चं० जा०**—( चिरडीस जाऊन ) आपणासारखे तरवार-बहाद्दर नंगी समशेर हातांत घेऊन पुढें उभे होते, ह्मणून —

**इमाम०**—हां, खबरदार जाधव ! ये निजामके दरबारमें जीआदाकम् बोलोंगे तो बेफायदा तवा होगे. तुम् मरठे लोग जैसे के गो या बैल हो. हमारे खॉविंदको जो के पीछे हटना लगा, इस्का बायस् ये है, के तुह्मारेमिसाल नमक्हराम् और नामर्द लोग सात थे—बडी शरम्की बात !!

**जा०**—काय ? फारशी जीभ लांब करतां आहां ? ( आपल्या तरवारीस हात घालतो. )

**इ०**—( आपल्या तरवारीस हात घालतो. )

**नि०**—हां, देखीये जाधव! आप् जिआदा बक्वा करोंगे, तो मुफ्त् जीसें जाते रहोंगे. ऐ कम्जात्! तुह्मारी नामर्दायीकेलिये हम्को दुष्मन्के हम्रा सलाह करना जरूर पडा; हैद्राबाद्में वसूल करनेवाला कामदारके भलाईकेलिये मजबूद् ऐसे बारा किल्ले बडे मुसीफत्सें उन्होंहीको देना निहायत् जरूर हुवा; नग्द् जर दस् लाख रुपया जो बाकी देना था, सो देना पडा; और संभाजीको पन्हागडकेऊपर लाके रख्खूं, ऐसा कौल् देना फर्ज हुवा. वे सब् बातें गोया जैसी तुह्मारेजैसे नामर्द और पाजी सिपाही हमारे हम्रा होनेसें हुवे. तुम् और वे तमाम् बदबख्त् लोग एकसां होके तुम् कहेते हो, के वो बाजीरावके कुल् बातें हमें कुछ् मालूम् नहीं? हराम्जादे! थुः है तुह्मारी जिंदगानीपे और तुह्मारी मर्दानीपे!!

**जा०**—(एकीकडे) अरेरे! काय करूं! संतापानें भडका होतो आहे अंगाचा! (उघड) हुजूर, शत्रूचा कावा माझ्या लक्षांत आला नाहीं, असें आपण समजूं नये. त्याच्यासारखे मलाही कांहीं डावपेंच माहीत होते; परंतु करणार काय? पडलों एकटा! तशांत, माझ्या टोळींत तमाम खांसाहेब भर-लेले—वेढा घालण्याच्या कामांत अगदींच कमकुवत!

**अलीखा०**—क्युं जाधव? आप् तो वडी मर्दान्गीकी बातें चलाई हैं? रहेने दो यह शेखियां अब्!

( एक **रखवालदार** येतो. )

**रखवालदार**—( मुजरा करून ) खॉविंद, कोई एक बहोत् खबसूरत् षक्स् आया है, और वो हुजूरकी मुलाकात् लेना चाहता है.

**नि०**—बहोत् खूब. ले आ उस्को अंदर. (**रखवालदार** जातो. ) ये शिकार तो आन् पहोंची. अब् तमाम् सरदारोंनें यह शेरके बच्चेको निहायत् हुशियारीसें काबू पान्के, पिंजरे-नसीब् करना.

**काजी**—( आपल्या दाढीवरून हात फिरवून ) इन्शाला:! यंहि होवे, ऐसी हम् बारेतालाके दरगॉहमें रात् और दिन् इबाबत् करता हूं. ( इतक्यांत गुप्त रीतीनें हत्यारबंद झालेला **बाजीराव** व अतिशय ओंगळ वेष केलेला **राणोजी शिंदे,** दोघे येतात. )

**बाजीराव**—( एकीकडे **राणोजीस** ) राणोजी, हाच तो निजामउल्मुल्काचा दरबार! आजचा नाचरंग पाहून तुझांला त्यांत कांहीं नवल वाटायला नको आहे.

**पद.**

जिकडे जिकडे दळ हाले हें ॥
थाटमाट हा प्रतिदिनिं आहे ॥ ध्रु० ॥
सेवकजन तो स्वार्थसाधनीं ॥
प्रिय वाणी स्मित भाषणिं वदुनी ॥
आजवरी आहे तद्भजनीं ॥
त्यांत अल्लि हा डोलत राहे ॥ १ ॥

**राणोजी**—खरं आहे महाराज.

( **रखवालदारासह** दोघे आंत **प्रवेश** करतात. )

**रखवालदार**—जहांपन्हा! हुकुम्बरमुजब् ले आया हूं. ( **बाजीराव** पायांतील जोडा बाहेर काढून ठेवतो; तो उचलून, काखेंत मारून, **राणोजी** त्याच्या शेजारीं जाऊन दरबारांत उभा राहतो. )

**नि०**—( बसल्या जागेवरूनच ) आयीय्ये बाजीराव. तुह्मारे आनेसें ये निजाम और तमाम् सरदार निहायत् खूष है. बैठीये.

**बाजी०**—( बसून ) निजामसाहेबांच्या या संभावीतपणाचें मला फारच आज कौतुक वाटतें आहे! अल्लीसाहेब, इतक्यांत

आपणास आश्चर्य वाटण्याजोगें विशेष कांहीं झालें आहेसें मला दिसत नाहीं. (बाजूस **राणोजी**कडे हात करून) हा माझा इमानी नोकर—माझा कलिजा—या शरीरास सोडून, दूर कोठें जाऊन रहाणार आहे? तो असाच मला चिकटून असणार.

**नि०**—क्युं बाजीराव, येहि पैतान् तुझारा इमानी नौकर? येहि तुझारा कलेजा? व:! येहि वक्त्पर तुझारे जीको जी देनेवाला? और येहि तुझारी इमान्दारी राखनेवाला? नहीं, नहीं—कहां तुझारा खब्सूरत् चेहरा, गोया पूनम्का चांद—और ए शिया गोया के जैसा अम्वास्के रात्केमुवाफिक् काले मुहूका मरगट्टा! यहां तो किसीकी कुछ् बरोबरी नजर नहीं आति. नहीं, नहीं, नहीं!! (सर्व हंसतात. **राणोजी** संतापानें लाल होऊन, **बाजीरावा**कडे पाहून, आपल्या तरवारीस हात घालूं पहातो. **बाजीराव** त्यास 'घाई करूं नका' अशा अर्थाचा नेत्रसंकेत करतो.)

**बाजी०**—निजामसाहेब, आपण त्याचें केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. त्याच माझ्या काळ्या कुट्ट इमानी नौकरानें, त्या माझ्या जीव कीं प्राणानें, आपण ह्मणतां त्या या मरगट्या पैतानानें, कईक आगीबाणीच्या प्रसंगीं माझी बाजू सांभाळून, आपल्या निमकहलालपणाचें, आपल्या कृतज्ञतेचें आणि आपल्या स्वामीभक्तीचें उत्कृष्ट उदाहरण लोकांस दाखवून, सर्वांकडून "शाबास शाबास" ह्मणवून घेतलें आहे; त्याच या माझ्या जवानमर्दानें, हां हां ह्मणतां शत्रूच्या सैन्याचा चुराडा उडवून, त्यास "या अल्ला, या अल्ला" ह्मणावयास लावून, मुठींत नाकें धरून, शरण आणलें आहे, फार कशाला—आपणासारख्यांसही एका प्रसंगीं त्यानें 'दे माय, धरणी ठाय' करून, सर्वतोपरी जयजयकार करून घेतला आहे; त्याची—त्या या वाघाच्या बच्चाची—या अमोलिक हिऱ्याची—खरी पारख आपणास काय होय? आपण या बदमाष, निमकहराम, काफर बनणाऱ्या चंद्रसेन जाधवासारख्याची परीक्षा करावी.

**काजी**—( आपल्या दाढीवरून हात फिरवून ) इन्शाला: ! यूंहि होवे, ऐसी हम् बारेतालाके दरगॉहमें रात् और दिन् इबाबत् करता हूं. ( इतक्यांत गुप्त रीतीनें हत्यारबंद झालेला **बाजीराव** व अतिशय ओंगळ वेष केलेला **राणोजी शिंदे,** दोघे येतात. )

**बाजीराव**—( एकीकडे **राणोजीस** ) राणोजी, हाच तो निजामउल्मुल्काचा दरबार! आजचा नाचरंग पाहून तुझांला त्यांत कांहीं नवल वाटायला नको आहे.

### पद.

जिकडे जिकडे दळ हाले हें ॥
थाटमाट हा प्रतिदिनिं आहे ॥ ध्रु० ॥
सेवकजन तो स्वार्थसाधनीं ॥
प्रिय वाणी स्मित भाषणिं वदुनी ॥
आजवरी आहे तद्भजनीं ॥
त्यांत अल्लि हा डोलत राहे ॥ १ ॥

**राणोजी**—खरें आहे महाराज.

( **रखवालदारासह** दोघे आंत **प्रवेश** करतात. )

**रखवालदार**—जहांपन्हा ! हुकूमबरमुजब् ले आया हूं. ( **बाजीराव** पायांतील जोडा बाहेर काढून ठेवतो; तो उचलून, काखेंत मारून, **राणोजी** त्याच्या शेजारीं जाऊन दरबारांत उभा राहतो. )

**नि०**—( बसल्या जागेवरूनच ) आयीय्ये बाजीराव. तुझारे आनेसें ये निजाम और तमाम् सरदार निहायत् खूष है. बैठीये.

**बाजी०**—( बसून ) निजामसाहेबांच्या या संभावीतपणाचें मला फारच आज कौतुक वाटतें आहे! अल्लीसाहेब, इतक्यांत

आपणास आश्चर्य वाटण्याजोगें विशेष कांहीं झालें आहेसें मला दिसत नाहीं. (बाजूस **राणोजी**कडे हात करून) हा माझा इमानी नोकर–माझा कलिजा–या शरीरास सोडून, दूर कोठें जाऊन रहाणार आहे? तो असाच मला चिकटून असणार.

**नि०**—क्युं बाजीराव, येहि पैतान् तुझारा इमानी नौकर? येहि तुझारा कलेजा? वः! येहि वक्त्पर तुझारे जीको जी देनेवाला? और येहि तुझारी इमान्दारी राखनेवाला? नहीं, नहीं–कहां तुझारा खबसूरत् चेहरा, गोया पूनम्का चांद–और ए शिया गोया के जैसा अमूवास्के रात्केमुवाफिक् काले मुहका मरगट्टा! यहां तो किसीकी कुछ् बरोबरी नजर नहीं आती. नहीं, नहीं, नहीं!! (सर्व हंसतात. **राणोजी** संतापानें लाल होऊन, **बाजीरावा**कडे पाहून, आपल्या तरवारीस हात घालूं पहातो. **बाजीराव** त्यास 'घाई करूं नका' अशा अर्थाचा नेत्रसंकेत करतो.)

**बाजी०**—निजामसाहेब, आपण त्याचें केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. त्याच माझ्या काळ्या कुट्ट इमानी नौकरानें, त्या माझ्या जीव कीं प्राणानें, आपण ह्मणतां त्या या मरगट्ट्या पैतानानें, कईक आणीबाणीच्या प्रसंगीं माझी बाजू सांभाळून, आपल्या निमकहलालपणाचें, आपल्या कृतज्ञतेचें आणि आपल्या स्वामीभक्तीचें उत्कृष्ट उदाहरण लोकांस दाखवून, सर्वांकडून "शाबास शाबास" ह्मणवून घेतलें आहे; त्याच या माझ्या जवानमर्दानें, हां हां ह्मणतां शत्रूच्या सैन्याचा चुराडा उडवून, त्यास "या अल्ला, या अल्ला" ह्मणावयास लावून, मुठींत नाकें धरून, शरण आणलें आहे, फार कशाला–आपणासारख्यांसही एका प्रसंगीं त्यानें 'दे माय, धरणी ठाय' करून, सर्वतोपरी जयजयकार करून घेतला आहे; त्याची–त्या या वाघाच्या बच्चाची–या अमोलिक हिऱ्याची–खरी पारख आपणास काय होय? आपण या बदमाष, निमकहराम, काफर बनणाऱ्या चंद्रसेन जाधवासारख्याची परीक्षा करावी.

**नि०**—देखीये बाजीराव पंडत्, यह निजामका दरबार कुछ् बाजारकी रहा नहीं; मगर जीआदा बक्वा करनेवालोंको, बेमुलाइजा चल्नेवालोंको और खास् व आम्की कीमत् न जान्नेवालोंको इन्साफ्सें सजा देनेकी एक जाय है. आप् समजते हो, उस्से इख्तिलाफ् करनेको यहांपर एक लेहजेकाभि वक्त् नहीं होना; एह आप् खूब समजना. बेफाइदा बक्वा करनेमें क्या हांसल् है? अय् यार, कहो–इस् वक्त् कभी हमारे दिल्में कुछ् तुह्मारेलिये बदी आगयी, तो वे तुह्मारे मदत् करनेहारे होलकर और सिंदा कहां है? फक्त् यह तुह्मारा षैतान् काफर, और तुम्!!

**बाजी०**—(संतापानें लाल होतो.) ठीक; या काफराचीच करामत मी या ठिकाणीं आपल्या नजरेस आणतों. (**राणोजी** संतापलेला **बाजीरावाचे** तोंडाकडे पहातो, त्यास) हँ, पहातां काय? हा भाला–फेंका जमीनींत–(**राणोजी** एका झटक्यासरसा भाला अध्यांवर जमीनींत फेंकतो. दरबारचे मंडळींत चलबिचल होते. **बाजीराव** आपली तरवार सरसावून **निजामा**जवळ जातांना ह्मणतो.) राणोजी शिंदे, 'दगा' ह्मणून ह्या होळकरांना इशारतीचें शिंग. (**राणोजी** शिंग फुंकतो.) (**बाजीराव निजामाचे** सरदारांकडे पाहून) हां, खबरदार! जागचे इकडे तिकडे कोणी व्हाल, तर याद राखून रहा–या दुमयेला अखेरचाच सलाम ठोकाल! हें माझें न्यायी शस्त्र, या इथें तुह्मां सर्वांचे बळी घेईल. अहारे निमकहराम–कमकुवत–कमबख्त–निजामअल्ली! पंढा, अशा रीतीची मजबरोबर ही दगलबाजी? बेहय्या, अरे यापूर्वींच तुझा कंठनाल चिरून, तुझ्या अमंगल रक्तानें गृध्रपक्षांची तहान भागवायाची; झाडून तुझ्या सर्व सरदारांची रणयज्ञांत आहुति देऊन, तुझ्या पूर्णाहुतीनें या रणदेवतेस संतुष्ट करावयाचें; आणि तुझ्यापुढें 'हांजी हांजी' करणाऱ्या त्या तुझ्या मुल्लांनां तेव्हांच अधोगति दाखवायाची; परंतु तुझी ती केवीलवाणी मुद्रा, तुझें हात बांधून शरण येणें,

नाहीं नाहीं त्या गोष्टींनीं आह्मां मराठ्यांची मनधरणी करून तुझें तें तहाचें बोलणें, इत्यादि गोष्टी लक्षांत आणून, मागचें सर्व विसरून जाऊन, तुझ्या अनन्वित अपराधांची तुला क्षमा करून, तुझा योग्य सन्मान केला; तो काय अशा रीतीनें मेजवानीचें मिष करून, गफलतीनें आमच्यांशीं दगा करावा, ह्मणून कारे हरामखोरा? छे, छे; हाच वक्त आह्मां एकदिल मराठ्यांचे अंगांत कोणत्या रीतीचें पाणी खेळतें आहे, तें दाखविण्याचा! हांक मार कोठें आहे तुझा तो विश्वासू काफर–निमकहराम बनलेला–प्रतिनिधींचें पत्र तुझ्याकडे गुप्त रीतीनें आणून, तुझ्या बदमाष सरदारांत तुकडे मोडीत पडून राहिलेला–चंद्रसेन जाधव? त्या श्रीपतराव प्रतिनिधीला लांच देऊन, फितूर करून, त्यास माझ्या मार्गांत रात्रंदिवस आडवें आणण्याच्या मसलती करतो आहेस, त्याला मार या वेळीं हांका! अथवा, तुझे सरदार अगदींच षंढ बनले नसतील, किंवा तुझ्यांत थोडा बहुत तरी मर्दुमकीचा संचार या वेळीं होत असेल, तर ही माझी तलवार एका बाजूस करून, आपल्या पूर्वजांचे नांवाला लागलेला दगलबाजपणाचा डाग धुवून काढ! (आपली तरवार **निजामाचे** उराशीं नेऊन धरतो. पडद्यांत कांहीं गलबला होतो; त्या गडबडींत **चंद्रसेन जाधव** पळून जातो. **बाजीराव निजामा**पासून कांहींसा दूर होऊन) बस्स–पुरें झालें! यापुढें तुझ्याशीं, तुझ्या बादशहाशीं आणि तुझ्या जातभाईशीं आह्मां मराठ्यांचें हाडवैर तहांहयात कायम राहून, तें इतकें अनावर होणार, कीं त्यापासून उत्पन्न झालेल्या क्रोधाग्नींत तुह्मां सर्वांची आहुति पडल्यावांचून या बाजीरावाला कधींच सुखानें झोंप येणार नाहीं; माझे मराठभाई तुमचा पिच्छा पुरवितांना कधींच एका जागीं स्वस्थ विश्रांति घेत पडणार नाहींत; आणि छत्रपति महाराजांचें भगवें निशाण धारण करणारा तो मरगट्टा वीर, अहोरात्र तुमच्या छातीवर साग्या थयथयाट करीत उभा राहून, 'या अल्ला' करीत तुमचीं सर्वांचीं

**नि॰**—देखीये बाजीराव पंडत्, यह निजामका दरबार कुछ् बाजारकी रहा नहीं; मगर जीआदा बकूवा करनेवालोंको, बेमुलाइजा चल्नेवालोंको और खास् व आम्की कीमत् न जान्नेवालोंको इन्साफ्सें सजा देनेकी एक जाय है. आप् समजते हो, उस्से इख्तिलाफ् करनेको यहांपर एक लेहजेकाभि वक्त् नहीं होना; एह आप् खूब समजना. बेफाइदा बकूवा करनेमें क्या हांसल् है? अय् यार, कहो–इस् वक्त् कभी हमारे दिल्में कुछ् तुह्मारेलिये बदी आगयी, तो वे तुह्मारे मदत् करनेहारे होलकर और सिंदा कहां है? फक्त् यह तुह्मारा षैतान् काफर, और तुम्!!

**बाजी॰**—(संतापानें लाल होतो.) ठीक; या काफराचीच करामत मी या ठिकाणीं आपल्या नजरेस आणतों. (**राणोजी** संतापलेला **बाजीरावा**चे तोंडाकडे पहातो, त्यास) हूँ, पहातां काय? हा भाला–फेंका जमीनींत–(**राणोजी** एका झट्क्यासरसा भाला अर्ध्यावर जमीनींत फेंकतो. दरबारचे मंडळींत चलबिचल होते. **बाजीराव** आपली तरवार सरसावून **निजामा**जवळ जातांना ह्मणतो.) राणोजी शिंदे, 'दगा' ह्मणून द्या होळकरांना इशारतीचें शिंग. (**राणोजी** शिंग फुंकतो.) (**बाजीराव निजामा**चे सरदारांकडे पाहून) हां, खबरदार! जागचे इकडे तिकडे कोणी व्हाल, तर याद राखून रहा–या दुमयेला अखेरचाच सलाम ठोकाल! हें माझें न्यायी शस्त्र, या इथ्थें तुह्मां सर्वांचे बळी घेईल. अहारे निमकहराम–कमकुवत –कमबख्त–निजामअल्ली! पंढा, अशा रीतीची मजबरोबर ही दगलबाजी? बेहय्या, अरे यापूर्वीच तुझा केठनाल चिरून, तुझ्या अमंगल रक्तानें गृध्रपक्षांची तहान भागवायाची; झाडून तुझ्या सर्व सरदारांची रणयज्ञांत आहुति देऊन, तुझ्या पूर्णाहुतीनें या रणदेवतेस संतुष्ट करावयाचें; आणि तुझ्यापुढें 'हांजी हांजी' करणाऱ्या त्या तुझ्या मुल्लांनां तेव्हांच अधोगति दाखवायाची; परंतु तुझी ती केवीलवाणी मुद्रा, तुझें हात बांधून शरण येणें,

नाहीं नाहीं त्या गोष्टींनीं आह्मां मराठ्यांची मनधरणी करून तुझें तें तह्याचें बोलणें, इत्यादि गोष्टी लक्षांत आणून, मागचें सर्व विसरून जाऊन, तुझ्या अनन्वित अपराधांची तुला क्षमा करून, तुझा योग्य सन्मान केला; तो काय अशा रीतीनें मेजवानीचें मिष करून, गफलतीनें आमच्यांशीं दगा करावा, ह्मणून कारे हरामखोरा? छे, छे; ह्याच वक्त आह्मां एकदिल मराठ्यांचे अंगांत कोणत्या रीतीचें पाणी खेळतें आहे, तें दाखविण्याचा! हांक मार कोठें आहे तुझा तो विश्वासू काफर–निमकहराम बनलेला–प्रतिनिधीचें पत्र तुझ्याकडे गुप्त रीतीनें आणून, तुझ्या बदमाष सरदारांत तुकडे मोडीत पडून राहिलेला–चंद्रसेन जाधव? त्या श्रीपतराव प्रतिनिधीला लांच देऊन, फितूर करून, त्यास माझ्या मार्गांत रात्रंदिवस आडवें आणण्याच्या मसलती करतो आहेस, त्याला मार या वेळीं हांका! अथवा, तुझे सरदार अगदींच षंढ बनले नसतील, किंवा तुझ्यांत थोडा बहुत तरी मर्दुमकीचा संचार या वेळीं होत असेल, तर ही माझी तलवार एका बाजूस करून, आपल्या पूर्वजांचे नांवाला लागलेला दगलबाजपणाचा डाग धुवून काढ! (आपली तरवार **निजामा**चे उराशीं नेऊन धरतो. पडद्यांत कांहीं गलबला होतो; त्या गडबडींत **चंद्रसेन जाधव** पळून जातो. **बाजीराव निजामा**पासून कांहींसा दूर होऊन) बस्स–पुरें झालें! यापुढें तुझ्याशीं, तुझ्या बादशहाशीं आणि तुझ्या जातभाईशीं आह्मां मराठ्यांचें हाडवैर तहांहयात कायम राहून, तें इतकें अनावर होणार, कीं त्यापासून उत्पन्न झालेल्या क्रोधाग्नींत तुह्मां सर्वांची आहुति पडल्यावांचून या बाजीरावाला कधींच सुखानें झोंप येणार नाहीं; माझे मराठेभाई तुमचा पिच्छा पुरवितांना कधींच एका जागीं स्वस्थ विश्रांति घेत पडणार नाहींत; आणि छत्रपति महाराजांचें भगवें निशाण धारण करणारा तो मरगट्टा वीर, अहोरात्र तुमच्या छातीवर साग्वा थयथयाट करीत उभा राहून, 'या अल्ला' करीत तुमचीं सर्वांचीं

तोंडें मातींत खुपसल्याशिवाय स्वप्नांत निद्रासुख अनुभवणार नाहीं. असें न होईल, ते दिवशींच चंद्रसूर्याचा ग्रास होईल; ही पृथ्वी दुभंग होऊन, सर्व प्राणीमात्रांचा एकदम स्वाहा करील; आणि सर्वांमुखीं–प्रतिज्ञा शेवटास न गेल्यामुळें–या बाजीरावाची छीथू होऊन, त्याचा, शत्रूकडून हाल हाल झाल्यानें अखेर प्राणांत होऊन, स्वर्गीं त्यास त्याच्या सर्व पितरांसह रौरवनरकांत अधोगति मिळेल!! (संतापानें बेफाम होतो.) छत्रपति महाराज! ब्रह्मेंद्रस्वामीराज! स्वर्गलोकींच्या माझ्या पितरांनों! माझी लज्जा तशा वेळीं आपण रक्षण करा!! (बाहेरून शिंग झालेलें ऐकूं येतें. जातांना एक दोघां सरदारांस मार्गांतून तरवारीच्या टोंकानें बाजूस करून, **निजामा**कडे संतप्त मुद्रेनें पहात, गडबडीनें निघून जातो.)

**नि०**—तोबा! तोबा!! लाहोलविल्ला:!! अलहम्दुलिल्ला: !!! (इतक्यांत पडद्यांत गलबला होतो, तो ऐकून) कौन् है वहां पहेरेपर?

**शिपाई**—(प्रवेश करून) मैं हाजर हूं बंदेनवाज्.

**नि०**—ये शोर कैसा है?

**शि०**—(घाबरून) कहेता हूं खॉविंद. हमा–आ–रे हा–आ–तूसें बडी त्–तकुसी–र हुई! खता म्–मुआ–फ् करना!

**नि०**—(रागानें) बोल–बोल जल्द् वो क्या है?

**शि०**—(बोबडी वळून) म्–मस्ता–आ–नी बीबी स्–साहेबां क्–कहीं गुम् हो ग्–गई—

**नि०**—(अतिशय संतापानें) क्या कहेता है बदमूआष्? मस्तान गुम् हुई है? या इलाही:! (त्यास लाथ मारतो.) अय् बेवकूफ्, तुम् क्या निगा:बानी करते थे, या के सोते थे? कहां है वो दूसरे रखवालदार? मुकाबिलेमें ले आ–छाट्ता हूं एकेक्की गर्दन! (त्यास धक्की देऊन) क्या खॉमुष् खडा रहेकर यहां कर रहा है? मेरे हम्रा चल्. मुझे बता. इमामबक्ष, अल्लीखां, तुम्भि मेरे हम्रा चलो. यह क्या गजब्!

अफ़्सोस्! दगा! क्या अंधेर यह! जुल्म्!! जुल्म्!!!

( सर्व जातात. )

---

## प्रवेश २ रा. स्थळ–जंगल.

( कावरीबावरी मुद्रा झाली आहे अशी **मस्तानी** येते. )

**मस्तानी**—कसें पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें आहे! विलासीजन या वेळीं किती तरी आनंदांत असेल! दिवसभर उद्योग करून शीण पावलेल्या मनुष्यमात्राची सुखानंदाची वेळ ह्मटली तर ही–तिला सर्वस्वीं मी आंचवलें आहे! तो निजाम–शुद्र कसायाची करणी मेल्याची! आज दोन वर्षंग बाई सारखा माझा छळवाद मांडला होता! माझ्यावरती केवढा पहारा! भीति तरी किती घातली होती मला! पण नाहीं–काल रात्रीं ती मदनमूर्ति पाहिल्या घटकेपासून माझें भय अगदीं नाहींसें झालें. देवाला माझी दया आली. त्यानेंच या दीन गाईला वाघाच्या पिंजऱ्यांतून सोडिवली! आतां माझ्या प्रिय-करांचें दर्शन झालें, कीं धांवत जाऊन त्यांना कडकडून मी आलिंगन देईन! माझा अंगीकार करावा, ह्मणून शपथ घालीन त्यांना! ( विचार करून ) पण एवढा माझा ताबा आहे का त्यांच्यावर? ( पुन्हा विचार करून ) कसा असेल! ( श्वास सोडून ) ते ब्राह्मण–मी ही अशी पडलें! तर काय—'नाहीं' असाच खडखडीत जबाब देतील ते? छे, पण एकदां वचनांत गुंतल्यावर त्यांच्या हातून खचीत खचीत असें व्हायचें नाहीं. मग अशा दुष्ट व अनिष्ट कल्पना तरी मनांत कशाला आणा? एकदांचें तें टिकाण गांठावें, ह्मणजे झालें. ( घाईनें पावलें टाकून व चोहोंकडे पाहून ) कोण येत आहे बरें तें? ( शहारे आल्या-सारखें करून ) अगबाई! निजामाचें धरणें आलें मला! ( निरखून पाहून ) नाही–एकटाच कुणी दिसतो. ( घाबरून

इकडे तिकडे धावू लागते; तों वेषांतर केलेला **चंद्रसेन जाधव** धांवत येतो. )

**चं० जाधव**—

**साकी.**

भय कोणाचें चित्तिं धरोनी धांव घेसि तूं वाया ॥
आलों मी नच शत्रुकडोनी तुजलागीं शोधाया ॥
थांब किंगे क्षण तूं ॥ मनिचा सांग मला हेतू ॥ ध्रु० ॥

**म०**—( थांबून ) अगदीं अनोळखी मनुष्याला 'थांब' ह्मणून एकाएकीं सांगतां, या आपल्या कृतीवरून संशय येतो.

**जा०**—संशय ? तर काय- वस्त्रें, भूषणें हरण करणारा मी चोर आहें ? छे, छे; अशी कल्पनादेखील मनांत आणूं नकोस.

**म०**—मग आपण आपल्या वाटेनें जावें. माझ्या जाण्याला उगाच अडथळा कां करतां वरें ?

**जा०**—कां नाहीं करणार ? तूं चोरून नेलेली माझी वस्तु परत मिळाल्याखेरीज मला येथून जातांच येत नाहीं.

**म०**—काय ह्मणतां ? माझ्यापाशीं आपली वस्तु आहे ?

**जा०**—यांत काय संशय ! सुंदरी,

**पद.**—बेहाग-त्रिवट.

मन माझें त्वां हरिलें आहे ॥ ध्रु० ॥ प्रेम-
नयनपाशीं तव कैसा । बद्ध असें मी जाणसि
तूं हें ॥ १ ॥ बघ झालों बलहीन, दीन
अति । रात्रंदिन तव करुणा वाहें ॥ २ ॥

**म०**—असें काय हें विषयीजनासारखें भाषण करतां आपण ? लक्षांत आणा-आपला माझा घटकेचा परिचय नाहीं. अशी भलतीच वासना धरून बेफाम होऊं नका. मी अनाथ वाटसरू आहें.

**जा०**—नीट विचार केलास, ह्मणजे तुझें तुलाच कळून येईल, कीं तुझें व माझें अशा प्रकारचें हें नातें आहे.

**पद.**—केलीस अशी काय०—

अंतरिंचे हेतु तुझ्या पूर्ण म्यां करावे ॥ संर-
क्षणिं निशिदिनिं तव दक्ष मीं रहावें ॥ ध्रु० ॥
त्वां हें मनिं वागवुनी मजसिं आदरावें ॥
पुरवावी हौस माझि मत्सवें रहावें ॥ १ ॥

वेड्ये, ही अशी पळून जाण्याची युक्ति लढवून, स्वतःचा जीव धोक्यांत पाडण्यापेक्षां, मला सागायचें होतेंस–निजामाच्या बंदिवासांत इतके दिवस तुला मी कधींच काढूं दिले नसते. मस्तानी–( तिच्याजवळ जातो. )

**म०**—( दूर सरून ) आपण कोण–जाधवराव का ?

**जा०**—होय; तोच मी तुझा प्रियजन ! जिवलगे, तुझ्याच लाभासाटीं प्रसंगाला उचित असें हें माझें वेषांतर आहे. याला मी रजा देतों. ( वेष टाकून देतो. )

**म०**—जाधवराव, नीट ओळखलेंत मला आपण ?

**जा०**—सुंदरी, तुझी ओळख मी विसरेन कसा ?

**दिंडी.**

धरुनि चित्तीं बहु लोभ परधनाचा ॥
करिति विक्रय आपुल्या शरीराचा ॥
तयां गणिकांच्या कुलीं जन्म तूझा ॥
कसें सांगसि मज ‘तुह्मी येथुनी जा’ ॥ १ ॥

**म०**—अजूनदेखील तेंच आपल्याला मी सांगतें. हा भलता विचार मनांत आणूं नका. आपलें कुलशील ओळखा, बला-त्कारानें कधींही प्रीति जडत नाहीं.

इकडे तिकडे धावू लागते; तों वेषांतर केलेला **चंद्रसेन जाधव** धांवत येतो. )

**चं० जाधव**—

**साकी.**

भय कोणाचें चित्तिं धरोनी धांव घेसि तूं वाया ॥
आलों मी नच शत्रुकडोनी तुजलागीं शोधाया ॥
थांब किंगे क्षण तूं ॥ मनिचा सांग मला हेतू ॥ ध्रु० ॥

**म०**—( थांबून ) अगदीं अनोळखी मनुष्याला 'थांब' ह्मणून एकाएकी सांगतां, या आपल्या कृतीवरून संशय येतो.

**जा०**—संशय ? तर काय- वस्त्रें, भूषणें हरण करणारा मी चोर आहें ? छे, छे; अशी कल्पनादेखील मनांत आणूं नकोस.

**म०**—मग आपण आपल्या वाटेनें जावें. माझ्या जाण्याला उगाच अडथळा कां करतां बरें ?

**जा०**—कां नाहीं करणार ? तूं चोरून नेलेली माझी वस्तु परत मिळाल्याखेरीज मला येथून जातांच येत नाहीं.

**म०**—काय ह्मणतां ? माझ्यापाशीं आपली वस्तु आहे ?

**जा०**—यांत काय संशय ! सुंदरी,

**पद.**—बेहाग-त्रिवट.

मन माझें त्वां हरिलें आहे ॥ ध्रु० ॥ प्रेम-
नयनपाशीं तव कैसा । बद्ध असें मी जाणसि
तूं हें ॥ १ ॥ बघ झालों बलहीन, दीन
अति । रात्रंदिन तव करुणा वाहें ॥ २ ॥

**म०**—असें काय हें विषयीजनासारखें भाषण करतां आपण ? लक्षांत आणा-आपला माझा घटकेचा परिचय नाहीं. अशी भलतीच वासना धरून बेफाम होऊं नका. मी अनाथ वाटसरू आहें.

जा०—नीट विचार केलास, ह्मणजे तुझें तुलाच कळून येईल, कीं तुझें व माझें अशा प्रकारचें हें नातें आहे.

पद.—केलीस अशी काय०—

अंतरिंचे हेतु तुझ्या पूर्ण म्यां करावे ॥ संर-
क्षणिं निशिदिनिं तव दक्ष मीं रहावें ॥ धृ०॥
त्वां हें मनिं वागवुनी मजसिं आदरावें ॥
पुरवावी हौस माझि मत्सवें रहावें ॥ १ ॥

वेड्ये, ही अशी पळून जाण्याची युक्ति लढवून, स्वतःचा जीव धोक्यांत पाडण्यापेक्षां, मला सांगायचें होतेंस–निजामाच्या बंदिवासांत इतके दिवस तुला मी कधींच काढूं दिले नसते. मस्तानी–( तिच्याजवळ जातो. )

म०—( दूर सरून ) आपण कोण–जाधवराव का ?

जा०—होय; तोच मी तुझा प्रियजन ! जिवलगे, तुझ्याच लाभासाठीं प्रसंगाला उचित असें हें माझें वेषांतर आहे. याला मी रजा देतों. ( वेष टाकून देतो. )

म०—जाधवराव, नीट ओळखलेंत मला आपण ?

जा०—सुंदरी, तुझी ओळख मी विसरेन कसा ?

दिंडी.

धरुनि चित्तीं बहु लोभ परधनाचा ॥
करिति विक्रय आपुल्या शरीराचा ॥
तयां गणिकांच्या कुलीं जन्म तूझा ॥
कसें सांगसि मज 'तुह्मी येथुनी जा' ॥ १ ॥

म०—अजूनदेखील तेंच आपल्याला मी सांगतें. हा भलता विचार मनांत आणूं नका. आपलें कुलशील ओळखा. बलात्कारानें कधींही प्रीति जडत नाहीं.

जा०—नाहीं तर तुझी प्रीति संपादन करण्याची तरी आह्मांला जरूर काय ?

तराणा.

जो तुह्मां विपुल धन दे ॥ तो एक धनी तुमचा;
स्वमनीं मग आणिसि काय असें प्रमदे
॥ ध्रु० ॥ भाग्यवान मजसमान कोणि न ॥
अमित दास-दासीजन, हा मत्काय पूर्ण
तारुण्यमदें ॥ १ ॥

म०—महाराज, कां बरें विनाकारण आपण ही माझी छळणा मांडली आहे ? जाऊं द्या मला. (जाऊं लागते.)

जा०—(तिला अडवून) हूँ, कुठें चालली आहेस, तें सांगितल्यावांचून पुढें पाऊल टाकशील, तर—

म०—तर काय ? आपण माझ्यावर बलात्कार करणार ? मला मारणार ? स्त्रीहत्तेचें पाप माथीं घेणार ? (काकळूतीनें) जाधवराव, आपण विचार करा हो—अजून कांहीं तरी विचार करा.

जा०—मस्तानी, याहून जरी जास्त काकळूतीस आलीस, आरडलीस ओरडलीस, दटावणीच्या गोष्टी मला सांगितल्यास आणि माझ्यासमोर रडून आकांत केलास, तरी मी लेशमात्र भ्यायचा नाहीं; किंवा, माझ्या ह्रदयाला दयेचा पाझर फुटायचा नाहीं. सांग, या टिकाणीं तुझें रडगाणें ऐकायला दुसरें आहे कोण ?

म०—कां ? कुणी नसलें, तरी दीन अबलांचें रक्षण करणारा परमेश्वर—त्याला सहस्र डोळे आहेत. तो हें पहात आहे. त्याच्यापाशीं वाईट कर्माचे सगळे झाडे द्यावे लागतील. ह्मणून पुढचा परिणाम कांहीं पहा—आपली सारी अक्कल गेली कुठें ?

जा०—कायग ए गणिकेचे पोरी, फारशा ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी लावल्या आहेस ? अग, प्रत्यक्ष ब्रह्मदेव स्वर्गांतून खालीं

उतरून तुझ्या साह्याला आला, तरी या जागेवरून तुला बोटभर मी हालूं द्यायचा नाहीं. ( तिचा हात धरतो. ) हो कबूल–त्या बाजीरावाकडे चालली आहेस कीं नाहीं ?

**म०**—(त्याच्या हाताला हिसडा देऊन) दूर व्हा जावबराव ! आपल्या प्रश्नाचें उत्तर देतें मी.

**जा०**—बोल तर—

**म०**—या वेळीं माझ्या प्रियजनाकडे मी जात आहें.

**जा०**—कोण–तो बाजीराव का तुझा प्रियजन ? हं, हँ, हँ ! ( हंसतो. )

**पद.**—नथ सरजाची घालुनि०—

झलझलते.हे विचार तूझ्या चित्तिं कसे आले
॥ सुंदरी ॥ काय तयाचे सद्गुण ऐसे मनामधें
भरले ॥ ध्रु० ॥ जाणसि तूं तर काय तयानें
प्रताप रणिं केले ॥ सुंदरी ॥ पस्तावा बघ
अंतिं पावशिल, मी न अधिक बोले ॥ १ ॥
जातां तुजसम रत्न तयाकरिं, दैव तुझें
फुटलें ॥ सुंदरी ॥ कोंकणस्थ ब्राह्मण तो
भिउनी सोडिल तुज झालें ॥ २ ॥

तुह्मां चारुगात्री स्त्रियांचे हेतु त्या भिक्षुकांनींग काय पुरवायचें !

**पद.**—वधिशिल का तूं०—

वेदाभ्यास करोनी ॥ गेहिं रहावें निर्भय
त्यांनीं ॥ ध्रु० ॥ घेउनि शस्त्रें आह्मि करीं या
॥ समरांगणिं जावोनी ॥ होउनि विजयी
यावें, मग त्यां ॥ सुखवावें धनदानीं ॥ १ ॥

सर्वस्वीं ते आमचे ताबेदार, असें अजून तुला वाटूं नये का? छबकडे, पुरे. किती वेळ आणखी विचार करीत उभी रहाणार इथें? ये––उभयतांच्या मनासारखें होऊं दे एकदां! ( तिला आलिंगन देऊं पहातो. ती त्यास चुकविते. )

**म०**––( संतापानें ) सांभाळ माझ्या अंगाला स्पर्श करशील तर! जीभ हांसडून तुझ्या पायांशीं प्राण देईन! मेल्या हलकटा! त्या बाजीरावाच्या पायपोसापाशीं उभें रहाण्याची तरी योग्यता आहे तुझी? आईबापाचे पोटीं असला मांग जन्माला आलास कशाला? त्यापक्षीं एखाद्या आडांत जाऊन जीव दे!

**जा०**––( हंसून ) मस्तानी, विनाकारण कां बरें हा जिवाचा संताप? शेवटीं तुला पश्चात्ताप होऊं नये, ह्मणून तिनतिनदां सांगावेंसें वाटतें; बाकी भिकेचेच डोहाळे आठवले आहेत तुला हे! माझ्या योग्यतेचा, माझ्या संपत्तीचा तुला अनुभव नाहीं, ह्मणून असें ह्मणतेस––'होय' ह्मण––क्षणांत पट्टराणीच्या पदावर नेऊन तुला बसवितों.

**म०**––( हात चोळून ) कसाया! अरे, या तुझ्या ह्मणण्यावरून आणखी कितिक दीन गाईचे गळे तूं कापले असशीलरे! या पापाची फेड करशील कुठें? तुझा जीव सुखानें जायचा नाहीं! मरतांना यमयातना तुला होतील! मांगा! माझ्या अंगाला हात तर लावून पहा–माझाही अधिकार तुला दाखवितें!

**जा०**––सुंदरी, तसें करायला मग उशीर कां?

**पद**––मालकंस––धमार.

भ्रूशरासन सज्ज करुनी ॥ त्हृदय भेदीं नयन-
बाणीं ॥ आपुल्या मृदु करप्रहराणें ॥ चिरुनि
हें वपु टाकिं तूं ॥ ध्रु० ॥ स्पर्श तूझा मत्त-
नूला ॥ होउनी हा प्राण गेला ॥ हेतु कीं मग
सफल झाला ॥ आजवरि जो अंतरीं ॥ १ ॥

म०—(रडत) कठोरा! अरे, तुझ्यापुढें मी पदर पसरतें, परोपरीनें तुझ्या विनवण्या करतें, तरी नाहींच ना शेवटीं माझी दया तुला येत! ( इकडे तिकडे कावरीबावरी होऊन पाहते. ) काय करूं मी! कुणाची करुणा आतां भाकूं! या प्रसंगीं रक्षण व्हावें, ह्मणून कुणाला हांक मारूं! देवा! सदय अंतःकरणाचा तूं—तुलाही या प्रसंगांत सांपडलेल्या अबलेची कींव येत नाहीं!! मी या वेळीं मरायला तयार झालेंच आहें—तूं मात्र आपलें ब्रीद सांभाळ. ( **जाधवास** ) कारे ए कसाया, तूं बलात्कारानें मला वश करणार, नाहीं तर माझा प्राण घेणार—घे—ही मीं आपली मान तुझ्यापुढें केली—पहातोस काय? आपल्या अनाथ बहिणीवर वार कर—उचल तरवार—

**जा०**—( कांहीं दूर सरून ) छे, छे; वेश्याधर्माला अनुचित असें हें भाषण बोललीस.

**पद.**—असूं द्या ध्यानीं०—

ठाउकें लोकां ॥ कुलयोषिता न तूं, गणिका
॥ ध्रु० ॥ यास्तव सकलांसीं सम वागे ॥
उचित न, तें वच बोलुनि रागें ॥ मजसम
तरुण, सुरूप, सधन गे ॥ अवगणुनी, कां ॥
बाजीस मानिसी एका ॥ १ ॥

मस्तानी, तुझ्या शब्दांसारखें माझें अंतःकरण खचीत कठोर नाहीं.

**म०**—( आपल्याशीं ) या ठिकाणीं माझें साह्य आतां मींच करावें, असें झालें. (उघड) जाधवराव, अहो पण माझें मन माझ्या स्वाधीन राहिलें नाहीं. दुसऱ्यानें तें कधींच हिरावून नेलें. तुमच्याबरोबर मला आतां कसें बरें येतां येईल? मला नेणार कुठें? नेऊन काय करणार तुह्मी?

**जा०**––हँ, अशी ताळ्यावर ये. कुठें नेणार, काय करणार, सर्व सांगतों तुला.

**पद**.–हिमधवलांगी, सूक्ष्मधवलचिर०–

नृपसुख भोगूं । आपण या जनिं, होउनि
निशिदिनिं विषयविलासी ॥ ध्रु० ॥ मधुर-
सलोलुप अलि मी होइन । अभिनव आम्र-
कली तूं असती ॥ १ ॥ या रीतीनें जाण
परस्पर । कंठूं आयुर्दिन, कां भीसी ॥ २ ॥

कदाचित् तुला त्या बाजीचें भय वाटत असेल, तर तसें मला सांग–या माझ्या तरवारीनें कंठस्नान घालून, या क्षणीं त्याला या जगांतून नाहींसा करून टाकतों.

**म०**––(रागानें लाल होऊन) मेल्या खवीसा! अरे कसाबाचीच करणी करणार कीं नाहीं तूं? माझा अभिलाष धरून, दुसऱ्याचा विनाकारण प्राण घेणार तूं–मग ही मी तुझ्यासमोर उभी आहें–मला मार! माझ्यावर वार करायला तुझा हात उचलत कां नाहीं?

**जा०**––उचलेल कसा?

## साकी.

धात्यानें बहु कौशल्यें जें निर्मियलें या जगतीं ॥
तें नवरत्न तुझ्यासम कैसें फेंकिन मी या हातीं ॥
प्रेमें बोल मसीं ॥ कां हा कोप असा करिसी ॥ ध्रु० ॥

मस्तानी, एवढा वेळ सामोपचारानें तुला सांगून पाहिलें, तुझे आर्जव केलें, ही [illegible] थट्टा वाटली असेल, नाहीं? अग, हा जाधवराव तसें द[illegible]लादेखील चुकणार नाहीं. हो तयार–हा पहा तुझ्यावर ब[illegible] करून मी आपली इच्छा पूर्ण करतों. ( तिचा हात [illegible] नी 'धांवा, धांवा' ह्मणून ओरडते. )

ओरड—आणखी ओरड—कोण तुझें रक्षण करणारा इथें असेल, त्याला मार या वेळीं हांका. येऊं दे—दोघांचे मुरदे पाडतों, सोडीत नाहीं. हँ, कबूल—कबूल हो; नाहीं तर परमेश्वराचें शेवटचें नांव घे. चल—आटप—( तिचा गळा दाबून धरतो. )

**म०**—(ओरडत) या हो कुणी तरी—या—मला वांचवा! अरे देवा! कोण येणार इथें!! (लपविलेला जंबिया युक्तीनें बाहेर काढून ) कशाला पाहिजे कुणी! हा माझा साथीदार तयार आहे. गड्या, हो पुढें—( जंबियाचा वार करते, तो त्याच्या पाठीवर लागतो. )

**जा०**—अरेरेरे! मारलें!! मेलों!!! ( मूर्च्छित पडतो. )

**म०**—(त्यास लाथ मारून) मर मेल्या! तुझ्यासारखे यम-दूत कुणी असतील, त्यांना हीच गति मिळायची. ( त्याच्या जवळ जाऊन, निरखून पाहून ) मेला नाहीं हा. याला ही प्रबल मूर्च्छा आली आहे. तेवढ्या वेळांत होईल तितक्या जलदीनें याचा हा पोषाख उतरून, मर्दानी वेष घेऊन, आपण आपला रस्ता आधीं सुधरावा. उरलेला मार्ग अशानें कांहींसा निर्भय होईल. (त्याचा पोषाख उतरूं लागते. पडदा पडतो.)

---

## प्रवेश ३ रा. स्थळ—बाजीरावाची छावणी.

( **बाजीराव** व **राणोजी शिंदे** दोघे बोलत येतात.)

**बाजी०**—राणोजी, या स्वारीच्या वेळीं आमची बाजू चांगलीच सांभाळलीत तुह्मीं!

**रा०**—हा सर्व स्वामीचरणांचा प्रसाद!

**बाजी०**—तुमच्या शौर्याचें हें वर्तमान ऐकून, छत्रपतींना फार आनंद होईल.

**रा०**—( मुजरा करून अदबीनें उभा राहतो. )

**बाजी०**—संभाजीला स्वाधीन करावा, हीच काय ती आमची शेवटची अट निजामानें मान्य केली नाहीं; तथापि, पन्हाळगडावर त्यास नेऊन ठेवण्याविषयींचें अभिवचन त्यानें दिलें आहे?

**रा०**—होय सरकार. आणखी हैद्राबादेंतील वसूल करणाऱ्या आपल्या कारकूनांच्या बचावासाठीं बारा किल्ले, आणि मागील बाकी दहा लक्ष रुपये, देण्याविषयींचीही त्याची कबूली आहे—

**बाजी०**—('होय' अशा अर्थाची मान डोलवून व आकाशाकडे पाहून) राणोजी, किती प्रहर रात्र झाली असेल बरें?

**रा०**—(पाहून) सरासरी एक दोन प्रहर लोटले असतील.

**बाजी०**—जा तुझी. (**राणोजी** जातो.) [चोहोंकडे पाहून]

**पद**.—अति कोपयुक्त होय परी०—

ही जोत्स्ना आनंद मना काय देतसे ॥ ध्रु०॥
भासे किति विपिनश्री—॥ शोभा रमणीय
तरी ॥ या कारण दीप्ति परी ॥ चोहिंकडे
शांतता दिसे ॥ चाल ॥ कीं निद्रावश मानुष
या समयिं जाहले ॥ ते पक्षीगण निष्कुहांत
स्वस्थ बैसले ॥ नच कानिं पडे कवणाचा
शब्द यामुळें ॥ पुष्पगंधमिश्रवात ॥ मंदमंदसा
वहात ॥ मद्देहा सौख्य देत ॥ मनिं विकार
अन्य कां वसे ॥ १ ॥

(**गोविंदा** येतो.)

**गो०**—(हात जोडून) निजायची वेळ झाली सरकार.

**बाजी०**—हो, चला. (आंत जातो. मागून **गोविंदा** जाऊं लागतो, तों एक **मोंगल शिपाई** घाईघाईनें प्रवेश करतो.)

**शिपाई**—( **गोविंदास** आडवा येऊन ) अय् बम्मन्, तूं जल्द बत्ला के तेरा मालिक् कहां है ?

**गो०**—हूँ, दुरून बोल—शिवशील मला ! तूं मुसलमान—मी ब्राह्मण—कांहीं भेदाभेद ठेवशील कीं नाहीं ?

**शि०**—गुन्हाह मुआफ् हो तो कहूं. कहो, आप्के खोंविंद किस् जायपर बैठे हैं ?

**गो०**—ही तुझी हैंगाडी भाषा मला कळत नाहीं. 'आपके' ह्मणतोस तें काय ? तुझे कीं माझे ?

**शि०**—ऐ, आप्ने दोनोंके परवरीश करनेवाले बाजीराव-साहेब पेसवेसरकार !

( **बाजीराव** येतो. )

**बाजी०**—काय गडबड आहे गोविंदा ?

**शि०**—(मुजरा करून) खुदावंत मेहरबां ! इस् वक्त् यह गरीब मस्तानखांकी जान् बचाना !

**बाजी०**—अरे ! मजपासून अभय इच्छितोस, हें कसें ? निजामाकडे जा—तुझे प्राण वांचतील.

**शि०**—जनाबेआली ! किसीतैर इस् वक्त् मुझे मदत् देनाहि चाहीय्ये. ( त्याच्या पायां पडावयास जातो. )

**बाजी०**—( दूर सरून, आपली तरवार सरसावून ) हाँ, खबरदार ! दुरून—काय असेल तें दुरून बोल. तुह्मी त्या दगलबाज निजामाचे नोकर, ह्मणजे त्याच्याच वळणावर गेलेले असायचे. तुमच्या बोलण्यावर बिलकुल भरंवसा ठेवतां येत नाहीं.

**शि०**—आप्का फरमाना मुनासिब् है. बेषक्, यह निजामके दगल्बाजीकेलिये अब् मैं इस् आफत्में पडा हूं. मेरे वालीद्को कत्ल् करके, मुझे और मेरे वालीदाको कैद्में डाल दिया; इस् बात्को दो बर्स हुवे. लेकिन् अब् किसीकीभि मदत् मांगना, इस् इरादेसें और अक्कलसें मैं आप्ना खुलासा

कर लिया ; और आप्की छावनी पहेले मिलानेके इरादेसें दौड्ता हुवा चला; तो आधे रास्तेपे दुष्मनोंनें मुझे मिला लिया. उन्होंईकी और मेरी वहोत् देरतक् चक्मक् झडी ; और एक दोकों मैंनें तो जमीन्दोस्त कर दियें. उन्होंईके लोहीसें ये मेरे सब् कपडे जर्द हो गये हैं.

**बाजी०**—वाहवा जवानमर्द! छान आपली शिपाईगिरी दाखिवलीस ! पुढें ?

**शि०**—उस्बआद बाकीके लोग सब् भाग गये, और मैं यह रास्तेको लगा. इत्ना हुवा तोभि, एक जबरदस्त् दुष्मन् अभीतक् मेरा पीछा छोडता नहीं! गरीबपरवर, आप्ने दिल्में कुछ् आंदेसा नहीं लाना. यह इस्तगफुरअल्लाहकी कसम् लेके कहेता हूं, के मैं जातसें मुसलमीन–तोभि मेरी चलन् उसी-मुऑफिक् नहीं.

**बाजी०**—( विचारांत गर्क होऊन जातो. )

**गो०**—( एकीकडे ) किती खुबसुरत पोरगा आहे! स्त्रीचा आवाज काय–रद्द आहे यापुढें! काय ही बोलण्याची, उभें राहण्याची ऐट तरी! शरीराचा बांधा किती गोंडस! ही प्रेक्षणीय मूर्ति बनाविण्यांत त्या विधात्याच्या चातुर्याची कमाल आहे ! ( निरखून त्याच्याकडे पाहून ) पण मला संशय येतो—

**बाजी०**—भिऊं नकोस. ( **गोविंदास** ) गोविंदा, याला आपल्या गोटांत नेऊन, राणोजीस असें सांग, कीं याजवर पहारा तुमचा असूं द्या. उद्यां फुरसतीअंतीं या गोष्टीचा निकाल लावूं. ( **शिपायास** ) जा याच्याबरोबर. त्या ठिकाणीं को-णापासूनही तुला भय नाहीं. (त्याच्याकडे निरखून पाहतो.)

**शि०**—इन्षाला:! मुझपे दूसरेका पहेरा किस् खातर मालिक्? हुजूरका तावेदार मैं—आप्के तावें मुझे रक्खो. अगरचे जानेका हुक्म् हो तो जाता हूं ; मगर मेरे दुष्मन्का बदला लेनेका कौल् मुझे मिल्ना चाहीय्ये. बगरउस्के यहांसे मेरा हिल्ना नहीं होनेवाला.

**बाजी०**—(एकीकडे) हें काय गौडबंगाल आहे, कांहीं कळत नाहीं! कसें करावें? द्यावें वचन याला? (पुन्हा विचार करून, उघड) हरकत नाहीं. हें घे वचन. (वचन देतो.) ही आमची समशेर तयार झाली—दाखीव तुझा शत्रू—

**शि०**—जहांपन्हां, जरा सबूर कीजियेगा! अब् आपूनी दोनोंकी उम्मेद् वर आयी—जल्दीकी जरूरत् नहीं!

**गो०**—(आपल्याशीं) झालें! आमचें सरकार याला वचन देऊन चुकलें—हा सारा ब्रह्मघोंटाळा होणार आतां!

**बाजी०**—(स्वगत)

**दिंडी.** (भैरवी.)

लक्ष लावुनि पाहतां मूर्ति याची ॥
दिसति तीवरि चिन्हें न पौरुषाचीं ॥
नेत्रचंचलता, मधुर वाणि तेवीं ॥
नम्र वच हें स्त्रीभाव पूर्ण दावी ॥ १ ॥

(उघड) मस्तानखां, सांग तुझा वैरी कोठें आहे?

**शि०**—(आनंदित मुद्रेनें) महाराज, ज्यानें महान् महान् तपस्व्यांच्या योगांची राखरांगोळी करून टाकली, त्या अनंग-शत्रूवर आपलें शस्त्र चालेल कसें? तो अदृश्य आहे!

**बाजी०**—(विचारी मुद्रेनें एकसारखा त्याजकडे पहात स्तब्ध होतो.)

**शि०**—आतां कशाला छपवून ठेवूं! महाराज, जशी भाषा, तसा हा माझा वेषही खोटा आहे. याला मी रजा देतें. (पुरुषवेष टाकून देऊन, सलज्ज दूर उभी राहून) सरकार, ही दीन दासी **मस्तानी** समोर उभी आहे.

**गो०**—(आपल्याशीं) शेवटीं कल्पनाच खरी ठरली! येथून जावें आतां. (जातो.)

**बाजी०**—(विचार करून आपल्याशीं)—

पद.—सुने दिल्दार०—

शताधिक कल्पना मनिं या । तया काळे ॥
येउनी, हा भ्रंश झाला । कसा न कळे ॥
नये बोलूं, वदुनि म्यां तें । वचन दिधलें ॥
काय आतां—दुरित परिपूर्ण ओढवलें ॥ १ ॥

( उघड ) मस्तानी, केवढें साहस केलेंस हें! असें कपटाचरण करणें तुला योग्य वाटलें काय?

**मस्तानी**—( हात जोडून नम्रतेनें ) मला क्षमा असावी. ज्याचा परिणाम शेवटीं आनंदाचाच झाला, त्या या माझ्या करण्याला कपटाचरण कसें ह्मणतां येईल ? काल निजामाचे दरबारांत मूर्तीचें दर्शन झाल्या घटकेपासून जिवाला चैन कसें तें नव्हतें; आणि गांठ घ्यायला याखेरीज दुसरा मार्ग मला नव्हता; ह्मणून—

**बाजी**०—( मधेंच )

पद.—सांप्रत हा दुःसह मी बंदिवास०—

वैभव तें सोडुनि तूं आलिस का सांग मला ॥
यावें या स्थानिं अशा रुचलें हें केंवि तुला ॥ धृ०॥
त्यांत असे ब्राह्मण मी, भूषण तूं यवनकुला ॥
निर्भय हा योग कसा घडुनी येइल अपुला ॥ १ ॥

यामुळें सर्वत्र माझी अपकीर्ति होईल; लोक माझी छीथू करतील; असें होण्यापेक्षां, तूं आपल्या ठिकाणीं परत जावेंस, हेंच मला बरें दिसतें. माझ्या हातून हा अनुचित प्रकार घडून यायचा नाहीं—जा तूं—

**म**०—( सुस्कारा टाकून ) काय? वचनभंग! वचनभंग!! हाय हाय!!! ( मूर्च्छित पडते. )

**बाजी**०—अरेरे! ही मूर्च्छित झाली! अथवा, माझ्याच भाषणाचा परिणाम हा! चारुगात्री, उठ–सावध हो–( तीस सावध

करतो. ती सावध होऊन त्यास कडकडून आलिंगन देते. तिला कवटाळून )

पद.—झंपा.

अहा काय तरि सौख्यदा ही सुवेळा ॥
जाहली दैवगति सानुकूला ॥ ध्रु० ॥
अप्सरासुखमहति, यापुढें काय ती ॥
नाकिं नंदनवनीं सुरपतीला ॥
हेतु या समयिं मम सफल झाला ॥ १ ॥

**म०**—( त्याच्या हातावर आपली मान टाकून ) महाराज, दासीला अंतर देऊं नये !

**बाजी०**—( तिची हनुवटी धरून ) मस्तानी, तुला दिलेलें वचन पाळण्याकरतां मजवर पूर्ण जनापवाद आला, लोकनिंदा सारखी सुरू झाली, तरी कशाचीही पर्वा न करतां, जिवंत जीव आहे तोंवर, तुला कधींही मी अंतर देणार नाहीं, समजलीस ?

**म०**—स्वारीबरोबर पुण्यास घेऊन जावें मला—

**बाजी०**—हो, हो; न्यायला कोणची अडचण ! पुण्यांत मला पाय ठेवूं दे, कीं पहा मग कशीं ब्राह्मण मंडळींचीं तोंडें बंद करून टाकतों तीं ! अवाक्षर काढूं देत नाहीं कोणाला ! उभय-तांनां त्याबद्दल आतां काळजी नको. सुंदरी,

पद.—भैरवी—दादरा.

पुण्यशील, सुविचारी सहधर्मिणि माझी ॥ ध्रु० ॥
सुखदुःखीं समविभागि ॥ व्हा निशिदिनिं, मजलागीं ॥
सुखवाया, पूर्ण करा ॥ आस मन्मनीं जी ॥ १ ॥

( वर पाहून ) रात्र बरीच झाली. चला.

**म०**—चलावें महाराज. ( निघून जातात. )

**चवथा अंक समाप्त.**

**पद**.—सुने दिल्दार०—

शताधिक कल्पना मनिं या । तया काळें ॥
येउनी, हा भ्रंश झाला । कसा न कळे ॥
नये बोलूं, वदुनि म्यां तें । वचन दिधलें ॥
काय आतां-दुरित परिपूर्ण ओढवलें ॥ १ ॥

( उघड ) मस्तानी, केवढें साहस केलेंस हें! असें कपटाचरण करणें तुला योग्य वाटलें काय?

**मस्तानी**—( हात जोडून नम्रतेनें ) मला क्षमा असावी. ज्याचा परिणाम शेवटीं आनंदाचाच झाला, त्या या माझ्या करण्याला कपटाचरण कसें ह्मणतां येईल? काल निजामाचे दरबारांत मूर्तीचें दर्शन झाल्या घटकेपासून जिवाला चैन कसें तें नव्हतें; आणि गांठ घ्यायला याखेरीज दुसरा मार्ग मला नव्हता; ह्मणून—

**बाजी०**—( मधेंच )

**पद**.—सांप्रत हा दुःसह मी बंदिवास०—

वैभव तें सोडुनि तूं आलिस का सांग मला ॥
यावें या स्थानिं अशा रुचलें हें केंवि तुला ॥ धृ०॥
त्यांत असे ब्राह्मण मी, भूषण तूं यवनकुला ॥
निर्भय हा योग कसा घडुनी येइल अपुला ॥ १ ॥

यामुळें सर्वत्र माझी अपकीर्ति होईल; लोक माझी छीथू करतील; असें होण्यापेक्षां, तूं आपल्या ठिकाणीं परत जावेंस, हेंच मला बरें दिसतें. माझ्या हातून हा अनुचित प्रकार घडून यायचा नाहीं—जा तूं—

**म०**—( सुस्कारा टाकून ) काय? वचनभंग! वचनभंग!! हाय हाय!!! ( मूर्च्छित पडते. )

**बाजी०**—अरेरे! ही मूर्च्छित झाली! अथवा, माझ्याच भाषणाचा परिणाम हा! चारुगात्री, उठ-सावध हो-( तीस सावध

करतो. ती सावध होऊन त्यास कडकडून आलिंगन देते. तिला कवटाळून )

पद.—झंपा.

अहा काय तरि सौख्यदा ही सुवेळा ॥
जाहली दैवगति सानुकूला ॥ ध्रु० ॥
अप्सरासुखमहति, यापुढें काय ती ॥
नाकिं नंदनवनीं सुरपतीला ॥
हेतु या समयिं मम सफल झाला ॥ १ ॥

**म०**—( त्याच्या हातावर आपली मान टाकून ) महाराज, दासीला अंतर देऊं नये !

**बाजी०**—( तिची हनुवटी धरून ) मस्तानी, तुला दिलेलें वचन पाळण्याकरतां मजवर पूर्ण जनापवाद आला, लोकनिंदा सारखी सुरू झाली, तरी कशाचीही पर्वा न करतां, जिवंत जीव आहे तोंवर, तुला कधींही मी अंतर देणार नाहीं, समजलीस ?

**म०**—स्वारीबरोबर पुण्यास घेऊन जावें मला—

**बाजी०**—हो, हो; न्यायला कोणची अडचण ! पुण्यांत मला पाय ठेवूं दे, कीं पहा मग कशीं ब्राह्मण मंडळींचीं तोंडें बंद करून टाकतों तीं ! अवाक्षर काढूं देत नाहीं कोणाला ! उभय-तांनां त्याबद्दल आतां काळजी नको. सुंदरी,

पद.—भैरवी—दादरा.

पुण्यशील, सुविचारी सहधर्मिणि माझी ॥ ध्रु० ॥
सुखदुःखीं समविभागि ॥ व्हा निशिदिनिं, मजलागीं ॥
सुखवाया, पूर्ण करा ॥ आस मन्मनीं जी ॥ १ ॥

( वर पाहून ) रात्र बरीच झाली. चला.

**म०**—चलावें महाराज. ( निघून जातात. )

**चवथा अंक समाप्त.**

# अंक ८ वा.

## प्रवेश १ ला. स्थळ–रस्ता. ( पुणें. )

( दोघे हुजरे बोलत येतात. )

**पहिला**—हँ, चल आटप. मला तुझ्याबरोबर बोलत उभें राहायला अगदीं आतां वेळ नाहीं. त्याच्यापुढें आणखी कडाक्याचे समारंभ उडाले असे काय ते सहाच. जंजिऱ्याच्या शिद्दीबंधूंनां पराजित करून, स्वारी कोंकणांतून परत आल्यावर मस्तानी बाईसाहेबांस पुत्र झाला, त्या समशेर बहादराचे बारशाचा समारंभ पहिला; बरें, दिल्लीवरची जंगी मोहीम उरकून श्रीमंत आले, त्या वेळचा दुसरा; तिसरा–फिरंगी लोकांचा पराभव झाल्याबद्दलचा; झालें, तुमच्या–चवथा–पहा हो–हँ, तालभोपालची लढाई जिंकल्याचा; नादिरशाहावरील स्वारीचा पांचवा; आणि सहावा–शनवारच्या वाड्याचे घरभरणीचा; असे अनेक लहान मोठे समारंभ आज सतत दोन वर्षे चालूच आहेत. पण ज्यांच्या जिवावर सर्वजण आपण ही मजा मारतों आहों, त्या बिचाऱ्यांनां काडीचीदेखील विश्रांति नाहींरे !

**दुसरा**—खरेंच ! बरें, हल्लीं श्रीमंतांची स्वारी कोठें आहे ? आप्पासाहेबही बरोबरच असतील त्यांच्या ? वडील चिरंजीव नानासाहेब–तेही कोणच्याशा मोहिमेवर गेले आहेत, म्हणून ऐकतों.

**पहिला**—होय. मुसलमानांची सत्ता अजीबात नाहींशी करून, छत्रपतींचें भगवें निशाण हिंदुस्थानभर फडकवून टाकावें, या इराद्यानें स्वारी उत्तरेकडे गेली आहे. तिकडे सारखा त्यांचा विजय होत चालला आहे, अशा आनंदाच्या बातम्यांवर बातम्या येऊन थडकताहेत. इकडे आप्पासाहेबांनीं मोठ्या शिताफीनें वैशाख वद्य द्वितीया, मंदवारीं–दोन प्रहर दिवसा–

वसईच्या किल्ल्यावर छत्रपति शाहूमहाराजांचें निशाण *चढवून, किल्ला हस्तगत करून घेऊन, अवचित ते सरकार स्वारीस जाऊन मिळाले होते; परंतु खालीं कोंकणांत संभाजी आंग्र्यां-बरोबर नानासाहेब एकटेच लढत आहेत, ह्मणून–मुलाचें अल्पवय असल्यामुळें भलतेंच कांहीं करील, अशा समजूतीनें–तावडतोब त्यांची तिकडे रवानगी केली. हल्लीं तर चुलतेपुतणे मिळून आंग्र्यांबरोबर टक्कर देत आहेत व त्यांची रेवदंडा घेण्याची मसलत सारखी सुरू आहे; अशा वेळीं सरशी ही हटकून आमच्या वांट्याला ठेवलेली !

**दुसरा**—आँ ! नौबदीचा आवाज ?

**पहिला**—ऐक–पुन्हा ! छे, पुन्हा कधीं गांठ पडेल, तेव्हां सांगेन मग राहिलेली हकीगत. आईसाहेब देवदर्शनास निघा-यची ही तयारी झाली. आतां गेलेंच पाहिजे. येतों तर ? रामराम.

**दुसरा**—रामराम. ( दोघे जातात. )

---

## प्रवेश २ रा. स्थळ–काशीबाईचा महाल.

( चिंतातुर मुद्रा झालेली **काशीबाई** वसली आहे व बाजूस **गिरजा** दासी उभी आहे. )

**काशीबाई**—

**गजल.**—जंगलमें बागया०—

ऐशा निकेतनीं ॥ सुखावह जें सकलां जनीं ॥ ध्रु०॥ स्वप्नें भयंकर फार तीं । पडुनि मला भय दाविती ॥ भलतेंसलतें कां ये मनीं ॥ १ ॥ दुश्चिन्ह हें होतां असें ।

---

* शके १६६१–इ० स० १७३९.

आवरितां येई कसें ॥ चिंतापर हें मन या
क्षणीं ॥ २ ॥

गिरजे, इथेंच ऐस तूं. बाहेर कुणी येत आहेसें दिसलें, कीं तावडतोब मला कळीव. लक्ष असूं दे तुझें.

**गिरजा**––होय बाईसाहेब. ( सभोंवार पाहून ) बाईसाहेब, आज मला आपल्याला कांहीं विचारावेंसें वाटतें. विचारूं का?

**काशी०**––खुशाल विचार. तुला न सांगण्यासारखें असें माझें गुप्त आहे काय?

**गि०**––अगदीं मोकळ्या मनानें सांगा हो––

**पद.**––जाऊं कामाला०–

व्रतनेमाची ही ॥ कळेना कोण तऱ्हा बाई
॥ ध्रु०॥ दोन दिवस जाहले–कुणाशीं भाषण
नच कांहीं ॥ कुणाशीं० ॥ सदा जवळिं जो
येथ न मी तो दासीजन पाहीं ॥ महालीं० ॥
आस न शयनीं, त्रास भोजनीं, वेणिफणी
तीही ॥ कराया० ॥ आभरणें ल्याया न
आपुलें मानस कां घेई ॥ ल्यावया० ॥

**काशी०**––
कल्पना त्याचि तुला नाहीं ॥ १ ॥

**गि०**––
मज ज्याचि न कल्पना बरें तें व्रत ऐसें
काई ॥ कळूं द्या० ॥ गाळित शोकासवें
बसाया लाउनि या ठायीं ॥ बसाया० ॥
आपणा ताप असा देई ॥ २ ॥

**काशी०**—(सुस्कारा टाकून) माझ्या रोगाचें खरें कारणच तुला कळलें नाहीं, ह्मणून असें विचारतेस तूं!

**गि०**—असा रोग तरी कोणचा मेला ?

**काशी०**—

चिंतानल वदतात जयातें गुप्तचि तो राही ॥ शरीरीं० ॥ योग्य समय पाहूनि आपुल्या प्रखर ज्वालांहीं ॥ आपुल्या० ॥ करी मग ह्रदयाची लाही ॥ ३ ॥ या अंगा झोंबला असे तो जाळिल काया ही ॥ खरोखर० ॥ अशा वेळिं बघ कुठें दडाली जगदंबा आई ॥ भवानी० ॥

**गि०**—

आपणा ताप असा देई ॥ ४ ॥

बाईसाहेब, अशा त्या आपल्या चिंतेचें कारण मला नाहीं का सांगण्यासारखें ?

**काशी०**—गिरजे,

**पद.**—आज शाम मोहे लिनो०—

कांतविरहदुःख किती युवतिमना टोंचितसे ॥
ठावें तुज नाहिं ह्मणुनि काय मला पुससि असें ॥ धृ० ॥
रात्रंदिन हाचि एक जडलेला स्वमनिं ध्यास ॥
प्रार्थुं कुणा, काय कथूं, प्रियदर्शन व्हावयास ॥
काय अशा समयिं तरी आचरुं सदुपाय असे ॥ १ ॥

त्यांत त्या वेड्यावांकड्या स्वप्नांनीं तर बाई आज दोन दिवस मला जसें कांहीं अगदीं भंडावून सोडलें आहे !!

**गि०**—बाईसाहेब, कांहीं ह्मणा आपण-त्या मस्तानीचें घरांत पाऊल पडल्या दिवसापासून सरकारस्वारींचा स्वभाव अगदींच पालटला. पहिल्यासारखें येणें जाणें, बसणें उठणें, बोलणें सवरणें, कांहीं नाहीं. काय तिनें मग अशी भुरळ घातली आहे, देव जाणें !

**काशी०**—नाहींग गिरजे तिच्या हातून असें भलतेंच साहस व्हायचें. तिचा स्वभाव किती गोड आणि सरळ आहे ह्मणून सांगूं तुला !

**पद**.–जो मम नयनचकोरा०–

सुगुणांची ती मूर्तिच खरी । मजला भासतसे
अंतरीं ॥ विनयानें बहु भाषण करी । मधुर
किती बोले ॥ ध्रु० ॥ वदतां आपण कांहीं
जरी । न कधीं प्रत्युत्तर ती करी ॥ आचर-
णातें ऐशापरी । ठेवुनि राहिलिसे ॥ १ ॥
जन्मा आली उच्च न कुलीं । ह्मणुनी दूषित
का जाहली ॥ अपुल्या निर्मल सद्गुणजलीं ।
सकलां शांतविते ॥ २ ॥

( मागें पाहून ) गिरजे, आलें कुणी—

**गि०**—( पाहून ) नाहीं बाईसाहेब. नुसता हा भास झाला आपल्याला.

**काशी०**—गिरजे, खरेंच तुला सांगतें, मला आजचें हें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं ! कसली ह्मणतेस माझ्या हृदयांत सारखी धडकी भरून राहिली आहे ही ! राहून राहून भलतेंसलतेंच मनांत येतेंस ! काय नशिबीं लिहिलें आहे, त्या जगदंबेला ठाऊक !!

गि०—बाईसाहेब, माझें ऐकाल तर सांगून ठेवतें, आई अंबाबाई सर्व नीटच करील. तिला आमच्या सौभाग्याची काळजी.

काशी०—मलासुद्धां कळतें तें. पण बाई—

### भूपाळी.

कपटानें ही भूमि सर्वदा व्यापियली आहे ॥
खरोखर ॥ गुप्तरीतिनें चोहिंकडे तो वैरीजन
राहे ॥ धृ० ॥ प्रेम दावुनी वैर साधिती, रीति
तयांची हे ॥ खरोखर ॥ भीतिमुळें-ती येतां
चित्तीं-मन चिंता वाहे ॥ १ ॥

तशांत, सातारच्या दरबारांतील मुत्सद्दी इकडचा किती हेवा करतात, ठाऊक आहेच तुला. आमचें वैभव पाहून उभे जळताहेत जसे!

गि०—पण बाईसाहेब,

### पद.

प्रेम वसे निशिदिनिं मनिं आप्तजनांविषयिं खरें ॥
दीनदशा पाहुनि तें कोमल मन नित्य झुरे ॥ धृ० ॥
शील असें हें अमुचें असतां मग कोण बरें ॥
गांजाया दुर्जन या साऱ्या जगतींत उरे ॥ १ ॥

आमची नेकीच जर नीट आहे, तिथें मग झाडून सारें जग जरी उलथलें, सारखा छळवाद मांडला आमचा, अहोरात्र पिच्छा पुरविला, तरी एका मेल्यापासून काडीचेंदेखील भय नाहीं आम्हांला.

**काशी**०—

**पद**.-पांडु नृपति जनक०-

भीति कधीं लेश नसो ॥ सदा मनीं शांति असो ॥
नित्य महानंद वसो ॥ या निकेतनीं ॥ ध्रु० ॥
सकलांचा प्राण रणीं ॥ ज्या नसे साम्य कुणी ॥
विजयी होऊनि क्षणीं ॥ येथ येउ तो ॥ १ ॥

( एकाएकीं दचकल्यासारखें करून ) गिरजे, माझ्यासमोर बघितलास का हा कोण येऊन उभा राहिला तो? याला पाहूनच अंग कांपायला लागलें माझें! ( **गिरजा** 'कोण बाईसाहेब' असें ह्मणून तिला कवटाळून धरते. ) हें बघ आतां मस्तक जड झालें! डोळ्यांपुढें अंधारी आली! ही कुणाची आरोळी-ऐक!! ( मूर्च्छित पडतांना **गिरजा** वरचेवर तिला सांवरून धरते. )

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ३ रा. स्थळ-रस्ता.

( एक **ब्राह्मण** प्रवेश करतो. )

**ब्राह्मण**—( बावऱ्या मुद्रेनें ) हाय! हाय! प्रजाजनांनों! सद्गृहस्थहो! अहो सरदार मंडळीनों! मज अनाथाकडे पहात, कसले आणखी अशा अमंगल वेळीं सुखदु:खाचे विचार करीत स्तब्ध राहिलां आहांत? बाबांनों! तिकडे वाड्यांत काय अनर्थ ओढवला आहे-कोणाच्याच नांवींगांवीं नाहीं अजून! अरे, तुमच्या खऱ्या इभ्रतीचें, पराक्रमाचें, मानापमानाचें मंदिर; तुमच्या सर्व सौख्याचें वसतिस्थान; माया, ममता, प्रजावात्सल्य, सत्यप्रीति, सुजनभक्ति, इत्यादिकांचें माहेरघर; धैर्य, साहस, निरभिमानता, विनय, शांति, सौजन्य, सरलता, यांचें अगार; महाराष्ट्राचें अलौकिक भूषण-हायरे दैवा!-का-

लचक्रांत आज अकस्मात् गुरफटून, त्याची चिंधडीन् चिंधडी उडाली! जा–पाहून या. अहाहा! ज्या नरपुंगवानें दुष्ट अविधांच्या कष्टतर छलामुळें नष्टतेजोवदना बनलेल्या या महाराष्ट्रभूमातेला दुःखविमुक्त करून, तिला संतुष्ट केलें; ज्या महारथ्यानें आपल्या क्लिष्ट बनलेल्या जीविताची यत्किंचित् मनांत खंत न बाळगतां, बलात्कारानें भ्रष्ट होणाऱ्या स्त्रियांची नीच यवनांपासून सुटका करून, त्या साध्वींच्या अभीष्टचिंतनानेंच कीं काय–श्रीछत्रपति शाहूमहाराजांचा सुकीर्तिध्वज भूपृष्ठभागीं फडकवून, त्यांचे इष्ट हेतु तडीस नेले; ज्या पुरुषसिंहानें, यवनाधमांनीं अकस्मात् केलेल्या गिल्लयांस न जुमानतां, रात्रंदिवस भयंकर असे हल्ले करून, शत्रूस "या अल्ला, या अल्ला" ह्मणावयास लावून, त्यांची सारखी लांडगेतोड केली; ज्यानें सारखीं वीस वर्षें संग्रामभूमीवर अहोरात्र थैमान करून, मराठ्यांचे शूरत्वाचा झेंडा हिंदुस्थानभर मिरविला व अखेर दिल्लीपावेतों मुलूख जिंकीत जाऊन, तेथील बादशाहास दांतीं तृण धरून शरण आणलें; तो महाप्रचंड वीर, तो छत्रपतींचा उजवा हात, आह्मां महाराष्ट्रीयांचा जीव कीं प्राण, "**श्रीशाहू नरपति हर्षनिधान, *बाजीराव बल्लाळ मुख्यप्रधान**"—हा शिक्का धारण करणारा मोहरा, आमच्या अनन्वित पापाचरणामुळें त्या निर्दय यमदूतांनीं नर्मदा नदीच्या पवित्र तीरीं आज हिरावून नेल्याची ही ह्रदयद्रावक बातमी ऐकूनदेखील–लोकहो!–आपण असेच या ठिकाणीं स्वस्थ असणार काय? गृहस्थांनो! अरे कशाची त्यांची भेट आतां! रडून आरडून, हंबरडा फोडून, आकांत करून सारी दुनया पालथी घातलीत, तरी काळमुखीं पडलेल्या त्या रणसिंहाचें स्वप्नांतही दर्शन व्हायची आतां आशा नाहीं! गेला-कृतांतानें आपला विक्राळ जबडा बंद केल्यामुळें पार दिसेनासा झाला! त्याच्या भयंकर दाढांखालीं कधींच

* मृत्यु.–शके १६६२. इ० स० १७४०, तारीख २८ एप्रिल.

चिरडून गेला! नीचा, कृतांत्या! काय असें तुझ्या राज्यांत अन्नोदकाचें दुर्भिक्ष आलें होतें, ह्मणून इतर सावजें सोडून, हा नरकेसरी आपल्या शरसंधानांत आणून, त्याच्या मांसरक्तानें आपली क्षुधातृषा शांत केलीस तूं!! वा सूर्यनारायणा! आमचा प्रतापसूर्य मावळला असें जाणून, आह्मां सर्वांचीं काळींठिक्कर पडलेलीं तोंडें शत्रूला स्पष्ट दिसावींत, ह्मणून कारे आमच्याकडे असा टवकारून पहात आहेस? पंचमहाभूतांनों! जगांतलें एक अमोलिक रत्न हारपलेलें पाहून, स्तब्ध बसण्या इतकाच कारे तुमचा अलौकिक पराक्रम? शूर सरदारांनों! त्या ऐन प्रसंगीं तुमची स्वामीभक्ति कोठें दडून राहिली? ती तुमची वीरश्री कोठें त्या वेळीं नाहींशी झाली? शत्रूचें काळीज फोडणाऱ्या तुमच्या त्या पाणीदार तरवारी-काळसर्पानें तुमच्या स्वामीस विळखा घातलेला पाहून, चट्साऱ्या बोंथट होऊन गेल्या कारे? महाब्राह्मणांनों! तुमचे, ते आशीर्वाद-खोटेंच एकूण? पतिव्रतांनों! तुमचे मंगलदायक वर-छत्रपति महाराज! आपली थोर पुण्याई-सद्गुरो ब्रह्मेंद्रस्वामीराज! आपलीं तीं आशीर्वचनें-प्रसंगीं एकही यांतील कामास येऊं नये, याखेरीज कमनशिबाची आणखी दुसरी कोणती गोष्ट असावयास पाहिजे आहे! धिःकार! धिःकार!! धिःकार!!! अहाग निर्दये, हिंद माते! असें अधोवदन करून मुळमुळ रडत दुःखाच्या घटका तूं मोजीत बसण्यापेक्षां, एक वेळ त्या **रणसिंह-वाजी**च्या नांवानें हंबरडा फोडून, सर्व प्राणीमात्रांच्या कानीं जाऊन तो आदळूं दे; ह्मणजे कोणाला तरी तुझी कींव येऊन, ते तुझें सांत्वन करतील. अहाहा! पोटचा गोळा बळी दिलासनाग चांडाळणी!! जा-अशीच एखादे दिवशीं परकीयांच्या थयथयाटाखालीं चिरडली जाशील; अखेर अन्नान्नदशा तुला येईल; स्वातंत्र्यसुखाचा लाभ तुला स्वप्नवत् होईल, आणि रात्रंदिवस 'खळखळ' असा आवाज करणारी ती पारतंत्र्यशृंखळा तुझ्या पायांत पडून, तुझ्या अवहेलनेला सीमा उरणार नाहीं!! (पद्यांतून

दुःखाची आरोळी ऐकूं येते. ) हाय! फुटलें नशीब आमचें! हा कपाळा! ही आप्पासाहेबांची आरोळी! हरहर! छे—ऐकवत नाहीं!! ( जातो. )

[ तदनंतर शोकाकुल झालेला **चिमणाजी आप्पा** येतो. ]

**पद.**—जाते कीं मम शकुंतला०—

हा दुर्दैवा ! एकाएकीं आह्मां सकलांला ॥
लोटुनि द्यावें दुःखाब्धीं हें रुचलें केंवि तुला ॥ धृ० ॥
आह्मांकडुनी मंतु असा वा काय तरी घडला ॥
अथवा, कोणा साधुनराचा छल आह्मीं केला ॥
बंधुजनांचा माझ्या हातीं विघड असे झाला ॥
ह्मणुनि आमुचा प्राण तुवां का यमधर्मा नेला ॥ १ ॥

अण्णा! कोंकणांत मला नानाकडे आपण पाठवून दिलेंत, त्याच दिवशीं आपली व माझी अखेरची भेट काहो? किंवा, अंतकाळीं मला दर्शन देऊं नये, ह्मणून माझी तिकडे रवानगी केलीत? मला एकव्याला सोडून जाणें, अण्णा! रुचलें बरें आपल्याला?

**पद.**—कांते फार तुला मजसाठीं०—

आपण पूर्ण सुखें भोगाया परलोकीं गेलां ॥
त्या समयीं परि हा सुविचार न केंवि आपु-
ल्या मानसिं आला ॥ धृ० ॥ "मी जातां
मत्प्राण—सहोदर । राहिल कैसा मजवांचोनी ॥
सुख होइल त्या कवणासंगें । सुखदुःखाच्या
बोलुनि बोला" ॥ १ ॥

अण्णा! 'आप्पा माझा पाठीराखा,' हें बंधुप्रेम त्या वेळीं आपण

अगदींच विसरलां काय? सांगा बरें, आपल्यामागें आप्पानें हें वियोगजन्य दुःख आतां कसें सहन करावें? अहाहा!

### साकी.

दृष्टि असोनी अंध जाहलों, रत्न हातिंचें गेलें ॥
धांव घेतली दुर्दैवानें, वैर साधिलें पहिलें ॥
दुःख सहाया हें ॥ मजला वांचविलें आहे ॥ ध्रु० ॥

आमच्या कुटुंबाची मागें आतां काय अवस्था होणार? अथवा, दुसरी कोणती!

### पद.

झालासे निश्चय मम बंधुभेटिचा ॥
मज्जननी—त्यापरीच नेमही तिचा ॥ ध्रु० ॥
तद्भार्या शीलवती ती महासती ॥
सुखदुःखा सारुनि ही सोडिल क्षिती ॥
दीन अर्भकांसि अंतिं तीच कीं गती ॥
होइल या रीतीनें नाश आमुचा ॥ १ ॥

जगदीशा! काय भयंकर प्रसंग आह्मांवर आणलास हा!! (मूर्च्छा येऊन पडतो. इतक्यांत **बाजीरावाचा** वडील मुलगा **नाना**, यास घेऊन **बाळंभट पुराणीक** येतो.)

**बाळंभट**—(आप्पास मूर्च्छित पाहून) अरेरे! हें काय आणखी दुर्दैव ओढवलें! (याचेजवळ जाऊन) आप्पासाहेब, आपण जाणते असून काय असें वेड्यासारखें करतां हें? कांहीं विवेक करा. आपणच असे शोकाकुल होऊन राहिलांत, मग ह्या आपल्या अर्भकानें करावें काय? उठा. (**आप्पा** सावध होऊन उठतो.)

**आप्पा**—( **नाना**कडे पाहून )

**पद**.—भैरवी—दीपचंदी.

किति सुंदर हें बाळ चिमुकलें ॥ तेजहि
याच्या वदनीं नुरलें ॥ ध्रु० ॥ अव्याहत
आक्रोश करोनी ॥ त्या शोकार्णविं व्यापुनि
गेलें ॥ १ ॥ मत्सम आतां स्वपित्याचें हें ॥
दुःख सहाया आहे सजलें ॥ २ ॥ या स्थिति-
माजी यास पहाणें ॥ काय असे या दैवीं
आलें ॥ १ ॥

बाळा! माझ्या लाडक्या!! (त्यास जवळ घेतो.)

**नाना**—आप्पा, अण्णांनीं फसविलेंहो आह्मांला!

**अंजनीगीत.**

सोडुनि गेले कवण्या स्थानीं ॥ लोटुनि आह्मां
या विरहाग्नीं ॥ राहुनि सदनीं त्यांवांचूनी ॥
काय करूं सांगा ॥ १ ॥

**बाळं**०—आप्पासाहेब, आपला शोक आवरून, या प्रसंगीं मुलांची समजूत करा. हे नानासाहेब, बघा—मघांपासून सारखा आक्रोश करताहेत. ऐका माझें.

**नाना**—आप्पा! अण्णा भेटतील काहो आतां आपल्याला?

**आप्पा**—हा दैवा! या दीनवाण्या मुलाचें हें विचारणें माझें हृदय विदारू पहात आहे! मी काय सांगूं याला! बाळा, अण्णा आतां कशाचे भेटतात आपल्याला!

**साकी.**

षड्रसान्नपरिपूर्णपात्र तें ओढुनि न्यावें पुढुनी ॥

किंवा, लोटुनि द्यावा कर तो घांस टाकितां वदनीं ॥
तैसें हें घडलें ॥ त्यांना यमधर्मे नेलें ॥ १ ॥

अशा या तुझ्या बोलांनीं अजून तरी किती या त्दयाचा भेद करशील नाना! रहा उगी.

**नाना**--अण्णा! आपल्याला त्या निर्दय काळानें नेलें--आपण आनंदानें गेलांत; परंतु मागें--

**दिंडी.**--भैरवी.

प्रेमभावें रक्षील कोण येथें ॥ आपुल्या या
अज्ञान बालकांतें ॥ हांक मारूं 'हे तात'
अशी कोणा ॥ दुःखपाशीं ह्या कसे धरूं
प्राणा ॥ १ ॥

**बाळं०**--नानासाहेब, झाल्या गोष्टीचें दुःख करून उपयोग काय? आपणां सर्वांना अण्णासाहेबांनीं फसविलें खरें! आतां आलेल्या प्रसंगाला तोंड दिल्याखेरीज दुसरी तोड नाहीं.

**आप्पा**--नाना, तूं गड्या समजूतदार असून असें करतोस, तेव्हां तुझे धाकटे भाऊ **रघुनाथ, जनूबाबा**-त्या दोघांनीं मग करायचें काय?

**नाना**--आमचें कसें होईलहो आप्पा? (रडूं लागतो.)

**आप्पा**--(त्यास जवळ घेऊन) वेड्या, व्हायचें काय?

**पद.**--रहि अकेलि मेरि जान०--

रक्षिल तो जगदीश ॥ तुह्मांला ॥ ध्रु० ॥
दीनसुत्दज्जन संरक्षा, सम ठेवा दृष्टीस ॥
सद्धर्मानें लोकिं रहा, जोडा सत्कीर्तीस ॥ तु० ॥१॥

लावण्या,

**गजल.**

उगाच भीति ही बरें तुझ्या त्वदंतरीं ॥
प्रसंग हा खरा—परी विवेक बा करीं ॥ धृ० ॥
गृहीं गजांत संपदा, तुला उणें नसे ॥
जगास भासताति मूर्तिमंत काळसे ॥
तया नरांत मान थोर आज तुज असे ॥
सहायकारि भूपती तुला परोपरी—॥

**नाना**—

कसें परंतु नाठवेल दुःख हें तरी ॥ १ ॥

( पडद्यांत शब्द होतो. )

"अहो, आमचें कोणाचेंही न ऐकतां, आपल्या पुत्रास एकीकडेस लोटून, सती जाण्याच्या निश्चयानें, स्वतः अग्नि प्रदीप्त करून त्याजपुढें काशीबाईसाहेब उभ्या आहेत. तर कोणी तरी लवकर धांवा !!"

( हें ऐकून सर्व दचकतात. )

**आप्पा**—अरेरे ! चला लवकर. जा पुराणीक—तुह्मी जाऊन तेवढा रघुनाथाला सांभाळून ठेवा. चला. (सर्व जातात.)

[ नंतर **काशीबाई** अग्नीपुढें उभी आहे; सर्वांत धाकटा मुलगा **जनार्दन,** हा तिचा पदर धरून तीस ओढीत आहे; एक **ब्राह्मण** व दासी **गिरजा,** बाजूस उभीं आहेत, अशीं दिसतात. ]

**काशी०**—भटजी, गिरजे, कुणी तरी याला एकीकडे घ्या. बाळा, माझ्या धर्मकृत्याच्या आड कां येत आहेस बरें ?

**जनार्दन**—आई, मला टाकून जाते आहेस कुठें तूं ?

**काशी०**—

**पद.**—असावरी—त्रिवट.

भेटाया जातें ॥ बाळा ॥ सुरलोकीं मी तव
तातातें ॥ ध्रु० ॥ न कळे तुजला हा मम
हेतू ॥ कां करिसी बा हट्ट असा तूं ॥ राहिं
सुखें येथें ॥ १ ॥

**गि०**—(रडत) बाईसाहेब, आपण चाललांत—आमची मागें वाट काय!!

**पद.**—भैरवी—त्रिवट.

लाउनि माया ममता ॥ कशाला ॥ ध्रु० ॥
सांभाळियली आजवरी ही ॥ दीन अभागी
दुहिता ॥ १ ॥ तो प्रेमा, शिशुवात्सल्यहि
तें ॥ लोपुनि सारें आतां ॥ २ ॥ उरला नाहीं
जेथ कुणीही ॥ मज अबलेचा त्राता ॥ ३ ॥
ऐशा विपिनीं आज तिला कां ॥ आपण
सोडुनि जातां ॥ ४ ॥

**काशी०**—गिरजे, ज्यानें आजपर्यंत तुमचा सांभाळ केला, तो परमेश्वर तुह्मांला कधींही अंतर देणार नाहीं. (मुलास) लाडक्या, सोड मला.

( **आप्पा** व **नाना** दोघे गडबडीनें येतात. )

**आप्पा**—हँ, हँ—वहिनी, काय हें भलतेंच साहस करतां आपण? अशा करण्यानें झालेल्या दुःखाशीं आणखी दुसऱ्या दुःखाची जोड करूं नका!

**काशी०**—भाऊजी,

पद.—मन माझें भडकुनि गेलें०—

यमसदनीं प्रियपति गेले सोडुनि मजला या स्थानीं ॥
मी एकलि आतां, काय करावें त्यांविण वांचोनीं ॥धृ०
आधारचि तुटला माझा, पडलें दुःसह शोकाग्नीं ॥
कैसें हो व्हावें असुधारण तें प्रिय मजलागोनी ॥१॥

त्यांच्या दर्शनाला जातें मी. या माझ्या धर्मकृत्याला साहस कसें ह्मणतां आपण?

**आप्पा**—आणि या तान्ह्या लेंकरांची वाट?

**काशी०**—कां? आपण त्यांचा सांभाळ करा. योग्य शिक्षण देऊन त्यांनां सन्मार्गाला लावा. आपल्याखेरीज आतां दुसरें वडील माणूस आहे कोण? नाना जाणता आहे, तो कुणाच्या आज्ञेबाहेर जाणार नाहीं.

**नाना**—आई! आमचा तुला कंटाळा आला काग? ('आई आई,' ह्मणून रडूं लागतो. **काशीबाई** त्याजकडे दुर्लक्ष करते.)

**आप्पा**—वहिनी, नका असें भलतेंच मनांत आणूं! आपण आनंदानें राहून, मुलावाळांचें कौतुक पहा. ऐका.

**काशी०**—नेत्र फुटून गेल्यावर बाहुलीची शोभा मग काय उरली बरें भाऊजी? माझा आनंदवृक्ष मुळासकट उन्मळून पडला—आतां कशाचें कौतुक मला!!

**ब्राह्मण**—वहिनीसाहेब, पतीची चित्ता सन्निध नसतां, अन्य चित्ता तयार करून, ब्राह्मणीनें त्यांत प्रवेश करावा, असा शास्त्राधार नाहीं. तसें केलें असतां मोटाच दोष सांगितला आहे.

**काशी०**—एवढेंचना? ह्या प्राणनाथांच्या खडावा माझ्यापाशीं आहेत. यांच्याबरोबर सहगमन करतें मी. मग तर शास्त्राची कोणची हरकत ? मला ह्या स्वामींच्या ठिकाणी आहेत.

**ब्राह्म०**—अहाहा! साक्षात् लक्ष्मी चालली आमच्या हातून! वहिनीसाहेब, आप्पासाहेबांच्या ह्मणण्याकडे थोडें तरी लक्ष द्यावें आपण.

**काशी०**—कां उगीच मायाजाळ पसरतां? आटपा आतां!

**नाना**—( तिला मिठी मारून ) आई, नाहींना गडे आमचें ऐकत तूं? ( तिच्याकडे दीन मुद्रेनें पाहतो. )

**काशी०**—( त्याचें तोंड कुरवाळून ) कांय ह्मणतोस माझ्या तान्हुल्या?

**नाना**—( रडत )

**पद.**—शाद्मा नजर पडी०—

लेशमात्र नाणुनी दया मनीं ॥ जासि या निं-
जार्भकांसि त्यागुनी ॥ तातनिधनदुःख हाय!
कांय जाळि हा ॥ तयास राखि जो कुणी।
न तूझ्यावांचुनी। अन्य या जनीं ॥ १ ॥

( तिच्या पायां पडतो. )

**काशी०**—ऊठ नाना. असें काय वेड्यासारखें करतोस हें? अरे, माझा धर्म मला तुह्मांला सोडून जायला सांगत आहे; त्याच्या आड, सांग-कशी वरें येऊं मी? ऊठ. ( त्यास उठविते व जवळ घेऊन त्याचे मुके घेते. )

**जना०**—आईग, मी नाहीं गडे तुला जाऊं देणार! अँ, अँ! ( रडूं लागतो. )

**काशी०**—भाऊजी, उलट यांचीच समजूत करायची; तें सोडून, हें काय आरंभलें आहे आपण?

**आप्पा**—वहिनी,

**पद.**—ललत—दादरा.

या अर्भकांसि पाहुनि तरि आपुल्या मनीं ॥ ध्रु० ॥
निपजो लवलेश दया ॥ रडति दीन होउनियां ॥
जाउं नका खचित तयां ॥ आज सोडुनी ॥ १ ॥

**काशी०**—छे!

**पद.**—कहांके पथक कहां०—

नियमभंग करुनियां, राहुं मी कशाला ॥ ध्रु० ॥
हा ममतापाश असा ॥ मजवरि कां टाकितसां ॥
लावूं मी डाग कसा ॥ विमलशा यशाला ॥ १ ॥
प्रेमें व्रत आचरितें ॥ वदतां 'दे सोडुनि तें' ॥
परि वांचुनि लाभ इथें ॥ काय या जनाला ॥ २ ॥

व्हा दूर. ( मुलांस दूर करते. ) झालें वरें तयार मी! ( चिंतन करते. )

( पडद्यांत. )

"मस्तानी वाईसाहेव, जातीनें तुह्मी यवनी. तुह्मांला अग्नि-
प्रवेश करण्यास शास्त्रसंमत नाहीं. तसें आह्मी करूं
देणार नाहीं."

( सर्व विस्मयानें पहातात. इतक्यांत वराच **स्त्रीपुरुषांचा** घोळका येतो. )

**आलेले लोक**—अरे! त्या वेशुद्ध होऊन तेथेंच पडल्या! कोणी तरी जाऊन त्यांस सावध करा.

**नाना व जना०**—आप्पा!! ( धाय मोकलून रडूं लागतात. )

**आप्पा**—बाळांनों, या माझ्याजवळ. ( त्यांस जवळ घेतो.) अरे, कोण आहे तिकडे? ( **एकजण** येतो, त्यास ) जा—चोहोंकडे मंगलवाद्यांचा या वेळीं गजर होऊं द्या. कारण,

### साकी.

साक्षात् लक्ष्मी आज चालली त्यागुनि आह्मां सकलां ॥
अमरपुरीं चिरकाल वसाया भेटुनियां निजपतिला ॥
दिन कैसा आला ॥ विधिची अतर्क्य हे लीला ॥ धृ० ॥

वहिनी, कोणाचेंच आमचें ऐकत नाहींना आपण? हरहर! कुटुंबाची शेवटीं ही अशी वाताहात झाली!!

**ब्राह्म०**—अहाहा! काय हें पतिप्रेम! त्याच्यापुढें जिला राजलक्ष्मीची आणि आपल्या तान्ह्या लेंकरांचीसुद्धां—बालाग्र परवा नाहीं! निःसीम पातिव्रत्याचा प्रभाव हा!!

**गि०**—बाईसाहेब, चाललांतना आपण!! ( रडूं लागते. )

**ब्राह्म०**—बाईसाहेब, आपल्या या पवित्र आचरणानें स्वर्ग-लोकीं उत्तम गति आपणास मिळेल. उभय कुळें पावन होतील. चिरकाल पतिसमागमें अत्यानंदांत मग्न रहाल. या सन्मार्ग-सेवनानें आपले हेतु परिपूर्ण होतील.

**काशी०**—( अग्नि प्रदीप्त होतो; त्या सभोंवतीं प्रदक्षिणा करून, वर पाहून )

**पद.**—आम्रमंजिरी तुला०—

सुखदर्शन घ्यावया ॥ आज मी ॥ येतें स्वर्गीं
प्रिया ॥ धृ० ॥ सोडुनि गेलां स्वप्रिय कांता ॥
काय तिला सुख या जगिं आतां ॥ त्यजिली
माया दया ॥ आज मी ॥ १ ॥ या दासीला

क्षमा करोनी ॥ भेट द्यावि आपण त्यां स्थानीं ॥ आस पूर्ण व्हावया ॥ आज मी ॥ २ ॥

स्त्रियांनीं,

पद.—भैरवी–त्रिवट.

पतिसेवा या जन्मीं ॥ युवतिजना हें व्रत बहु नामी ॥ घृ० ॥ धर्म खरा तो अन्य न याविण ॥ सदाचरण ये कामीं ॥ १ ॥ पाळुनि आज्ञा नित्य पतींची ॥ वसा सुखें निजधामीं ॥ २ ॥

झालें! (पादुका उराशीं गच्च धरून) भाऊजी, शेवटचा आपला निरोप घेतें मी. सर्वांनां आपणच आतां वडील. कुणाला कधीं अंतर देऊं नका ह्मणतें. येतें मी–!! (हें ऐकून सर्व रडूं लागतात. त्यांजकडे एक वेळ पाहून, चितेकडे तोंड फिरवितेमुळें 'आ.., आई,' ह्मणून आरडतात व तिच्याकडे जाऊं पहातात. त्यांस सर्वजण अडवून धरतात. इतक्यांत मंगलवाद्यांचा कडकडाट सुरू होतो. **काशीबाई** 'जातें' अशा अर्थाची मानेनें खूण करून डोळे मिटते व पतिनामाचें चिंतन करून अग्नींत उडी घालते. सर्व रडून आकांत करतात.)

आप्पा—

पद.—जगाय हारीरे०—

महापतिव्रता ती ॥ कदापि ये न आमुच्या हातीं ॥ धृ० ॥ तोडुनि भवमोहपाश । स्वप्रियास भेटाया ॥ स्वर्गपुरीं गेलि तीस । ईश देउ सद्गती ॥ १ ॥

ब्राह्म०— तथास्तु.

(सर्व निघून जातात.)

**पांचवा अंक समाप्त.**

---

**संगीत रणसिंह–बाजी नाटक समाप्त.**

## पुस्तककर्त्याची परमेश्वरास प्रार्थना.

पद.–भैरवी—दादरा.

ये धांवुनि झडकरि मदनारि सपरिवारीं ॥
क्षणभर मज धीर न, तुजवीण कोण दुरित वारि॥ध्रु०॥
मायबाप, बंधुभगिनि, आप्त, वसति सारीं ॥
भोगाया चिरकालिन सुख अपार अमरपुरीं ॥ १ ॥
कुठवरि तरि इतरांचा लोभ साह्यकारी ॥
जोंवरि ही वाणि बरी, कीं करिं धन वास करीं ॥२॥
वैभव तें कांहिं नको, काय मला थोरी ॥
गुरुराया तूं माझा मित्र खरा ये अवसरि ॥ ३ ॥
मृगजलवत् भासमान जें सुख संसारीं ॥
मी तयास भुललों–मी फसलों–मी चुकलों–तारि ॥४॥



## मिळण्याचीं ठिकाणें.

मुंबई:— { इंदुप्रकाश छापखाना, कावसजी पटेल ट्यांकरोड, घ. नं. ७५.

—०— { रा. रा. बाळकृष्ण हरिश्चंद्र जुहूकर, जनरल ट्रॅफिक म्यानेजरचें ऑफिस, जी. आय. पी. रेलवे, बोरीबंदर.

ठाणें:— (चेंदणी) { रा. रा. वामन लक्ष्मण काळे, सेक्रेटरी, मराठी ग्रंथसंग्रहालय.

—०— पुस्तककर्त्याकडे.

पुणें:— { रा. रा. नानाभाई बापूजी, सोमवार पेठ, श्रीनागेश्वराचे देवळानजीक, घ. नं. १५६.